# जाग

कविता

चं. प्र. देशपांडे.



जाग

एखादी रेल्वे गाडी येते दूरवरून स्टेशनात
तेव्हा एक मोठे गावच लागत असते
या गावाच्या किनाऱ्याला
अत्यंत संथपणे थांबली गाडी आणि मी उतरलो
जिन्याच्या चार पायऱ्या चढल्यावर आले लक्षात
अरे आपला होल्डॉल राहिला घ्यायचा
मी धावत जाऊन पुन्हा चढलो गाडीत
तर गाडी पुन्हा फुल भरली होती हे कसे काय
यापुढचे स्टेशन तर शेवटचेच आहे ना
आता इतक्या लोकांनी भरले होते त्यांचे सामान
यात माझा तो हिरवा होल्डॉल कुठे सापडणार
शिवाय कदाचित माझा डबाही चुकलेला असू शकतो
गाडीला फिकीर नसते ती सुरू झालेली असते
स्टेशनातून बाहेर पडत असते खरे तर मी लग्नाला खूप
आधी पोचता यावे म्हणून ही बरेच मार्जिन असलेली गाडी
पकडली होती पण ती झाली होती नऊ तास लेट
आता कपडेही नाहीत अहेरही नाही आणि मन भांबावलेले
असे जावे लागणार इलाज नव्हता शक्यच नव्हते आता
मला एक सूटकेस दिसली जी नेमकी
माझ्या सूटकेससारखीच होती पण ती तर मी आणलेलीच नव्हती
खरे तर मी कधीच असा सामानाशिवाय उतरलेलो नाही
यापूर्वी कशी काय कसली भुरळ पडली असेल की
लौकर पोचायचे एवढेच असेल डोक्यात कोण जाणे
आणि लोकांना काय कळणार आहे मी पुन्हा का आलोय ते
नाद सोडून तरी कसा देणार भिरभिरत राहिलो

अशक्य झाल्यावर जागच आली खूप गारठा होता
आणि पाय पांघरुणाबाहेर राहिले होते गार पडत होते
एवढ्यासाठी हे इतके म्हणजे किती त्रास मग हाही सगळा
सगळा एक प्रवासच धरला तर यातून जागे झाल्यावर काय दिसेल
कशासाठी चाललाय हा त्रास
--- ००० ---

आवाका

या गोळीने जरा झोप येतेय
म्हणजे आताच्या या कवितेचा
मर्यादितच राहील आवाका
अर्धजागृत मेंदू काय पाहू शकेल
मग काय पूर्ण दुकान
जमीनदोस्तच करू की काय
सतराव्या मजल्यावर हेड ऑफीस
याचा अर्थच संस्था खूप मोठी आहे
म्हणजेच पैसा मुबलक आहे
साहेब जातात ज्या लिफ्टने
त्या लिफ्टपासून लांबच राहतात
इतर कर्मचारी फक्त त्यांचा सेवक
जातो तीतून निर्भयपणे

साहेब किती प्रचंड विचारात असतात
कोट्यवधींचे निर्णय त्यांना घ्यायचे असतात
तो आवाकाच वेगळा कशाचे काय होईल हे समजणे
आणि मुख्य म्हणजे सांगता येणे की
ते बालपणी चाळीत राहिले होते त्याचा आणि याचा
अर्थाअर्थी काहीच नाही संबंध

मी दु:खात असतो तेव्हा वाढत असावा
माझा अंधारलेला परिसर आणि होत असावे
जगाचे राजकारण-परिमार्जन
माझ्या कवितासंग्रहाला उत्कृष्ट
ड्रेनेज रचनेचा पुरस्कार मिळाला तेव्हा
माझे शेजारी सदगदित झाले होते
त्यांना अभिमान वाटत होता की असे हृद्य
कवी  प्रत्यक्षात असू शकतात
इथल्याच याच सोसायटीचे मेंबर

झोप येतेय तरी इतके आठवतेय
कवितेत असायलाच हवे हे भल्याचे कौशल्य
आणि भाल्याचा बिनचूक विचारमय नेम
--- ००० ---

हुस्नवाले

कस्नुसं होत असताना
हुस्नवाले हा शब्द आठवणे
म्हणजे सोन्याहून पिवळे नव्हे तर
कोळश्याहून काळेच म्हणावे लागेल

लाल वळ पाठीवर घेऊन फिरणारे
मानसिक गुलाम
गाणी गात फिरावेत
सोना उगलेची तसे

चार चार ओळींचे वळ
हे काही बंधन नाही असू शकत
मोडायचे तर आधी
रंग घालवावा लागेल सोन्याचा

ही अशीच सेट होते परंपरा
आणि मग आपण म्हणू लागतो
काय होतेय ते नाही कळत
पण कस्नुसं होतंय

शब्दांचा हा खेळ
टेंपररी नसतो
रंगांचे गुलाम मन
दु:ख हेही एक कौतुकच समजते

शिवाय त्याला आवडतोच एक चाळा
स्वातंत्र्याची पूजा करण्याचा
तीही एक परंपराच झाली तरी
तिलाही ते हुस्नवाले म्हणतच राहते
--- ००० ---

कंड

कुंपणावर न बसता
विवेकी भूमिका घेऊन
ध्रुवीकरणात सामील व्हा
असे म्हणणारे घंट्याचे विद्वान
असतात जगाचे भंगार हितचिंतक
आणि बाकीचे सगळे असतात
त्यांच्या अशा ना तशा प्रतिकृती

ते असतात जगाचे पोशिंदे
आणि एकमेकांच्या झुंडी फाडण्याच्या
आकांक्षा बाळगणारे स्वाभिमानी
जगद्रोही

एकसारखे पोषाख करून यंत्रवत
हालचाली करत कडक
फिरणारे लोक यांना
आदरणीय वाटतात वस्तुत:
ते महाविनोदी आणि महाहिंसक असूनही

हवेचे कणभरही प्रदूषण न करता
नेमका लक्ष्यभेद असतो
यांच्या प्रचंड माहितिसाठ्याच्या
कचरा चर्चेत

हे म्हणजे सगळेच
असतात आत्ममग्न आदर्शवादी
मूल्यपूजक संस्कृतिविकासक
मनोरुग्ण
सर्वे भद्राणि पश्यंतू म्हणणारे
जगाचे रखवालदार

आपापल्या चिंधीने पुसू पाहणारे
जगाची कंड
कपाळावर आठ्या घालून
जगाला सावरणारे
--- ००० ---

मद्दड मर्त्य मनांची मूलभूत मर्मदृष्टी

खरे तर ते आमचेच लोक आहेत
तुमचा काही संबंधच नाही
पण सध्या ते आमचे शत्रू असल्याने
त्यांना तुमची मदत हवीय
त्यात तुमचे बरेच इतरही काही साध्य होणार आहे
त्यामुळे तुम्ही मदत करू इच्छिणार हे योग्यच आहे
पण तो आमचा अपमान असल्याने
आम्ही तुम्हाला धमकी देणेही योग्यच आहे
त्या धमकीला घाबरणे तुम्हाला कसे परवडेल
हे आम्हाला समजते आम्ही सबूरीत आहोत
पण आता एक बघा आमचाही मान राहायला हवा
तुम्ही धैर्यवान आणि आम्ही ताकदवान
हे दोन्ही झेंडे फडकत राहायलाच हवेत

आमचाच असलेला तो माणूस
सध्या तुमचा झालेला आहे एक लक्ष्यात घ्या आता
त्याचा एखादा हात वा पाय तोडणे आम्हाला भागच आहे
हे तुम्हीही समजू शकाल
हात की पाय ते तुम्ही सांगाल तसे मान्य
पण आता त्याला इलाज नाही
जग मधून मधून अशा टोकाला येतच राहणार

आपण दोघेही अक्कलवान आहोत
आपणच भिडलो तर दोघेही नष्ट होऊ
किंवा विकलांग होऊ भिकारी होऊ
तसे तर होता कामा नये
हाच आपल्या स्वाभिमानाचा
आणि मूल्यांचा आणि तत्त्वांचा पाया असणार आहे
तुमचा वा आमचा एखादा माणूस
साधा एक हात वा पाय गमावून बसणे हे कधीही
चांगले आणि शांततावादी ठरेल

थोडा गोंधळ झाल्यावर जगाच्या भल्यासाठी
समजुतदारपणे आपण वाटाघाटींनी
प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न करत राहू
--- हीच आपल्या मद्दड मर्त्य मनांची मूलभूत मर्मदृष्टी
--- ००० ---

स्त्रीची कविता

स्वर्गबिर्ग ना आहे ना माहीत मेंदूच्या
उजव्या भागात माझ्या मुबलक आहे कल्पनाशक्ती
स्त्रियांच्या कविता म्हणजे
मुक्त परवानाच सखोल मुशाफिरीचा
भिंत असो की रस्ता आकाश असो की मिक्सर
सहभावी व्हा वा सहप्रवासी

दिसतेच एका गाफील क्षणी
मन टाकल्याशिवाय
स्त्रीची कविताच काय काहीच नाही कळणार
--- ००० ---

नकळत ०००

तुला दुरावा हवा असतो
म्हणून तुला मी तो देतो
तसा का असे ना सहवास चालू राहावा
ही सुप्त इच्छा असतेच त्यामागे
आणि ती फलद्रुप झाल्याचे सुख मिळतेच मला
तुझ्या नावडीचे तुला नकळत

मी लपवलेल्या तीव्र आवडीमुळे हे घडणारच
कितीही दडवले तरी ती जवळीक
माझ्या शब्दांतून येतच राहणार

काय करावे
हे अटळ असल्याने बंदच करावे
असे म्हटलेस तरी मला चालेल
तुझ्या इच्छेने
हे बंद करण्याचेही सुखच होत राहील
तुला न आवडणारे

काय करावे
तुला सुचेल ते सांग
तुला छान वाटणे हेच महत्त्वाचे
--- ००० ---

झोपाळा

हा झोपाळा सोडताच
लगेच तो तिकडून दुसरा हजर
इतक्या वस्तूंच्या ओळखी
लाल ओठांच्या
नग्न कळ्यांच्या
अधांतरी काहीच नाही जणू
सतत ओघवते कलिंगड
मनाच्या फोडी करत
निनादत राहणारे
आणि मरणाचे थकवणारे

कोणत्याही वस्तूच्या
एकेका वाक्यासाठी
प्राण उभे ठेवून तिष्ठणे
म्हणजे गाढवाचा बाजार

नको ते वस्तूंचे व्यसन
म्हणून अंथरावे औदासीन्य
तर पुन्हा यावी मादीचीच आठवण
असा सगळा बंदोबस्त

असेच जाऊ दे आता आयुष्य
उगीच मरणाची नकोत स्वप्ने
उलाढाल्या खूप होताहेत
याचेच रूपांतर होत राहावे
सुरक्षित तृप्तीत

वस्तू म्हणजे स्त्रियाच जणू
प्रेमळ पण वेळ नसलेल्या
घड्याळे विसरलेल्या
पण तरीही निरागस

हे परवडणारे नाही
हे कळूनही पळणार कुठे
उद्याचा माल भरायची यादी
तर जपावीच लागणार
--- ००० ---

कसून

सर्वांचे एकमेकांवर कसून लक्ष
फासे कसे पडतील कोण जाणे
प्रतिमा तर सगळ्या शाबूत राहायलाच हव्यात
काय कसे घडेल देव जाणे
तेंडुलकर होतेच की नियतिवादी
त्याच कारणांनी काही होतात अपघातवादी

प्रतिमांचे जगणे
हा नियतिवाद की अपघातवाद
काहीतरी लागतेच वैचारिक आधाराला
आणि व्यस्ततेला आधारांची लढाई

पत्नीही हवी आणि प्रेयसीही हवी
या जंजाळातले राजकारण
माणसाला पापी वा पवित्र बनवत राहते
मग गंगास्नान आणि कुंभमेळा का वाईट
--- ००० ---

## सांबरशिंग

पुराव्या अभावी सुटत आलेले
कोट्यवधी लोक
सतत बाळगतात क्लीन चिट खिशांत
त्यांनी पाहिलेल्या चित्रपटांत नोंद असते
ते सद्‌गदित झाल्याची
आणि करुणेची आणि त्यांच्या संवेदनशीलतेची

ते ना चित्रे पाहतात ना संगीत ऐकतात
पण भाषणे विशेषत: राजकीय
ते मानतात मूलमंत्र प्रगतीचा
ते सगळे म्हणजे आपणच तर सगळे
एकाच मनाचे असंख्य तुकडे

गुन्हेगारीची व्याख्या
शाबूत ठेवतात ते कायद्याच्या पुस्तकात
वांधे झालेच तर ते
कांदे खाल्ल्यामुळे झाले
असे म्हणून ते मोकळे होतात

गुन्हेगारांबाबतही ते
सहानुभूती बाळगतात
पण शासन व्हायलाच हवे म्हणतात
प्रेम आणि कठोरात कठोर कर्तव्यनिष्ठा
बाळगत ते एखाद्या विभूतीच्या दर पुण्यतिथीला
उपास पाळतात आणि
महती गातात एकाच इमारतीची
इतरांशी स्पर्धा न दाखवता

आपणही होऊ शकतो वा
असूही शकतो अनैतिक सांबरशिंग
हे समजून आपापली लिंगे लपवत
ते हजर राहतात शपथविधीला
मनातल्या मनात जयजयकार करत
गुप्ततेचा
--- ००० ---

परस्पर

तुम्ही असता पडलेले अर्धवट झोपेत
गाडी परस्पर चालू असताना बाहेरच्या अंधारात
तिचा वेग कमीजास्त होतो कधी ती
थांबलेली असते सिग्नल नसल्याने
निर्मनुष्यतेत कधी येते एखादे स्टेशन
आणि कुणी चाके तपासत गेल्याचे आवाज
जणू या शांततेतही अंधार
मागे मागे जात राहातोय तुमच्या डब्यातले सगळे
दिवे घालवलेले क्वचित कुणी ठसकल्याचा आवाज
किंवा क्वचित कुणी आपल्या चपला घालून
टॉयलेटकडे हे सगळे तुम्हाला जाणवतेय
बाहेरच्या एखाद्या खांबावरच्या दिव्याचा प्रकाश
खिडकीतून तुमच्यावर पडून जात असणार
हे तुम्हाला माहीत असते गाडीच्या मंद आवाजात

हे स्वप्न नसते असते वाट पाहणे विश्वासून परस्पर
जे चालेल ते चालेल मनात असे अनाग्रही
तसेच इथून कित्येक किमी दूर असलेल्या
आणखीही एका मनात घडत असेल
घरातल्या घरात रात्र सरत संथ विचारांत ताबा सोडून
--- ००० ---

सत्याचा दहशतवादी

तो फारच अभिमानी होता
पण नम्र होता तो डायरेक्ट दुखवत नसे
पण नेमक्या वेळी स्वत:चे मत असे सांगे ठामपणे
की माझ्या लक्षातच येई की याला
मी बोललेल्या एका मताचा संदर्भ आहे
म्हणजे तो किती सखोल शहाणा
आणि मी किती बुद्दू असा मी कळूनही ते चालवून घेई
कारण मी माझ्याच मतांना महत्त्व नाही देत
रे बाळा तर तुझे कुठे कौतुक करू

मलाही मते आहेत हे तर मला
वेळोवेळी दाखवावे तर लागणारच ना
किंबहुना भिऊन किंवा एक स्ट्रॅटेजी म्हणून
मी माझी काही मते लपवतो बोलत नाही
असाही संशय मी कधी कधी निर्माण करतो

अरे गधड्या बघ जरा आजूबाजूला
ठाम आणि मानवी आणि कनवाळू
आणि निर्विवाद हिताच्या मतांनीच
किती वाट लावलीय हवेची
तुला वाटते फक्त वैचारिक हवे सगळे
त्याच्या मते असे जगणे हिंसक असेल
तर तुम्ही भेटणार कुठे

एक संगणक प्रणाली काढताहेत शोधून
प्रत्येक विषयावर वा नव्याही मुद्यावर
करेक्ट मते सांगणारी पण ती मते
तुझ्या मतांशी नाही जुळली तर काय करणार

शेवटी मी त्याला सांगतो खरे तर
तू नुसता श्रेष्ठच नाहीस तर अंतिम आहेस
सत्याचा दहशतवादीच एक प्रकारचा
खरे तर मला काही कळतच नाही
मी त्या त्या वेळी सुचेल ते ते बोलत असतो
याने त्याचे समाधान होते
--- ००० ---

बीज

अंधारातच पडलेला असतो

आणखी एक प्रश्न
की का बाबा

जगातली प्रत्येक घटना
मला का नाही चुचकारत

आणि मग कविता का होते अमर
कुणाचेच आयुष्य नसलेली

नासलेले वाटल्याने हे विचार
मी गाठतो शनिवार वाडा

आणि शेजारच्याच गाडीवर
खातो वडापाव

माझे रक्त उसळतच नाही
मी प्रात:काल
मी रहस्यकथा
मी मर्डर

नुसतीच दिसते रहदारी
तेव्हा ना अपमान होतो ना सुखदु:ख
जिद्दीने

जेव्हा दाखवले जाते
की मी नाही अवलंबून
तेव्हा कदाचित तेच
ठरू शकणार असते आवाहक

होकार ठरू शकतो
एक घटना
आणि तिथेच असते बीज घटनेचे
स्वत:च्या
--- ००० ---

## खरे तर

खरे तर त्या वेळी
असे घडले होते याचे पुस्तक येते
आणि सरसावून उभे राहतात विद्वान
ज्यांना त्या जुन्या सत्याच्या काळजीपेक्षा
आता काळजी असते
सध्याची हवीशी प्रतिमा सुधारण्याची

जनतेला आता कंटाळा येतो
ती समोरच्या हव्यानकोवरच
खुश राहू इच्छिते शिवाय अमुक
हा तर असे म्हणतोय हेही असतेच

नेतृत्व असते तसे निश्चिंत
आजच्या सत्याचे एखादे
मोठे पोस्टर लावून करते ते मुकाबला

शिवाय एका पुतळ्याची विटंबना झाल्याचे
मध्यरात्री कळताच त्याच रात्रीत
सगळी साफसूफ करून
दंगल टाळल्याच्या
आत्ममग्न टेचात राहते सरकार
हे आपले कर्तव्यच आहे अशा नम्रपणाने

आता जनतेला आधिक
समर्थ हवी असते ओळख
विमानतळाचे नाव मुक्रर झाले
की सध्या तरी उलटत जाणार असते कॅलेंडर

तलवार आणि राज्यघटना
यांच्यांत नको वाद म्हणून
जनता करते त्यांच्यावर एकत्र अभिषेक
तेव्हा तर्कवादीही शांत राहतात

कुंपणावरचे म्हटले जाणारे
धूर्त स्मित करतात
--- ००० ---

आयफेल

आजारपणाला पोषक
दुतर्फी हवा
मिसळते एकमेकांत
तेव्हा आधी काय होते

ते विसरले जाते
नुसतेच दुतर्फी देणे असते
त्या क्षणात उभा राहतो
आयफेल टॉवर
जो नसतो कुणाच्याच मालकीचा

तो म्हणतो हा तर तुझा
ती म्हणते असे नाही
मी ना हा पाहिला होता
ना ते माझे स्वप्न होते

तो म्हणतो मी तर
नगण्य होतो आहे हा तर
तुझाच स्पर्श

ती म्हणते
माझे काहीच नाही आता माझ्याकडे
तो म्हणतो
आपले जगणे संपले की काय
ती म्हणते मजा येतेय आता या
अनोळखी हवेत
--- ००० ---

शीतोष्ण

गारठा आहे म्हणता म्हणता
मध्यरात्री उकडायला लागावे
तसे मानवी संबंधांचे कारनामे
विलीन होणारे जणू एकमेकांत
भारत-पाक सामान्यांतले उंचसखल
फेरबदल बाहेरून डायरेक्ट मेंदूवर
पडणारे कवडसे शीतोष्ण

डोळ्यांतले पाणी स्पर्धा नाही करू शकत
पावसाशी आणि मनातले मणी
ओवता नाही येत एका सुसंगत दोऱ्यात
हळूहळू येणारे कालांतर
आणि मेंदूला लागणारे दुसरे वेध
हेच गपागपा खात राहतात काळ

हे जरी नकोसे असले तरीही सर्वमान्य
हे घडण्यातच तर
प्रेम निष्ठा समर्पण
सत्यता नैतिकता आणि मानवता

गाडी सुटो की एस्टी
शेवटचा ठिपका दिसेनासा होणार
हे माहीत असतेच इलाजही नसतो
जगण्यातले अटळ म्हणून
आजूबाजूला वावरते सहानुभूती
समजूतदारपणा आणि संवेदनशीलता

आणि अपेक्षेप्रमाणे मेसेज येतो
सर्व ठीक काळजी नसावी
सध्या इथे पाऊस पडतो आहे

यावर काय बोलणार जे करायचे
ते मेंदू आपोआप करत राहतो
असे ना तसे अटळ
--- ००० ---

## ध्यान

एक नवा उद्योग म्हणून
पळीभर फोडणी दिली
उद्घाटन समारंभाला
आणि क्लीव्हेजप्रमाणे
समावेशक केले जगाचे ध्यान

जगाला पर्वा नव्हती
लोक त्याला बेपर्वा म्हणत होते
आणि संवेदनशीलांच्या डोक्यांचे होत होते
भरले वांगे रटरटते कुणाला काय वाटेल या विचाराने

--- ००० ---

आत्मा

क्षणभर प्लॅटफॉर्म
होतो विचारहीन
तर अरे वा
थांबली खाज
अंगावरची

आईस्क्रीम खाऊन
लागलेले दिवे
आता मनाला
विरोध नाही करत

सध्या प्रवासी कुणीच नाहीत
आणि ना मास्टर ना पोर्टर

एक झाड आहे आपले दोस्त
आपण आहोतच एकत्र
हे समजून ते
सारखे बोलत वा पाहात नाही

प्रत्येक पदस्पर्शातून
जावा माझा हा
विजेसारखा आत्मा
प्रत्येक जगण्यात

नको तर जाऊ दे
हम ना किसके आशिक हैं
ना किसके दुश्मन

शांत उडत राहतेय धूळ
--- ००० ---

शांततेने समजुतीने
हितचिंतन करत सौहार्दाने
गुण्यागोविंदाने राहणे
हाच आहे पर्याय प्रदूषण थोपवण्याचा
हे सर्वमान्य झाले
आणि जीव भांड्यांत पडले
तर प्रत्येक भांड्यात एकेक उभे ब्लेड
आणि अचानक सगळीकडून बें बें
***
हे असे नाही जमणार
शिकवण्या लागतील
म्हणून गाठले एस आर पी एफ
त्या मैदानात होते प्रशिक्षण अद्ययावत
पण तेवढ्यात अर्जंट मेसेजेस आले
की गावात अचानक सुरू झाल्या आहेत
जुन्या गाण्यांच्या मैफली
त्यामुळे धडाधड सगळ्या निळ्या गाड्या
रवाना झाल्या शनिवार वाड्याकडे
कारण आता तिथे नव्हता काही प्रॉब्लेम
***
सर्व पोलिसांना एक संचलन म्हणून
कविता लिहिण्यास सांगण्यात आले
पाहणारे धड घाबरेनात आणि त्यांना
धड सुरक्षितही वाटेना
कागदांवर उमटू लागले रक्त
तेव्हा आधी
सर्व मॉल्सना वेढे द्यायचे ठरले
पण रस्ते माहीत नसल्याने
पोलीस जागचे हलेनात
***
उर्वरित मार्ग म्हणून
सर्व अधिकारी गेले
मुख्यमंत्र्यांच्या दर्शनाला
तर ते आधीच वर्तमानपत्रे आणि
गुप्त खाद्यपदार्थ हे सर्व
पूजेचे सामान घेऊनच बसलेले होते
हळकुंडांच्या ऐवजी
बटाटे आधिक प्रभावी ठरतील

असे त्यांचे मत होते

***

कुठे वाद घालत बसा
म्हणून सर्व अधिकाऱ्यांनी
आपापल्या घरी फोन करून टाकले
की काही दिवस तरी
ते सरकारी बागेतच जेवतील

***

तसे हे नेहमीचेच होते
शपथा घ्यायच्या तीर्थप्रसादाच्या
आणि मनांत ठेवायचे नि:पात
येणाऱ्या काळाचे

***

खरे तर व्हायला हवा होता
हिंसेचा फुल मर्डर
आणि इथे तर कामे
सारखी वाढतच चालली होती

***

शेवटी कडक बंदोबस्त
हाच ठरला सर्वांच्या जगण्यातला
तुका झालासे कळस

--- ००० ---

हातरुमाल

कुठे बाळगत बसतोस
ते मरतुकडे हातरुमाल
तुझ्या जन्मापूर्वीच ढग झालेले

त्या ढगांना ना पाणी माहीत ना जमीन
तरीही निसर्ग म्हणजे तेच असे त्यांना वाटते
निसर्ग हा नुसताच
कागदाचा वा लोखंडाचा कसा असेल

नुसत्या परंपरागत कल्पना
म्हणजे जसे जगणे नव्हे तसेच
तुझे सबोध आणि अबोध मन
मिळूनही नाही होत काळाचे मापन
तुझ्या मर्यादेत तुला
तेच परिपूर्ण वाटले तरीही

पुन्हा पुन्हा उकरली जाणारी जमीन
हे फक्त एक निमित्त असते
तुझ्या हमरस्त्यांवर अपघात होत राहण्याचे

खोलात गेलास तर तुला वाटेल
तुझे बालपण हे नुसते खोटेच नव्हते
तर कविकल्पना होती ती एक मिथ होती

पण काहीही मान्य केले
तर तुझे हातरुमाल
क्षणभंगूर ठरतील
आणि तुझे ढग कधीच
पाऊस नाही पाडणार
आणि तुझे रंगढंगही
समाधान देण्यात कमी पडू लागतील

हे जाणवत असल्याने
आधीच तू आक्रसून घेतोस तुझे पाय पोटात
आणि विकास म्हणून सुरू करतोस
महत्त्वाकांक्षी प्रकल्प
माणसात सौहार्द आणण्याचे

देवावर नाही पण
बुद्धीवर तरी विश्वास
ठेवावाच लागतो तुला त्याच बुद्धीने

याला तू काट्याने काटा काढण्याचे
गोंडस नाव देतोस आणि शोध घेणे
घेत राहणे हेच माणसाचे उदात्त जगणे असते
असे होर्डिंग्ज लावतोस सर्व हमरस्त्यांवर

कबूल कर सरळ तुला देणेघेणेच नाहीय
बुद्धाने सांगितलेल्या दु:खमुक्तीचे
सिनेमात गुंतून राहणे हेच तुला मान्य आहे
नियती म्हणून नव्हे तरी एक बौद्धिक सत्य म्हणून
--- ००० ---

## हिंग

### एक

पावसाळी हवेने तुम्ही सकाळी त्रस्त असता
काय हा वैताग म्हणून तुमची दुपारही त्रस्त होते
त्यामुळे तुमचे संघर्ष होतात
आपले बरोबर असूनही लोक हलकट आहेत
असे तुम्हाला वाटते रात्री तर
कसेबसे गिळता तुम्ही अन्न
आणि माणसाच्या आपमतलबी भांडवली
वसाहतवादी जमीनदारी वृत्तीला शिव्या देत
वंचितांची बाजू घेत
विद्रोही मनाने तुम्ही प्रयत्न करत राहता
झोपी जाण्याचा सारांशाने लोक
तुम्हाला घाबरत राहतात
याने तुम्हाला तत्त्वशील वाटत राहते पण
त्या तत्त्वाला कुणी हिंग लावूनही नाही विचारत
या जगात हे जाणवून तुमचा क्रोध अधिकच भडकतो

### दोन

तुम्ही लवचिक असता म्हटले तर गबाळे
तुम्हाला झाडे दिसतात पक्ष्यांचे रूटीन पाहून
जग नीट चालू असल्याच्या समाधानात
तुम्ही बाहेर पडता सोसायटीचे स्त्री-पुरुष वॉचमन
हसून तुम्हाला नमस्कार करतात तुम्हीही
प्रतिसाद देऊन पुढे होता कधी तुम्हीही
आधी करता नमस्कार लवचिक मनाने
पुढे रस्त्यावरची एखादी झाडूवाली
तिचे काम थांबवून हसून विचारते
बरंय ना दादा तुम्ही हो बरंय बरंय म्हणता
स्मित देत पुढे होता तेव्हाच तुम्हाला जाणवते
बरोबर चाललेय आपले जगणे कुणी
आपल्याला घाबरत तर नाहीच उलट निरपेक्ष स्नेह बाळगतात

याचे समाधान साकळू लागताच मनात खजील व्हायला होते
पाहून समाधानाची साधने मालकीची करू पाहणारे भंगार मन

--- ००० ---

म्हातारीचा बूट

खूप झटापटींनंतर का असे ना
मला लाल आकाश आवडतच राहणार
यापुढे तुझा नाइलाज झाला तूही कळत नकळत
दाखवू लागलीस लाल किल्ल्यांचे कोन
तुला चांगले म्हणण्यासाठी म्हातारीचा बूट वाईट
म्हणायची बालिश गरज मला नव्हती
तू माझ्याकडे सोपवलेले तुझे विभ्रम
कोणत्याही मालकीशिवाय माझे होते
होते काय आपल्या संवादांत तर
कवितेचे अदृश्य असणे आणि आपण
गुप्त असणे वाहत्या वस्तूंच्या प्रवाहात
याने माझ्या मनात काय घडेल याचा तुला अंदाज होता
पण तुझा आक्षेप नव्हता कोणत्याच तपशीलांना
कारण माझ्या विचित्र समजुतीत तू सामील झाली होतीस
सर्वस्वाचा धोका म्हणजे शून्य धोका
हे समजून माझ्या अतूट संपर्कात
तुझ्या स्वातंत्र्याने माझी इच्छा ओलांडून
--- ००० ---

दुर्बोध

तू जुळवून घेतलेस काय वा तोडलेस काय
मी दोन्ही धुकेच समजतो
यावरून तुला वाटते
तू जुळवून घेणार हे आधीच मला माहीत असते

पण हेही मला समजल्याचे मी दाखवत नाही
धुकेच असू देतो नकोच ते
कोण वरचढ आणि कोण कुणाच्या छायेत
तुलाही हे धुके मान्यच असल्याने

आता सुरू होतो पुढचा टप्पा
अपमानही करायचे बोचकारायचेही
पण धुक्यावर विश्वासून
त्याचा लळा बाळगत

यापुढे सगळाच असतो समंजसपणा
बाकीचे हवेय कशाला
धुकेच महत्त्वाचे
हे ओळखून संवाद होतात

अनिर्बंध अनाकलनीय
आता हवे ते अर्थ घ्या लावून
असे खुले स्वातंत्र्य येते
धुक्यातल्या धुक्यात

अनपेक्षित काही घडले
तरी आता कळणारच नसते
किंवा धुक्यात हरवणार असते
आवडत आवडत

आवडी नियम आणि मते
यांचे अस्तित्वच दुर्बोध
असल्याची समज आल्याने
कविताच होते जगण्याची
--- ००० ---

मम

माझा एक मित्र
गंमतीने मला महामहोपाध्याय म्हणाला
अरे म्हटले मला
कुणाचेही चरित्र लिहिण्यात इंटरेस्ट नाहीय
एवढ्या मोठ्या जगाच्या चरित्रातही
असते फक्त देवघेव आसक्ती सूड आणि क्रौर्य
ते लिहिण्यावाचण्यात कसली आलीय मर्दुमकी
आत्मचरित्र लिहिणारेही मला मूर्ख वाटतात
त्यांचे गौरव जोपासणे म्हणजे माझे जगणे
इतका विनम्र आत्मगौरव माझ्याकडे नाहीय

मग रामायण-महाभारत ही तरी
तुझी ओळख आहे की नाही
असे विचारत त्याने ती गंमत पुढे रेटली
अरे म्हटले अंबा अंबिका आणि अंबालिका
या तिघीही मला आवडू शकल्या असत्या समज
पण पाच पांडवांचे नेमके पितेही मला सांगता नाही येणार
माकडे माणसाला सहकार्य देतात
याहून वेगळे आहे काय रामायणात
आपापली बायको संभाळण्याचे टेन्शन हेच ना

तू मित्र म्हणजे तरी काय आहेस
अकिलसप्रमाणेच तुझीही एखादी त्रुटी
तुझा खात्मा करू शकते शोकात्म
दोष वा पतनबिंदू वा कलंक वा अटळ हाव
काय घडावे याची

आणि मी तरी काय आहे
मला आवडणाऱ्या सर्व स्त्रिया
माझ्या प्रेमात पडाव्यात म्हणणारा
म्हणजेच माझे दुर्लक्ष झाले तर त्यांच्यांत
काय होईल उलथापालथ याचे विचारही नको असलेला

म्हण तू मला मम पण तो फेटा आणि ते धोतर
हे मला कदापीही नाही जमणार
--- ००० ---

हिंसक गोड

कधी एखादे चित्र आवडते
कधी एखादी कविता
कधी काय कधी काय
म्हणजे काय काय
असेल ते घ्या समजून

पण सजीव असो की निर्जीव
ते असते साले संघर्षातच
आपल्याच मनामुळे

सुरुवातीला शक्य तो
गोड मानून घ्यायचो मी संघर्ष
नंतर काय घडले कोण जाणे
ते आपण होऊनच बऱ्याचदा
गोड होतच येऊ लागले मनात

प्रत्येक संघर्ष होऊ शकतो निमित्त
माझ्या कवितेचे
होतोच असे नसले तरी

पण कधीही होते इच्छा
द्यावी आता एक कविता
प्रिय प्रेयसीला
आणि लगेच
पालवी फुटते उत्तेजक
त्या हिंसक गोड संघर्षाला

मला काहीच नाही करावे लागत
निमित्त म्हणजे कवितेनेच
घेतलेला असतो तो आकार

प्रत्येक कविता अर्पण करायची असते
माझ्या प्रिय प्रेयसीला
कविता आणि प्रेयसी म्हणजे एकच
माझी अनुपस्थिती
--- ००० ---

गप्पा

लोकांना कशाचेच काहीच वाटत नाही
लोक संवेदनशीलता हरवून बसलेत
स्वत:चीच पाठ थोपटून घेणारे फार झालेत
नवीन पिढीला नावे ठेवतात नुसते
जुने ते सगळे कालबाह्य समजतात वेडे
अज्ञानी समाजाला बरोबर नेले पाहिजे
मग तर शहाणे कुणाला म्हणावे हा प्रश्नच पडेल
तुम्ही सांगा ना मग मौल्यवान म्हणजे काय ते
नुसत्या दुगाण्या झाडणे आणि हिडीसफिडीस करणे
सुरुवात कुठून करायची ते सांगा ना तुम्ही
बरे हे वाईट ते मूर्ख आणि तमुक आपमतलबी
तुम्ही घ्या ना जबाबदारी व्यापक होण्याची
हेच न्यायाचे होईल ते अन्यायाचेच आहे

आय टी म्हणजे काही सर्वस्व नव्हे
पगार किती मिळतो यावर अक्कल नाही ठरत
अहो पी एच डी सुद्धा विकत मिळते
तिकडून शिकून येता शिक्षण कसे हवे ते
पण इथे शिक्षक आहेत का तसे
अमुकच चांगले हे ठरवायचे कुणी
सर्व समाजाचा विचार झाला पाहिजे

तत्त्व पाळणारे कोण आहेत पुढारी
तरीही तुम्ही नीतीचे कसे काय बोलता
टिळे लावल्यावर यश मिळते
हे पाहून कुंकवाचा बाजार वाढलाय
तू नास्तिक आहेस तर तत्त्व बाळग ना ते

बरे म्हणणे काय शेवटी काय काय
नष्ट व्हायला हवेय कुणाचीच लाल
असू नाही शकत हे ठरल्यावर
परत तूच शहाणा हे कशाला

सगळ्यांची ओळख पुसली जात नसेल तर
उपयोग काय मारून समतेच्या गप्पा
--- ००० ---

पीटर ब्रूक

पीटर ब्रूकच्या कर्तृत्वाने
धर्मराज म्हणतो शकुनी
तू तर खोटेपणा आणि फसवाफसवी
यांत माहीर आहेस हे सर्वच जाणतात
शकुनी म्हणतो छे छे जो सावध असतो
तो फसवला जाऊच नाही शकत
हाच तर असतो जगण्याचा खेळ
दुर्योधनाच्या डोक्यात सतत वेगळाच जाळ
मला राहायचेच नाहीय स्वस्थ समाधानी
तृप्त आणि मजेत माझे जनुकच आहेत
सतत उकळते हिंसेची आणि नाशाची
रेलचेल करू इच्छिणारे जगात

आजचा अर्जुन म्हणतो
मी द्वेष करतो इथल्या भाषेचा
इथल्या महाकाव्यांचा शिल्पांचा
इथल्या नारळांचा हळद कुंकू बुक्क्यांचा
हे जनुकांतच आहे माझ्या
मला सुखे नको आहेत
हे नाहीत माझे नातेवाईक
यांना मी संपवू इच्छितो
पण कुणी कृष्णही नको आहे माझ्या सोबत
मी जगू नाही देणार कुणालाच
साधे निर्वेध लाईफ जरी मला
काहीच न करता नुसतेच
धुमसत राहावे लागले तरी

ब्रूक पाहात असतो मोकळा अवकाश
ज्यात तो भरतो पात्रे जगभरातून
इथले तिथले आणि रंगांचे भेद
आणि अटळपणे भिरभिरणारे
हे वेगवेगळ्या जनुकांचे स्थिर नकाशे
जे असतात या महानाट्याचे जनक
त्याचे म्हणणे असते वेडे आहात नाट्य नका बघू
अवकाश बघा
--- ००० ---

तोवर

मेंदूतले आठवणींचे झरे कोणते
आणि प्रत्यक्ष भेदणारे किरण कोणते
याचा निर्णयच होऊ नये
असे हात पाय डोळे जिवंत
आणि श्वासाश्वासात
पसरलेले भावनांचे घोष

खरे तर याची कारणे
असतात दूर आणि जवळ
जणू अभेद आणि अभेद्य

हा छळ की छप्पर फाड के
कोसळणारे हवेसे विचारव्यूह
की ताबाहीन रहदारी की
असणेच जॅम करणारे
पंख फडफडवत
आकाश व्यापून टाकणारे
कधीतरी घडून गेलेले
आणि आताही पुन्हा घडणारे
तेच अमर क्षण

असेच तिकडेही
उडत असतील का पतंग
अशीच सतत उपस्थित
संक्रांत साजरी करत

नवरात्रींच्या नऊ रंगांची
भक्ती करावी की
नुसतेच स्मरण करत राहावे
अधार्मिक

मर्त्य असणे तर आहेच
कधीही पण असे आत्ता
अस्तित्वातच नसलेले क्षण
जगत तोवर हवासा अंधार होत
--- ००० ---

कपाट

विश्वास नका ठेवू
फेटाळली ना
आज कुणाची कुचेष्टा
तू जुने बोलतो आहेस
कोण कधी मरणार
ते सगळे खोटे बोलतात
इथे एक साक्षीदार
प्लांट करावा लागेल
पर्यावरण पाळायलाच हवे
सत्याचा रंग लाल असतो
विमानात शेजारी कोण होता
तसे तर मग
बोलताच येणार नाही काही
शिक्षणाचा काय संबंध
मुंबईत जगले
म्हणजे जास्त शहाणे झाले का
पण तुम्ही बोला ना
अंधश्रद्धेशिवाय
यांना हे पटत नाही त्यांना ते
हा एक नियम पाळतो तीन नाही
तो नियम सत्राचा भक्त
मूळ उद्देशिका तरी बिनचूक हवी होती
आत्मविश्वास मात्र वाढत चाललाय
आणि मानसिक रोगांचे काय
मादक द्रव्ये आणि मादक विचार
तू जग त्याच्या रूपात
आणि तो जगू दे तुझ्या
ना चॅनेल ना वृत्तपत्र
संस्था सिनेमा समोसा
काहीही कसे हवे ते ठरवा आधी
एकमत नसेल होत तर बहुमत बघा
तेही नसेल पटत तर बोंबलत बसा
शिस्त लावता येईल असे म्हणत
शेवटचा दिवस आला तुमचा
निदान कपाट तरी आवरा आणि मग मरा
--- ००० ---

पाणी

हे होण्या आधी
ते झालेच नव्हते
तरीही त्यांनी असे केले
की जो त्यांना अधिकारच नव्हता

जोवर याचा निर्णय नाही होत
तोवर यावर बोलता येणार नाही
त्यासाठी एका ठरलेल्या मुदतीत
त्यांनी यावर आधी
निर्णय घ्यायला हवा

असे असे घडलेले असल्यामुळे
ते तसे तसे आहे
असे म्हणता येणार नाही

मुळात कायदा असे म्हणत असेल तर
आपोआपच आमची बाजू ग्राह्य ठरते
आता नवीन कायदा कोणताही
लगेच कुठून येणार

असे होण्या आधीच
त्यांनी तसे केल्याने
बहुमताच्या तत्त्वाप्रमाणे
पुढील घटना घडलेल्या आहेत

एक अपात्र दुसऱ्यांना
अपात्र ठरवू नाही शकत
त्यामुळे मुळात
पात्र कोण आणि अपात्र कोण
हे ठरल्याशिवाय
पुढचे निर्णय होऊ शकणार नाहीत

एक ब्रेक मग लंच ब्रेक आणि मग पुन्हा एक ब्रेक

सर्व संबंधितांनी वेळोवेळी पाणी पीत राहणे
हे आरोग्यासाठी अत्यावश्यक आहे
--- ००० ---

हॉटेल मॅनेजर्स

कुणाच्या ना कुणाच्या
विरोधात असल्याशिवाय
तहानच न लागणारे
नरड्याची वासलात लावून घेतलेले लोक
असतात हॉटेल मॅनेजर्स
अशीच गिऱ्हाइके शोधणारे
ज्यांना झालेले आहेत गुप्तरोग

विरोधच नसलेल्या क्षणाला
ते घाबरतात जणू ती एक
विषारी विश्वमोहिनी असल्याप्रमाणे
कारण तिच्यामुळे खात्री तर जातेच
पण जगण्याला खोटेपणाचा कलंक
लागेल म्हणून सर्व पितर आरडाओरडा करतात

उ:शाप म्हणून सगळे शिरतात
पक्षीय सत्कारसमारंभात
आणि आईस्क्रीम खाता खाता
ते म्हणतात गाणे
आई थोर तुझे उपकार

हिरड्या सडल्याप्रमाणे
त्यांचे शब्द सदोदित
प्रदूषित करतात पाण्याचे साठे
सर्वांना कुठे मिळणार संधी
कोणत्याही माध्यमातून
ओकत राहण्याची

सामाजिक राजकीय धार्मिक
आर्थिक तात्त्विक वैचारिक
भावनिक वगैरे असतात त्यांची गाऱ्हाणी
लहानपणी आईने
भांग पाडून दिल्यापासूनची

बॉस म्हणतो उभे राहा
बॉस म्हणतो रडा किंवा
आता मात्र राडा
तर त्या त्या वेळी कपडे बदलून

ते स्वत:चे आरसेही बदलतात

ही हिंसा आपले मन
घरीही आणते याने संतापून
ते ओततात पेट्रोल
स्वत:च्या घरादारावर आणि हसत
हसत म्हणतात प्यार दे प्यार दे प्यार दे रे
किंवा हम हैं राही प्यार के
--- ००० ---

निरर्थक

ग्राहक : मला निरर्थक हवेय चित्र गिचमिड नकोय
चित्रकार : निरर्थकात मुलायम आणि गिचमिड असा फरक नसतो
ग्राहक : मास्टरी दिसायला हवी नवखेपणा नको
चित्रकार : निरर्थक असेल तर ती मास्टरीच असते
ग्राहक : आकार ओळखू यायला नकोत मग मन त्यांतच अडकते
चित्रकार : आकार असोत नसोत ते विलीन होतात
ग्राहक : रंग प्रक्षुब्ध करणारे नकोत
चित्रकार : निरर्थकतेत तर विचारच नसतात
ग्राहक : घरात लावायचेय चित्र
चित्रकार : निरर्थकता वेगवेगळी नसते
ग्राहक : पण ही निरर्थकताच आहे हे मी ओळखू कसे
चित्रकार : ती मलाही नाही ओळखता येत
ग्राहक : विचारपूर्वकच तर दिसतेय काढलेले चित्र
चित्रकार : तीच तर मास्टरी माझी नव्हे कुणाचीच नसणारी
ग्राहक : निरर्थकाने मन शांत व्हायला हवे
चित्रकार : असे ठरवून काहीच नाही होणार
ग्राहक : मग रंग रेषा तरी कशाला
चित्रकार : तोच तर असतो अवतार
ग्राहक : इतकी उत्तरे का देता निरर्थकतेवर
चित्रकार : निरर्थकता समजावी म्हणून
ग्राहक : आश्चर्य आहे ती कशी समजेल
चित्रकार : चित्र तुमच्या असण्यावरच हल्ला करेल
ग्राहक : ही तर हिंसा झाली
चित्रकार : अर्थात तुमच्यातले अर्थ नष्ट करावेच लागतील
ग्राहक : म्हणजे रोज ही निरर्थकता आमच्यावर प्रभाव टाकत राहणार
चित्रकार : म्हणजेच सगळे प्रभाव घालवत राहणार
ग्राहक : तुम्ही लागलेल्या सामानाचे फक्त पैसे घ्यावेत
चित्रकार : का
ग्राहक : निरर्थकतेचे कसले पैसे
चित्रकार : हे निरर्थकतेचे नाहीत पैसे ती अमूल्य असते
ग्राहक : मग एवढे कसले
चित्रकार : जिवंत राहून तुम्हाला मृत्यू देण्याचे
हिंसा नष्ट करण्याचे
तुमच्या हिंसक अर्थांना समाधी देण्याचे

--- ००० ---

पुलाखालून पाणी

आरेसेसच्या चहात
आलेला पूर
खुशामतीत मस्तकात
गेलेली कळ
कुणाचे कोण
कोण जाणे

रक्तात न्हालेली
पुस्तके
आज नाही तर उद्या
तुमचे पांग फेडतील

उल्हसित होणेच बरे
तुमचे वा कुणाचेही
नातेवाईक
असले कम्युनिस्ट
तरी
थिएटरमध्ये प्रवेश
मिळणारच

भांडण्यापेक्षा
आरामात जाऊ द्यावे
पुलाखालून पाणी
आणि चिंतनात राहावे
येणाऱ्या सणाच्या
--- ००० ---

शाळा

तारणहार होण्याची इच्छा असलेली माणसे
आपापल्या पिंजऱ्यांतून ची ची करत
चर्चा करतात सप्तर्षी या विषयावर
तसले काही नसते तर सहज होऊ शकली असती
अपेक्षित सकाळ या एकमताच्या शक्तीवर
ते भरभरून प्रेम करतात एकमेकांवर

वर्षानुवर्षे विचार करणारी माणसे मागतात किमान सुविधा
ज्यांना रक्ताच्या उलट्या होताहेत त्यांचे शर्ट
तातडीने शिवले जावेत आणि बटणे
असावीत स्टिंग ओपरेशनला उपयुक्त

अशा मागण्या एका ठिकाणी साठवण्यासाठी
असतात काही स्त्रिया उत्तम यष्टीच्या
त्याच जातात रोज स्तनपान देऊन
त्यांच्या पिंजराबद्ध मुलांना
त्यांच्या स्तनांतून पाझरते
विश्वाचे आर्त यासाठीच निव्वळ
त्या अनेक मंडळांवर होतात अध्यक्ष
ज्यांच्या सह्यांशिवाय पानही नाही हलू शकत
घाबरलेल्या झाडांचे

मुलांचे सर्कशीतले मित्र येतात जेव्हा बागेत
त्यांना पाहायला तेव्हा नजरेनेच होतात त्यांच्या गळाभेटी
मूक कारस्थाने शिजतात टेलिपथीतून
पण नुसतीच केळी देऊन ते जातात निघून हसत
बिचारे विदूषक जातात फरफटत त्यांच्या मागे

जगाचे भले करण्याच्या ब्लू प्रिंट
फडकावत पिंजऱ्यांतली माणसे
एकदा सुहानी रात ढल चुकी म्हणून खंत व्यक्त करतात
आणि मग सुबह जरूर आयेगी म्हणत डोळे पुसतात

अंगार ठिणग्या यांचे विचार उभारणारच असतात शाळा
कधी ना कधी सुबह का इंतजार कर या संयमाने
--- ००० ---

बेमालूम

वाट लागल्यावर जे म्हणाले
आता चालू विचार गोठवून
आणि आरमार सगळे
आरपार घुसवत जमेल तितके
कवितेतून अर्थ व्यक्त करण्याचा
फालतू उद्योग करणाऱ्या
शहर नियोजन विभागात

भूखंड जमा करण्यात
हातखंडा असलेल्या वेश्या अचानक
वेशीवर उभ्या राहतात याचा अर्थच
आता तुमचे अर्थ धोक्यात येत आहेत

सांगे वडिलांची कीर्ती
नावाच्या सिनेमात
काम करणारा हीरो
सदोदित रडू यावे असा हळवा होता

लोक म्हणत बिचारा
बेमालूम वाढला त्यामुळे
काही कळण्याआधीच अचानक
उडाला कारंजा

हजारो वर्षे जोपासलेले
नैतिक किल्ले
आणि तिजोऱ्यांच्या किल्ल्या
यांत तो मश्गूल असे
खात्रीने की कधीच नाही
जाणार आपण तो एक मूर्ख
या दालनात

तेच सवंग लोक जमत
पण पुढे सगळे गुंते येत
तेव्हा होई हड्डी नरम आणि तो
हरवूनही बडबडे शौर्यगाथा
--- ००० ---

गत

मला माहीत आहे तुम्हाला मी तुमचा नाही वाटत
महायुद्धे वा इथला स्वातंत्र्यलढा
बरेच दिवस न वापरल्याने विस्मरणात गेलेय ते सगळे
शिवाय जगाचा नकाशाही फारसा नाही लागत
अर्थशास्त्रच काय इतर कुठलेही शास्त्र वा तंत्रज्ञान
यांत मी ढ आहे आणि फारसे वाचायची मला
गरजच नाही वाटत ओळखीपाळखी वाढवायचीही

मग राहते काय आपली वेगवेगळी सुखदु:खे
आवाज बोलण्यातल्या लकबी आणि कपडे
आणि आवडी समजा

सॉरी विचारांचा उल्लेख हवाच ना तेही मी
अमूकच असे धरून नाही राहात तुम्ही म्हणाल
मी आत्मकेंद्री आहे पण मी मुद्दाम काहीच नाही करत
याहून वेगळे म्हणजे तुम्हाला योग्य वाटते ते किंवा त्यांना
तसे मला जमूच नाही शकणार मला वाईट
जगायचेय असे नाही पण तुमच्यासारखा वा त्यांच्यासारखा
कोण करणार मला आणि मुख्य म्हणजे
दुसऱ्या कुणासारखे तरी व्हायची मला भीतीच वाटते
मग मी कुठे असणार म्हणजे माझी गत
मी जगाच्या विस्मरणात जाण्याचीच होणार

खरेच मला शक्य नाही भिडेलाही पडता नाही येणार बळी
तुमच्याशिवाय वेगळे तुम्ही काहीतरी होऊन दाखवा आधी
आपापले रेटत राहावेच लागणार आणि जगात मुळात
न्याय नाहीय एकसारखेपणा तर नाहीच आहे

त्यापेक्षा फावल्या वेळात हितचिंतक होत राहू
तुमचे माझे त्यांचे जगाचे आणि सर्व लढ्यांचे
--- ००० ---

नवेपणाची गर्दी

अघोरी उपाय
म्हणजे हवा
एक
नवा मूड
एकटा पण
अकल्पित
टेबलखुर्ची उद्यानात लपलेली

आता इथून
उगवेल विचाराची वेल
आणि वेळेवर
सुरू होईल भांडण

विकारांचे संमेलन
अध्यक्ष प्रतिगामी

मराठे असोत
की असो तीन दिवस
पाणीपुरवठा बंद
मनाचे रोग टाळणारे हे घ्या
सात उपाय
आणि मेरे हाथोंमें
नौ नौ
सेक्सी पुस्तके

याला व्याप न म्हणता
समजून घेतले जावे
जशी ड्रेनेजमधून
नवेपणाची गर्दी

पहिल्या संभोगापूर्वीचे
देवदर्शनच जणू
पुलाखालचे दारिद्र्य
विमानाने पाठवून घरी
परतल्यावर घामेघूम
--- ००० ---

बायको

आज की रात तेरे जिंदगीकी आखरी रात होगी
कल का सूरज तू नही देख पाएगा
हा संवाद युगानुयुगे जतन करणारा समाज
या ना त्या कारणाने
जात राहतो आक्रस्ताळ्या रेल्वेतून दिल्लीला
सुभाषितांचे पुस्तक वाचत अविरत

आपली बायको प्रेमळ झाली की झाले
तोच आहे जगातला एकमेव प्रश्न
या निर्धाराने चेहऱ्यावर
सर्वज्ञानी असणारे सर्व सज्जन
सांगू पाहतात निसर्ग सुंदरच असतो
तो दिसण्यासाठी आधी
असावे लागते बायकोशी
जागतिक सर्वव्यापी संधान

सकाळ म्हणजे असते
वाईटाचा नाश करण्यासाठी
पडलेला प्रकाश
आधीच माहीत असलेले वारंवार जगण्यासाठी

फुटकळ डोळे आणि
हवे तेवढेच ऐकणारे कान
हे तर प्रवासात नेहमीच
हाताशी असणारे सामान

आपण इतके झिजलो रक्त आटवले
हाडांची काडे केली पण साली
डोंगरदऱ्या तर सोडाच पण साली
एखाद्या गल्लीबोळातही कुठे जाणीव नाही दिसत
बॅटन पुढे नेणाऱ्या एकाही पटूची
जो उजळू शकेल आपल्या मनाचा अवकाश
आणि देशाचे भवितव्य

विनोद करावा तरी भीत भीत
हलकेच घ्या हं असे विनवत
पहिल्याच दिवशी पगाराचे पाकीट
मारले गेल्यासारखे आयुष्य

संत चोखा मेळा यांना ऐकू यावा
प्रत्येक दगडातून भक्तीचा आवाज
तसा आशावाद घुमवत
होईल बरे घडेल काही
येईलच पहाट म्हणणारे
मादक द्रव्ये प्राशन केलेले घर

प्रचंड आत्मविश्वासाने
बलदंड होऊ पाहणारे
खलीसारखे शेवटी
जाहिरातीत सिमटलेले
कृतार्थ समाधानी तुष्ट दुःखी

दुष्टांचा नाश झाला की झाले
युद्धे थांबवली की झाले
भेदभाव घालवले की झाले
जो जे वांछिल तो ते लाहो
असे झाले की झाले

असे सर्व हिताचे विचार
घेऊन दिनरात्र
संसार संभाळत
पिकनिकला गेल्यासारखी गाणी म्हणणारे
पिसे निघालेले खुश
मुलांचे प्रवेश घेऊन झालेले लोक

अहंकार तो नासा भेद
असे म्हणणाऱ्याला निवडून आणून
व्यवस्था बदलली की झाले
मग होई ना का तो स्वत: कितीही गब्बर

पण तरीही बायको प्रेमळ
असणे अत्यावश्यक असणारच साले
त्याशिवाय जग चांगले असूच नाही शकत
यावर सौहार्दपूर्ण एकमत असलेले सहिष्णू लोक
--- ००० ---

उस

उस
वलेली उसंत
पसंत घनघोर फस
लेला फास

वास अ
द्वितीय मृग क
स्तुरी जनाब म्हणत
उडालेले स्वा
स्थ्य ठरवून उत
रावा पतंग वा गुढी कु
ठलेही मनाचे व्याप अस
णार परांपराच हे विस

रून अनवधानात त्या
तही डोस लावून मातब्बरी
हलवा हे सगळे सा
मान जाऊ द्या तेल

लावत स्वभावाचे शि
फारसपत्र दिलेले ग्रंथा
लय व्यवस्थापकाने म्ह
णजे ग्रंथापालाने गो
ळीबंद समारोप म्हणून

आता नाही मागे
वळून पाहणे सो .... पान फक्त मा

दक
कधीही उकरा ही हा
राकिरी प्रयत्नाने खूप सा
पडेल जगण्याचे सा
र्थक मूल्य कृ
तार्थता आणि सि
नेमा पाहात नेमाने जा
णे विद्युत दाहि .... नीत .... नीट
--- ००० ---

मार्गारेट

मार्गारेट या नावाची
कुणी स्त्री वा मांजरी
माझ्या ओळखीत नाही
किंबहुना माझा तसा
प्रयत्नही नव्हता

असती तर तिने
प्रेमाने पाहिले असते
की बोचकारले असते
याची कल्पना
तरी मी कशी करणार

असती तर ती
गोरी आणि परदेशी
असती असे मात्र मला
माझ्या सवयीतल्या
माहितीवरून वाटते
पण तसे तर आता जग सपाट
झाले आहे कुणीही कुठलेही
पाणी पिऊ शकतो

असती तर तिचे वय काय असते
तरुणपणी
मांजरीचे आणि स्त्रीचे वय
सेम कसे असेल
नाही तरी नाहीच आहे
तर आपणच आपल्या
माहितीवर आधारित
कल्पनेने ठरवू तेच धरून चालायचे

तिला मी काय म्हटले असते
मॅगी
छे छे
त्या गोऱ्या मांजरीला तरी शोभेन का मी
मीच तयार करतोय विषमता च्यायला
--- ००० ---

५९९

आधी ५९९ होते मी
लाईक देताच त्या कुणाचे
पूर्ण झाले सहावे शतक
खूप छान वाटले
विसावा वाटला
चला काही ना काही
पूर्ण झाले खूप
बरे वाटते असे काही
पूर्ण वाटणारे घडणे

अपूर्ण वाटणाऱ्या
१०० कहाण्या स्थगित
झाल्या तात्पुरत्या
चिडचिड थांबली क्षणभर
हाच मूड
टिकवावा कायम

या विचारानेच पुन्हा
लोटले
अपूर्णतेच्या खाईत
मनातले घडयाळ
बंद पाडत

प्रमाणपत्र असावे खिशात
पगार असावा हातात
प्रेयसी हुकमी
आणि जग पूर्ण
बोंबलत गेलेले

बास आता काहीच नको
मृत्यूच यावा भोसडीचा
या क्षणी

तेवढ्यात दिसते तेच
६०१ झालेले आणि घाम फुटतो
--- ००० ---

घटनाकार

ज्योतिषांना भेटणारे सश्रद्ध
आणि महत्त्वाकांक्षी अश्रद्ध
सगळेच महान घटनाकार
घडवत जाणारे
आपापले जगणे
भाषेला सिकुडवत

उन्मळून पडलेली झाडे
आणि तापट बाप
यांच्यामुळे
हे अभ्यासू नाही शकले
ज्ञानेश्वरी
आणि आताही
घटनांची वास्तव
सलगता नसेल तर
भिरकावून देणारे घरातली भांडी
आणि आपटणारे जगातली दारे

हे लोक रडतात
भाषा जगवण्यासाठी
तिला जागतिक करण्यासाठी

काही असतात सनातन
द्वंद्वात
ज्या भाषेने आम्हाला नागवले
ती मेली तर मरू दे
असे म्हणत त्यांना
हवी असते कवी म्हणून ओळख

भाषेला ते कामाला लावतात
काय घडायला हवे
ते सांगण्यासाठीच फक्त
ती असायला हवी म्हणतात

कुठलीही भाषा मरताना
अशा घटनाकारांना घेऊनच बुडणार ना
--- ००० ---

** तही ** असते

भूमिका नसणे
हीही एक भूमिकाच असते
स्वस्थ असणे हीही एक अस्वस्थताच असते
शांतता हेही एक युद्धच असते
एकसंधता हीही एक विदीर्णताच असते
धर्म हा एक अधर्मच असतो
प्रेमातही द्वेष असतोच
सगळीकडे राजकारण असते
मैत्रीतही डाव असतात
निष्ठेतही व्यभिचार असतो
** तही ** असते

चांगल्यातही वाईट असते
आशेतही निराशा असते
संतुलनातही खिन्नता असते
भोगातही रोग असतो
आळस हाही एक उत्साहच असतो
बोंब झाली तरी आनंदच असतो

तुम्ही बसलात तरी उभेच असता
उत्तर विरचनेचे तुम्ही बापही असता
आणि अपत्यही असता

प्रतिमा असणेही अमूर्तच असते
ओळखही स्मृतिभ्रंश असतो
जोडणेही फूट पाडणेच असते
सुरक्षेतही धोका असतो
निर्भयता म्हणजे भीतीच असते
सौंदर्य म्हणजे घाणच असते

ओकारी हा आहारच असतो
तिरस्कार हाच व्यवहार असतो

विचाराचा त्याग हाही एक विचारच असतो
वगैरे सर्व वाटणाऱ्यांना शुभेच्छा ! म्हणजे
अशुभ नसलेल्या शुभेच्छा ! धन्यवाद !
--- ००० ---

काहीही कितीही

अरे ती स्वत: नागिनच असते ना
ती फक्त मानवी स्त्रीच्या रूपात आलेली असते
त्यामुळे ती नागाला घाबरत नाही
उलट प्रेमाने बघते त्याच्याकडे
खरेच असू शकते असे ?
हो मनाचे काहीही कितीही
खरे असू शकते
माझेच घे ना
एकदा स्वप्नात मी नाग झालो होतो
तर मानवी स्त्रीवर मी प्रेम करत होतो

पण नागाला कसे कळते की हे असे आहे ते ?
अरे तोही तर
दहा जन्मांपूर्वीचा माणूसच तर असतो
एका स्त्रीवर बलात्कार
केल्याच्या पापामुळे आता तो नाग झालेला असतो
आणि ती बलात्कार झालेली स्त्री
बिचारी
पुन्हा पुन्हा होत असते मानवी स्त्री

पण कशाला करायचे एवढे उपद्व्याप ?
नुसते खाऊन-पिऊन मजेत राहावे ना !
मग ते कसले लाईफ
आणि आताही
आपण पापे नाही करत का

पण त्यांना शिक्षा होते किंवा
ते सुटतात मग संपला ना हिशोब ?

वेडा आहेस काहीही
संपण्यात कसली आलीय मजा ?
मन चालूच राहायला हवे
मजा नाही आली तरी चालेल
पण दु:ख तरी चालू हवेच

कळली का आता नाग होण्यातली मजा
--- ००० ---

दु:खमुक्ती

रोषणाई डोळ्यांवर येते
फटाके कान फाडतात
नुसत्या पळवाटा
कुठेतरी रमत झोपण्याच्या
संध्याकाळी
बार बार बार
आणि सिगरेटी
आणि त्या देशात माजी अध्यक्षाला
हाताला धरून बाहेर काढले जाणे
महाराज महाराज महाराज
करत उन्मादी झेंडे
ठराविक दिवशी
ठरलेल्या ठिकाणी गर्दी करणे

देवाची असो की कुणाचीही
पूजा लांगूलचालन याचना
भव्य प्रतिमा उत्कट किल्ले
व्यक्तिमत्वांची शिल्पकार
संग्रहालये वाचनालये

आपलेच व्हावे विजय
ते नालायक आहेत

रीतिरिवाज परंपरा
यात्रा
विद्रोहाची आंदोलने
काही ना काही तर
होईलच साध्य या सगळ्यांतून

मुख्य तर दु:खमुक्ती कोण वाचतो बुद्ध
त्यासाठी आणि नसेल तर तीही
एक पळवाटच

तीच मुख्य तिच्यासाठीच तर नसतील
बाकीच्या सगळ्या पळवाटा
--- ००० ---

सत्याची गरज

सत्याची गरज भासतेच ना
कधी ना कधी जरी लोकशाहीत
अमूकच एक सत्य असे नसले तरी
काहीजण खूप
माहितीचा अभ्यास करतात
तर काही विसंबतात सामान्य प्रभावावर
तोही वैयक्तिक

कुणाची मते सत्य यावर भांडणे होत
ते लोकशाहीचे भूषणच समजले जाई

यावर एक परदेशी संशोधकांची टीम
नियुक्त करून मतांचे सत्य शोधायचे ठरले

त्या संशोधनाची प्रक्रिया आता उपलब्ध नाही
पण निष्कर्ष सगळे सुरक्षित आहेत मतांसारखेच

काही माहितीवाल्यांची मते
काही सामान्य प्रभाववाल्यांशी जुळतात
तर दुसऱ्या काही माहितीवाल्यांची मते
दुसऱ्या काही सामान्य प्रभाववाल्यांशी जुळतात

हे निष्कर्ष पाहून सर्वच
सामान्य प्रभाववाले खुश झाले रिलॅक्स झाले
खूप अभ्यासाची वा त्याच्या अभावाच्या
न्यूनगंडाची काही गरजच नव्हती
सामान्य प्रभावांवर आधारित ते
एकमेकांना शिवीगाळ करायला पूर्ण स्वतंत्र होते

पण माहितीवाले बेचैन झाले कोणती माहिती
योग्य आणि अत्यावश्यक यांवर ते भांडू लागले
नंतर तेही शिव्यागाळीवर आले

एक माणूस एक मत ही लोकशाही हवीच
मग मते निर्माण करण्यासाठी सायबर प्रभावही ठीकच ना
--- ००० ---

चेहरा

प्रत्येक वस्तू त्रासलेली का दिसते
या विचारात असताना आकाशातून
पक्ष्याने विधी केला डोक्यावर
एका झाडाची पाने घेऊन
डोके साफ केले बाहेरून
तरीही बदल काहीच नव्हता वाटत
नुसताच चेहरा बदलत चाललाय झाले
--- ००० ---

प्रेरणा

एका स्त्रीवार कसे प्रसंग येत गेले
आणि ती कशी जिद्दीने
समाजाचा विरोध पत्करूनही
त्यांतून बाहेर पडत गेली
याचे अचंबित करणारे
सागवानी कपाट
असे तिचे आयुष्य होते

तिचे नाव प्रेरणा नसले तरीही
इतर खूप स्त्रियांनी
तिच्याकडून प्रेरणा घेतली
काहींची मात्र इच्छा असूनही
त्यांची जिद्द कशी कमी पडली
याच कहाण्या त्या निर्माण करू शकल्या
जंगली लाकडासारख्या पावसाळ्यात फुगणाऱ्या

तिचे नाव प्रेरणा नसूनही ती इतकी
प्रेरणादायी ठरल्याने प्रेरणा नावाच्या स्त्रिया खजील झाल्या
उलट त्यांनाच प्रेरणा घ्यायची वेळ आली

त्यात एक भाग असा होता की
दिसणे हेच काही सर्वस्व नसते
मन सुंदर असले की प्रभाव पडतोच
आणि काही विशेष पुरुषांना खरे तर
मनाचे सौंदर्यच भुरळ पाडत असते

याला एक वेगळीच कलाटणी मिळाली
बाहेरच्या मेकप प्रमाणेच
मनाचा मेकप कसा करावा
याचे क्लासेस निघू लागले

जिद्द प्रेरणा बाहेर हलकासा मेकप
आणि आत मनाचा मेकप
हवाच असे सर्वच लाकडांना पटू लागले
शिवाय शिक्षणाने आयुष्याला
जमेल तेवढे पॉलिश लागणारच होते
--- ००० ---

मान्य

पाऊस पडतो आहे वा ऊन पडले आहे
हे मान्यच करावे लागते आपला अपमान झाला आहे
वा आपण नाराज आहोत वा आपण
पाचशे लाईक्समुळे खुश आहोत हेही
मान्य करणे हेच आयुष्यभर
दुसरे कामच काय आहे
--- ००० ---

प्रगट दिन

माझ्या  काही मैत्रिणी माझ्या वाढदिवसाला
माझा प्रगट दिन म्हणतात गंमतीनेच
असणार हो म्हणून आणि त्यांच्या भावनांचा
आदर म्हणूनही मी ओशाळत नाही
ते हसत स्वीकारतो

हे पाहून काही मित्र की शत्रू ते माहीत नसलेले
बहुतेक उपरोधाने मला महाराज म्हणतात
हसत हसत म्हणजे गंमतीनेच असल्यासारखे

हा सगळा गोंधळ माझ्या
लेखनामुळे होत असावा
त्यावरूनच मला असे गंमतीने
आणि आदराने असे
धार्मिक क्षेत्रात ढकलले जात असावे
प्रत्यक्षात मी फारसा बरा नाही
हे मी जाणून असतोच ना
तसेच माझे यालाच जोडून तार्किक
मत मी मांडत असतो की बाबा
कवी कसा आहे ते जोखून
नका वाचू त्याची कविता
आता पिकासो बऱ्याचजणींच्या
प्रेमात पडायचा म्हणे
आणि ते जर तुम्हाला अनैतिक वाटले
तर चित्रे जाणारच की मग त्याची गाळात

उलट वाचक जर स्वत: ओपन हार्टेड असेल
तर कवी कसाही असो त्याची कविता
त्याला ग्रेट जाणवू शकते यात काय वाईट आहे
आणि तोच जर समीक्षक असेल तर
ती कविता का ग्रेट आहे
हेही तो सांगूही शकेलच ना
अहो मी नाही असा ग्रेट
हे कवीने कशाला म्हणावे
या ज्ञानामुळेच तर माझा प्रगट दिन
मी चालवून घेतो
--- ००० ---

कंदील

वाटले कविता लिहावी
शेजारच्या बांधकामाचे आवाज
ओसरत नाहीत तोवर
तापत ठेवावे दूध
समशीतोष्ण राजकारणात

लोक माझे हेतू ओळखतात
आणि त्या हेतूंचे आरोप करतात
माझ्यावर अनेक कलमे लावत

म्हणजे चांगले हेतूही
माझ्या घरचे पाणी भरण्यासाठी असतात
आणि मला तर
सुनसान वागणे म्हणजे कसे
असते हे कोणत्याही तानेतून
नाही सांगता येणार

म्हणजे मी एकटाच राहू
की दिसूच नको कुणाला
पण आमटीशिवाय
माझे जेवणाचे पानही नाही हलत
हे तर जगजाहीर आहे ना

अगदी लहानपणी कंदील
वापरलेले मी पाहिले होते आता
आमच्या घरातून दिसायची लांब
समुद्राकडे एक लाल दिव्यांची रांग
कुणी म्हणत ते आकाशवाणीचे आहेत
कुणी म्हणत विमानांचे दिशादर्शक

म्हणजे प्रत्येक वेळी मीच नेस्तनाबूत व्हायचे
ही कुठली पद्धत

निश्चित असे काहीच नाही वागायचे
हे मी आता ठरवतो आहे
मरू दे तिकडे माझा अहंकार
--- ००० ---

व्यवस्था

त्याने मारलेला गुद्दा हीरोने चुकवला
झटकन उलटे फिरून त्याने त्या गुंडाच्या पाठीत
कोपर मारले तो सावरतोय तोवर उंच उडी मारून
त्याच्या टाळक्यात लाथ हाणली तर तो
जाऊन भिंतीवर आपटला ग्रेट साले
साऊथ इंडियन मुळात मराठीत असली मारामारी
जमणारच नाही आणि मुख्य म्हणजे ती खोटी वाटेल

हे पाहून मी बाहेर पडलो आणि गेलो
एका इराण्याच्या हॉटेलात तर तिथे चार
शबनमधारी मित्र सामोसे खात बसले होते
समोर टीव्हीवर चालली होती सगळी हकीगत
रशिया-युक्रेन युद्धाची जबरदस्त
क्षेपणास्त्रे रणगाडे विमाने आणि धडाधड सगळे
पडत्या इमारती धूर धूर धूर नुसता आणि पुतिन बोलतोय

आता अन्नधान्याचा करार बारगळला होता
अन्नाचीच बोंब होणार होती

तेवढ्यात ते चीन उत्तर कोरिया वगैरे दाखवायला लागले
कडक कटिंग केलेला जाड्या निष्पाप हसत होता भयानक
अण्वस्त्रांचा आत्मविश्वास होता साल्याच्या चालण्यात

युक्रेन भारी पडत होता रशियाला च्यायला
इतर कुणी मधे पडले तर अणुयुद्धच होईल
म्हणाला होता शांत सज्जन पाताळयंत्री तत्त्वशील पुतिन

हे असले काही झाले तर वाटच लागेल एकजण म्हणाला
मूर्खपणा आहे च्यायला किती हा खर्च आणि विध्वंस
दुसरा म्हणाला मग तिसरा म्हणाला व्यवस्था बदलायला पाहिजे
आणि आंदोलन कुठे करायचे चौथ्याने विचारले कुणाकुणाला
आणि कसे द्यायचे निर्भय आव्हान ते काहीही असो आपण आपली
इथली व्यवस्था बदलण्याचे संघर्ष तर चालूच ठेवायला हवेत
चळवळी बंद पडू द्यायच्या नाहीत जग फक्त
सर्वहिताच्याच मार्गानेच जायला हवे असे म्हणत
वेटरला त्याने चार बोटे दाखवली चहासाठी
--- ००० ---

झुल्पे

त्याची झुल्पे डाव्या डोळ्यावर येत
त्यामुळे गाताना त्याला मधून मधून
मानेला डावीकडे झटकावे लागे
म्हणजे थोडा वेळ त्याचे डोळे मोकळे राहात

त्याचे गाणे ऐकताना श्रोत्यांना
हे सारखे पाहावे लागे
त्यामुळे गानसमाधी भंग पावे
एकीकडे गाण्याचा आनंद
आणि दुसरीकडे हा डावा उपद्रव
असे त्रासदायक चाले

तो म्हणे मी माझी इमेज क्रिएट करतो
जगात इमेज कशी त्रास देते हे कळत कळत
माझे गाणे ऐकले जायला हवे
नुसते गाणे काय कुणीही गाईल
--- ००० ---

सिक जग

गोळीने झोप

गाणे घरंगळते

नाकतोड्याच्या
डोक्यावर मणी

वासराचे मन

माझे
काहीसे धूसर

हवेनको
ओझरती
रहदारी

उद्या ऐवजी
सुपातले सर्व

स्वर्गवासी
कुणीच नाही होत

अधांतरीचे पाहुणे
शेजारी

आवाजहीन
भांडखोर

घाई नाही
होऊ द्या तुमचे चिंतन

मी रजेवर आहे
सिक जग

माझीच जुगलबंदी
फुटीर पण सौम्य
--- ००० ---

अवकाश

शिवकुमार आणि हरिप्रसाद
चालले होते अप्रतिहत
गुंतागुंतीच्या गणिती जंगलातून
नेमका काळ त्यांना माहीत होता
दोन मिनिटांनंतरचे नेमके
भविष्य आकारात होते
आणि त्यांच्याबरोबर होते
तीन तबलजी

प्रत्येक क्षण जिथल्या तिथे
रचत वेगात निश्चिंत

श्वास रोखलेले
डोळ्यांत आनंद
शरीरे आता
जे होईल ते होईल अशी
प्रतीक्षेत

आणि अचानक
सर्वजण
नेमक्या क्षणी आले
नेमक्या बिंदूवर
आणि मोकळे होत
किंचित स्मित करत
त्यांनी हात मोकळे सोडले
गणित सुटले होते
एका क्रांतीतून
मने असण्यातून
मने नसण्याच्या

अवकाश अचानक अमर्याद
मोकळा जाणवून अत्यानंदाने
टाळ्यांचा कडकडाट झाला

प्रत्येक क्षणी असणारा मोकळा अवकाश
जगण्यात आला

--- ००० ---

तुमच्यासाठी प्रतिकविता

लाख तुमचे आयुक्त
उतरले रस्त्यावर
तरी तुम्हाला कळणार आहे थोडेच
की कुठून पडतोय हा इतका कचरा
डोक्यावर आणि डोक्याच्या आत
मग तुम्ही समाधानात तरी
राहू शकाल का की बाबा हे जग
चाललेय ते तुमची पेन्शन बंद पडू नये
या एकमेव उद्दिष्टासाठी
आणि मग जमल्यास
सर्वांनाच पाणीपुरवठा व्हावा
म्हणून म्हणूनच तुमच्यासाठी ही प्रतिकविता

जगात सगळे सुखात आहेत
इथे मराठीतच फक्त व्यापताप
फार थकवणारे तुम्हाला
लाळ गळत
मालिका बघून झोपा निवांत
बाजारबुणगे जगणे
हीच आहे तुमची निवड

शब्द कसे हवेत
ताल कसे हवेत
हे  ठरवण्याचे अधिकार
दिलेत तुम्हाला तुमच्या बापजाद्यांनी
सगळे अवयव झडत चालले तुमचे
तरी अजून माज नाही जात तुमचा
तुम्हाला वाटते तुम्हीच कणखर
सह्याद्रीचे कडे

नाहीतरी करायचे काय असते जगण्यात
या प्रश्नापर्यंत येणे
हेच तर सर्वोच पण तुम्ही नुसतेच
राजकारणाचे जातिवंत
आणि जातनिहाय शौकीन
म्हातारे होणारे
आपापल्या आणि जमल्यास
दुसऱ्यांच्याही जखमा चाटत
ट्विटरवर जाईल आपले आयुष्य आलीशान
असे समजणारे तुम्ही

गांडीवर लाथ बसताच
सुरुवात कराल न्याय मागायला

विठ्ठलचरणी मागणी काय तुमची
तर आक्रमक व्हायला बळ मिळू दे
आणि आमची लढाऊ विमाने जाऊ देत
अटकेपार

कोर्टाने स्पष्टीकरण मागवले की
फाटते तुमची आणि लगेच तुम्ही
मध्यप्रदेशातल्या अपघातावर तरी
बोलू लागता किंवा राजकीय
हत्या कशा रोखाव्यात यावर तरी
जणू काही
दिल्लीतल्या शाळा बंद झाल्यामुळे
जाते आहे पाणी
तुमच्याच नाकातोंडात
प्रदूषणाचे तुम्ही पुरस्कर्ते असूनही

पब हवेत तुम्हाला चोवीस तास
तहहयात चांगली वागणूक
देणाऱ्या पोलिसांप्रमाणे
आणि डंपरच्या धडकेत
कधीच होऊ नये तुमच्या
स्वप्नांचा आणि औषधांचा चक्काचूर

तुमचे सांस्कृतिक क्षेत्र
थांबलेले असते प्रोत्साहनासाठी
त्याच त्या दिवाळीपहाटा
आणि दूर राहिलेली घरे
तोषवतात तुम्हाला
खरूज खाजवल्याप्रमाणे

तुमचे चित्रपट सदोदित
चुकीला माफी देणारे
आणि पाचशे वर्षे चालणारी
तुमची एकच रड
राजकारणाचा आमच्या
मनोरंजनाला धक्का नको

तुम्ही सारखे अर्ज करत असता
आयुष्यभर
निर्णयांचा फेरविचार करण्याचे

वाचन आणि सेक्स एकच समजत
तुम्ही दिंड्या काढता
वाचसंस्कृतीच्या
पालखीत ठेवून
हॉटेल बुकिंग
आणि स्थानबद्ध नेत्यांचे फोटो

तुम्हाला आवडतात
सुवर्णमध्यांचे वृत्तांत
आणि विजयासाठी
होणाऱ्या धाकधुकीचे अनुभव
आणि पक्षीय सदस्यभरतीचे
निवडणूकपूर्व आलेख

त्यामुळे तुम्हाला कुणी
बिग सेलचे आकर्षण दाखवते तर कुणी
सरधोपट भावनिक कवितांचे
शक्य तो कधी कुणी कुणाला
डिस्टर्ब करू नये
हेच असते तुमचे मागणे
डीजेत नाचताना

बीजेत वा जेजेत प्रवेश अशक्य
संगणक दुरापास्त
म्हणून तुम्ही दुगाण्या झाडता
सरकारी नोकऱ्यांवर आणि म्हणवता
तरी आम्ही राजे
--- ००० ---

लाँग मार्च

आधीच सांगतो
माझ्याकडे सांगण्यासारखे
फारसे काही नसते
कारण ना मी तज्ञ आहे
ना कार्यकर्ता

तर यात्रा ही माघार
घेण्यासाठीही असू शकते
म्हणजे पुन्हा
शक्ती एकवटता येते
त्या शक्तीतून बाहेर पडलेले किरण
मग खूप दूरवर करू शकतात
यात्रा एकवटत एकवटत

अर्थातच यात्रा ही
कुणातरी विरुद्धच असणार
एकात्मता असल्यावर कोण च्युत्या
यात्रा काढत बसेल
ते सोडून उरलेले सर्व
असे एकत्र आले तरच मटणात मीठ
पडून मस्त येऊ शकते चव
पण शक्य तो ज्यांना कमकुवत वाटत असेल
तेच काढणार यात्रा
अहिंसक पण त्यांना अडवलेत तर
न जाणो अनुयायी बिथरले
तर काय होईल
असे वाटायला हवे असे असावे वातावरण

कमकुवत अपराधी अहंकारी
हिंसक आणि अहिंसक
असे सर्व भाव हवेत
पवित्र यात्रेसाठी
अत्यंत निरुपद्रवीपणे
उभा करता आला पाहिजे
आव्हानाचा माहोल
आणि समोरची पार्टीही
आततायी नसावी
पण मश्गूल असावी खात्रीत की
या यात्रेने काहीच नाही होणार

झाले असे की यशाने उत्तुंग
झाल्या मनस्थिती
आणि तिच्यातून निघालेली बाळे
गेली अमेरिकेत तिथे त्यांनी
करून घेतल्या प्लॅस्टिक सर्जऱ्या
नंतर त्यांनी बदलून घेतले
त्यांचे जनुक नकाशे मग
आणखी एक सोय असल्याचे कळले
नको असलेल्या आठवणी
खरडून फेकता येत होत्या
तेही केले पण मग वयाच्या मानाने
आठवणी कमी पडू लागल्या
निरनिराळ्या आठवणींची पॅकेजेस
उपलब्ध होती आकर्षक वेष्टणांतून
आणि तज्ज्ञांच्या अभिप्रायांसह
ज्यानेत्याने हवे ते घेतले
त्यासोबत एक
लॉटरी स्कीमही होती

मग त्यांनी कंपन्या काढल्या
काहीजण टांझानियाला गेले
आणि काहीजण मोझांबिकला
त्या त्या देशातली देशभक्ती
कमकुवत आणि न्यूनगंडयुक्त असल्याने
त्यांना त्यात वेगळीच खुमासदारी वाटली
इथेही विरोधाची शक्यता होतीच
पण वेळ येईल तेव्हा पाहू असाच विचार झाला

आणखी एक होता संतप्त
आणि इतिहासग्रस्त गट
त्याला मोठे व्हायचे होते
त्याने सरळ अंगारे धुपारे तीर्थ प्रसाद
रोषणाई आणि झेंडे सुरू केले
आपण संतप्त आहोत
तसेच आणखीही काही
वेगळे आहेत संतप्त
हे त्यांना माहीत होते पण
मंत्रशक्तीवर त्यांचा विश्वास होता
त्यांनी ढवळून काढले मैलोनमैल
पैसा आस्था निग्रह
नम्रता आणि अस्मिता
यांचे अजब मिश्रण झाले तयार
काहींनी संमती दिली

काहींनी मौन पत्करले काहींनी
कमकुवतपणा आणि न्यूनगंड पत्करला
एकीकरण  म्हणजे
अमुक न पटणारे बाकीचे
असेच तर असणार

काही वर्षे गेली
खूपच एकवटले मंत्र
म्हणून अणुशास्त्रज्ञ निघाले
आपसात फूट नको म्हणून
बाकीच्यांनी तरी एकवटावे
असा बूट निघाला

खूप निघतात अशा यात्रा जगात
यशस्वी वा अयशस्वी होतात
मी कवी असलो तरी
इतिहासाचा अभ्यासक नाही
त्यामुळे मला फार काही कळत नाही
हे जाहीर मान्य करणेच बरे पडते

ते नकोशा आठवणी खरडून काढण्याचे तंत्र
हाच असेल सर्व समस्यांवर उपाय असे मला वाटते
हे पटणाऱ्यांची एकी वाढवणे गरजेचे वाटतेय
पण खरे सांगू का
मला यात्रा काढायचाच कंटाळा आहे
आणि मी आत्महत्येच्या विचारांत मग्न असतो
असे मला वाटते
--- ००० ---

मालामाल

तुला जे जे वा ज्या ज्या गोष्टी अत्यावश्यक वाटतात
त्या सर्व असतात तुझ्या समस्यांची कारणे
हे नुसते तुला पुसटसे दिसताच
कविता जायला निघते
कशाला मग मी
असे ती म्हणत असली तरी
चालू शकणार असतात
कसेही पडले तरी
उद्याचे फासे
पण अगदीच

एकाकीपणा नको
म्हणून तू ठरवतोस
मरू दे तिकडे
चालूच राहू देत विचार सतत
माझ्या भोवती
रक्षणा ऐवजी
भीतीचे जाळे विणणारे
बघायचेच नाही
अगदीच
मरायचीच वेळ आली तर
जाऊ इस्पितळात
सरळ सांगू
मला भीती नको आहे
मला बाहेर काढा
यातून सध्या निदान

जे आकर्षक आहे
ते तरी राहील चिकटून
जळूसारखे का असे ना

पैसा मरू दे
कवितेचे कसे सुटेल व्यसन

धडाधड कोसळत राहतात वस्तू
नुसते उघडताच कपाट
घरदार आणि इस्पितळ
भरून जाते
मालामाल होत वेदनामय

भेटीची वेळ काय आहे
आज कोण कोण येतील
कोण करत असतील प्रार्थना
कुणाचे डोळे पाणावलेले असतील

या विचारांनी उठतात
दु:खाचे रोमांच सलाईनच्या कृपेने
--- ००० ---

धुके

धुके हे धुकेच असले
तरी प्रत्येक वेळी ते वेगळे असते
हे माहीत असून उपयोग नसतो
एकदा कळले की मी असा असा आहे की मग
कसले इंटरेस्ट राहणार
तुम्हाला माझ्या कवितेत
नुसतेच शब्दभ्रम आणि शब्दबहर
तुम्हाला किती भुलवतील

पण माझे तसे होत नाही
रुतून बसतच नाही मी कुठे
फतकल होणे जगण्याचे
हे आधी मलाच आणते
कंटाळा

मी आहे माझ्या अनिश्चिततेचा
आमरण शौकीन
कारण मुळात मला
आकर्षण आहे मृत्यूचेच
तो विषय काढताच
माझी प्रेयसी माझी कविता
माझ्या तोंडावर हात नाही ठेवत
अजिबात नाही काढायचा हा विषय
असे नाही म्हणत माझ्या प्रेमाने
कारण ती स्वत:ही
असते अनिश्चित

आम्ही दोघेही खेळतो
विनाशखेळ
आम्हाला नसते सोयरसुतक
जगाला काय हवेय याचे

मृत्यूचे भय हीच जिंदगी
असलेले असे वाचक
भडकतात आमच्यावर
--- ००० ---

आरती

गळ्यात घंटा बांधलेले सेलेब्रिटी
संध्याकाळी गायी हंबरत परताव्यात
तसे सदोदित कृतकृत्य
समोर आले तेव्हा मी
भलत्याच विषयावर बोललो
असे तर नाही झाले

अर्धवट वाटत राहते
तहान तर आहे
पण पाहू जरा वेळाने अशी अवस्था

मी मात्र बिनचूक असायला हवे
साल्यांना न्यूनगंड येत असेल
त्यांच्या क्षेत्रात शिरून
मी
एखाद्याची आरती ओवाळल्याने

काही मूर्ख
भिकारचोट बेअक्कल लोक
ताबा घेऊन बसले आहेत थिएटरचा
आणि म्हणताहेत तिथे
ते म्हणतील तेच
फक्त प्रबोधन होईल

या जगात जिंकत बसायचे
प्रयत्न करत बसावेत
इतके मला ते
सुपरसॉनिक स्कायस्क्रेपर
लैंगिक नाही वाटत

मी निघून जातो
त्यानंतर देतही असतील ते मला शिव्या
मी मात्र कोणतेही
आवाजाचे अलंकार नाही वापरत
रिकामचोट
--- ००० ---

तीच माणसे

स्वप्नात तीच माणसे
नावे बदलून येतात
शिपाई तोच पण नाव वेगळे
ऑफिसातले साधे नेहमीचे काम
तो माझ्या टेबलावर ठेवतो
मी ते करून त्याच्याकडे देतो
सवयीने ते तो
आमच्या स्त्री-बॉसकडे नेतो
ती सही करून पाठवते
मग येते लक्षात त्यात चूक आहे
मी ते रद्द करून तेच पुन्हा नव्याने करून पाठवतो
तोवर बाहेर ते ज्या स्त्रीच्या ऑफिसात जाणार असते
तीच काही कामासाठी तिथे येते
गोरीगोमटी स्मार्ट अनुभवी

च्यायला पहाट होत आली की काय
या स्त्रिया अजून इथेच कशा
हे बरे नाही
एवढ्याश्या चुकीमुळे इतका उशीर
पण हो जाता है
दोघीही जाणून असतात

घरी जाताना गर्दी खूप असते
एकदा एकाने सांगितले होते
की म्हणे सैन्यात घेण्यापूर्वी
लिंगावर टिचकी मारून
खात्री करून घेतात
ते तरतरीत असल्याची
पण इतके तरतरीत असणे
हे चांगले कसे म्हणता येईल

तेवढ्यात सिनेमा चालू होतो
ना मी कधी इतका व्यायाम केला
ना कधी वगैरे स्वप्नाचे जाऊ दे खरे तरी
खरे आहे का या विचाराने झोप उडते
--- ००० ---

पताका

बरे ठीक चला
एक तर दु:खाच्या
वा प्रेरणेच्या
वा बांधिलकीच्या
रिक्षातून जाऊ
प्रेम करायला

तुमचे डोके असो
की माझे
संगीत आवडते म्हणून
काही आपण
त्याला
पताका नाही लावणार

संतापून उपयोग नाही
हे कळले
की आपसूक
मिळतात प्युवर
खव्याचे पेढे

पण मग
या ऐवजी असणार
तरी काय
असा नुसता प्रश्न
विचारून
दाढी लौकर
थोडीच होईल

हा विचार नाही तर तो
वा आणखी एखादा पेपरवेट

तुलनाच नको ना
जय गंगे भागिरथी
हीच ठेवावी
प्रेमात पडण्याची रीत झाले
--- ००० ---

ठिय्या

आधी ठरवून केलेल्या
प्रत्येक गोष्टीला
म्हणायची पद्धत आहे
कारस्थान
मग मनाने ठिय्या
मारल्याला किती वर्षे झाली

तुला आणि मला
एकाच वेळी एकच त्रास
मूर्खा
सडेतोड दारे आपटणे तुझे
नुसती दहशत पसरवते आहे

तुझ्या शाळेच्या दप्तरात
आता वस्ती आहे सापांची
आणि तुझी स्वप्ने
आहेत अत्याचारी

रेल्वे रुळांवर
बसून लक्ष घेतोस वेधून
तेव्हा सांडत राहते दारू
तुझ्या मर्त्य देहातून
तुला फिकीरच नसते
स्ट्रोक येण्याची

पण आल्यावर मात्र होतोस
हवालदिल
म्हणजे मीच
आता कुठे बसल्या
जागेवरून पाठवू संदेश
की अजूनही आहे
बाळगून उमेद
हल्ला करण्याची
फाडून ठेवीन एकेकाला
कोथळेच कोथळे होतील सगळीकडे
--- ००० ---

लॅब्राडोर

आहे तरी काय या दुकानात
पाहू म्हणून जाऊ लागलो
तर मालकाजवळ बसलेला भला मोठा कुत्ता
भू करून उठून आला माझ्या दिशेने
मालकाने त्याला चुचकारले
म्हटले तुम्ही याला घेऊन बसल्यावर येणार कोण हो दुकानात
येणारे येतात तो म्हणाला काय हवेय
म्हटले आपल्याला उपयोगी काही आहे का ते बघायला आलोय
तर ते दुकान होते शंभर तऱ्हांचा खुराक प्रोटीन्स खनिजे वगैरेंचे
स्नायू हाडे बळकट करणारे तुमच्यासाठी म्हणाला प्रोटीन पावडर आहे
आले लक्षात खरे तर हे व्यायाम भरपूर करणाऱ्या तरुणांसाठी आहे हल्ली
पिक्कर पाहून मुली तेच शोधत असतील बहुतेक कुठल्या जातीचा आहे
मी विचारले तर तो म्हणाला लॅब्राडोर ग्रेट राजबिंडा उमदा घोडाच जणू

मित्राला म्हणालो लॅब्राडोर म्हणजे त्यांच्यामधली एक जात असते
आपल्यासारखी का म्हटले नाही एड्या जात म्हणजे ब्रीड
जाती माणसांत असतात ते म्हणजे प्राणीच वेगळा समज ना
माणसांत का नाहीत वेगवेगळे प्राणी त्याने विचारले म्हटले आहेत ना
ते जुने सोड आताचे बघ --- धर्मांध धर्मडोळस पुरोगामी प्रतिगामी
लोकशाहीवादी हुकूमशाहीवादी संविधान मानणारे आणि न मानणारे
सभ्य आणि ट्रोल कर्मठ आणि आधुनिक सत्यवचनी आणि असत्यवचनी
या मार्गाने कर विचार आणखी खूप आहेत पण हे सगळे असे तुकडे तुकडे
प्रेमाने राहू शकतील का यांना एकत्र जोडता येईल का

याहून महत्त्वाच्या जाती म्हण की ब्रीड म्हण त्या म्हणजे
यशस्वी आणि अयशस्वी तसेच पुढारी आणि मतदार
पण मग यांना खुराक देऊन किंवा चांगले विचार खाऊ घालून
हे होतील का सगळे एक समंजस सहिष्णू श्रेयस्कर

तू चांगले म्हणून सांगायला गेलास तर तुला
भटके कुत्रेही नाही विचारणार तू एकच महत्त्वाचे पकड
अंडरवर्ल्डशी संबंध असलेले आणि नसलेले
तसेच शार्प शूटर आणि बोथट कारकून मजूर वगैरे
यांतली करेक्ट कर निवड की झालासच तू
लॅब्राडोर
--- ००० ---

वचावचा

वचावचा जगण्याचे
परिणाम जाणवतातच ना
कशातही काहीही
मिसळत राहते नैतिक अनैतिक

उठाबशा काढणे
बंद झाले ती तारीख
होती क्विन टॉवरची
इथे धड माणसांचा
नाही भरोसा आणि घटनांचाही

कुणाकुणाला कशाकशाचा
राग येतो हे लक्षात ठेवण्यातच
व्यापला जातो माझा मेंदू
न ठेवावे तर मैदान
ओस पडण्याची घटना
नरडे पकडते

शिवाय खरोखरच कुठेतरी
खरेखोटे
पकडले जाण्याची भीती

जवळ जवळ जगणे थांबवलेच आहे
असे आपले तरी कुठे होतेय जगणे
तसे तर काहीच नाहीय महत्त्वाचे
हा आपला नुसता एक विचार आहे
असा आरोप होऊ शकतोच

नको प्रॉब्लेम
म्हणून अंघोळ करून
बासरी वाजवत बसावे
नंतर कोवळ्या
ऊन्हाकडे पाहावे की बास

तिथे संपावे जगणे
--- ००० ---

चिकाटी

न्यूनगंड असलेली माणसे आळशी असतात
त्यांच्या हस्तरेषा काळपट द्वेष्ट्या असतात
त्यांना उत्साह नसतो पण संताप खूप असतो
भूतकाळाच्या गौरवात टची राहात
ती माणसे त्यांचा वर्तमान जाळत असतात
आपणच सज्जन आपणच कर्तेकरविते
आपणच आदर्श आपल्याच अंकित
असायला हवे जग खरे तर हुशारी
अन्यायकारक असते स्वार्थासाठी
कष्टणारे लोक हलकट असतात
खरे तर गरजच नसते
उपग्रह उडवण्याची खरे तर
आणुबॉम्बची तरी काय गरज
माणूस आरामात जगू शकतो
इतके देतच असते पृथ्वी

न्यूनगंडात्मक माणसे टोळीने जगतात
टोळीने उत्सव करतात टोळीने
पितात टोळीने आरडाओरडा करतात
त्यांना माहीत असते पुढे जाणारे
ढोंगी असतात आणि क्रूर असतात
जगाने पुढे जाण्याची काहीच गरज नसते

ती माणसे त्यांच्या मुलाबाळांनाही
न्यूनगंड शिकवतात सोबत
शौर्य आणि क्रोध शिकवतात
काही करायचेच नाहीय तर करावे तरी काय
हेच नॉर्मल म्हणत
ती माणसे नष्ट करतात बुद्धमूर्ती

त्यांना कविता आवडत नाहीत
प्रेम ही त्यांना अफवा वाटते
अशी सत्तर वर्षे ते चिकाटी टिकवतात
त्यांचे जग बदलायचे राहून जाते
सूड घ्यायचेही राहून जाते
--- ००० ---

भाषेच्या गंगेत

मध्येच मध्यरात्री
जाग येण्यासाठी शिंपडावे
लागते त्रिफळा चूर्ण
गायीवर
जी उभी असते
सूर्याकडे पाहात

हाच तो गुन्हेगार
समजून उलटे खिसे
ताबडतोब
उसवलेले परिवार
गायीला भावतात
की पावतात

वर्णद्वेष नको म्हणणारे
त्रिवार नहातात
भाषेच्या गंगेत
अर्थाशिवाय
--- ००० ---

फायनल

होऊ न देणे
हेच महत्त्वाचे
बरोबर जा किंवा चूक कर
डिझाईन बदल
बचावाला संधी घे

शरीराला वाव दे
उंच हो
पाड वापर लाथ वा कोपर
गाठ पल्ला

कळू नको देऊस
पण घाई नको
वेगाचा प्रतिकार
शांततेने कर
आणि अचानक
घूस फायनल

घडेल ते
याच आखूड काळात
तुझा भूतकाळ
इज्जतीच्या काठावर
उदार हो

तुझ्या पाठीवर
आख्खा स्टेडियम
वाकू नकोस
--- ००० ---

त्यापेक्षा

त्याचे फ्रस्ट्रेशन
त्याने माझ्यावर काढले
मग मी घरी आल्यावर
बोललेच नाही कुणाशी
खूप पालापाचोळा जमवून
बसून राहिले गप्प अंधारात
काही वेळ जाऊ दिला
घरच्यांनी मग त्यांना
त्या सडक्या अंधाराचा वास
असह्य होऊ लागला
सगळे वातावरण बिघडतेय
लिपस्टिक लावता लावता
बहीण म्हणाली
माझी काही महत्त्वाची
कामे आहेत फंक्शन आहे एक
मूड खराब नको करूस

त्यापेक्षा सांग काय ते
अजून मी तशीच आहे
पण तुझ्यावर नको आता परिणाम
त्यापेक्षा
मी पुन्हा घरीच जाते
--- ००० ---

चंद्र

निळीभोर रात्र
पिवळसर काळपट चौकटी
जणू गल्ल्या रस्ते घरे
या चौकटी खऱ्या असत्या
आणि खऱ्या त्या खोट्या तर
पण माणूस राहणारच ना अध्याहृत
खरा असो की खोटा

चंद्र चमकदार पण काहीसा मळलेला
खोट्या चौकटींवर खरा प्रकाश
माणसानेच रंगवलेला
--- ००० ---

नरक जसे

मारहाण केली
या बातमीतून नाही पोचत
ती वेदना घसरून जाते
स्क्रीनवरून
कोरड्या पावसासारखी

झाडांच्या जखमा
विद्वानांचे ताण
आणि विषमतेचे चटके
स्वत: मेल्याशिवाय
नरक जसे

आता व्याकूळ होण्यापेक्षा
कुवतच नसणे सगळे
सहन करण्याची हे मान्य करून
व्हावे व्यसनाधीन एकलकोंडे
राजकारणी श्रीमंत तुटून पडत
--- ००० ---

प्रभुदेवा

हे बिस्किट खाल्ले की तुम्ही
होता लवचिक आणि काही
महिन्यांतच प्रभुदेवा

मला त्यातली उणीव लगेच दिसली
मी प्रभुदेवा होऊन
माझे घराणे कसे जाईल
साता समुद्रा पार पुन्हा तोच जाणार

खूप लोक नाचू लागले
डब्ल्यू एच ओ ने
त्याचा अभ्यास ऑर्डर केला

मी नाही लक्ष दिले
आहे तसा उन्हात उभा राहिलो

उन्हातला एकाकीपणा
हा विषय फारसा कुठे हाताळला
गेला असण्याची शक्यता नाही
अंधारातच घुटमळतात लोक
मी  ते काम करणार आहे

एकेक माणूस उन्हात एकाकी
अशी चित्रमालिकाच मी
रंगवणार आहे त्यात ऊन-सावल्या
आणि छटा हे माझे स्किल असेलच
पण प्रत्येक चेहरा वाकडातिकडा
काढावा लागेल पिळवटलेला
आणि स्त्रियांची शरीरे फाटलेली

लहान मुलेही उन्हात विकृतच
काढावी लागणार आहेत
त्या मुलांची त्वचा कोवळी न काढता
मी निबर दाखवणार आहे

मला दिसणारे जग दुसरे काय
--- ००० ---

मी आणि पैलवान

अहो मी आहे हडकुळा
काडीपैलवान
अगदी समजा पाचशे
पैलवानांनी दिला मला
जीवनगौरव तरी
तो मी न कळता
असाच दिलेला असणार ना

मी जो जसा आहे
तो तसा समजून
कोण देऊ शकेल मला
गिफ्ट कुपन

पैलवानांना कशाला
असेल इंटरेस्ट
अंग झडून घेण्यात

मी इतकी वर्षे सोसले
हडकुळेपण
याचे वाटतेय त्यांना अप्रूप
पण माझे तर ते जगणेच होते
असे ना का पण रक्कम खूप होती

प्लेगमध्ये  पेशंट तपासायला जावे
तर तोवर तो मेलेला असायचा
मग खांदा द्यावा लागायचा थकायचा डॉक्टर
एकदा संध्याकाळी बोलवायला आलेल्या एकाला
तो म्हणाला येईन पण खांदा नाही देणार

तेच होते मनात सरळ सांगूनच टाकले
घेईन मी जीवनगौरव पण नंतर
काहीही झाले तरी वापस नाही देणार
प्रथेप्रमाणे तर सगळे पैलवान खुश झाले

जीवनगौरव देणे ही त्यांची संस्कृती होती
--- ००० ---

बातम्या

तुला उत्सुकता होती चार मिनारबद्दल
तर ते तुला घेऊन गेले कुतुब मिनारला
आणि चर्चा सुरू केली की ती
खाजगी मालमत्ता आहे की सरकारी
तुला शंका येतेय असे दिसताच ते म्हणाले
एकोणीसशे सदतीस साली निर्माण झाला होता
असाच वाद शनिवार वाड्याबद्दल तेव्हापासून
तुला सततच वाटते की ही बातमी लपवण्यासाठी
ती पेरली जातेय आणि मुद्दामच अपशब्द वापरून
भरकटवले जातेय ध्यान दहा हजार कोटींच्या
महा घोटाळ्यापासून प्रत्येक ठिकाण
हे आपले भक्त समजून सगळीकडे
एकाच वेळी हजर राहणे श्रीकृष्णाप्रमाणे
ही सिद्धी तर तुझ्याकडे नाहीय यापुढे
कुणाचीही आत्महत्या की हत्या हेही
असंख्य वावड्यांत बुडून जाणार आहे
जे सिद्ध होईल तेही तुला संशयास्पद वाटेल
तू आहेस जिवंत हे मान्य असून मतदान करतो
आहेस यावर समाधानी राहा तुझे नावच यादीतून ------
--- ००० ---

पूर्ण माहोल

क्या क्या बजाते हो
मैं गाने लगती हूं तो होता नहीं
ती बढावा देते तिच्या साथीदाराला
मध्येच वाव देते तबल्याच्या
लंब्याचवड्या गणिताला
आणि समेला गोड हसत म्हणते
क्या बात है
पूर्ण माहोल एक होऊन गातोय

कुणी म्हणते ती गॅलरीसाठी गाते
मला खरेच नाही कळत
किंवा मीही असेन गॅलरी

तिची सहजता उत्स्फूर्तता
पाहून माझे मन सुटे सुटे होत जाते

तेच मन मध्येच स्वत:ला
जोखत विचारते
तू तिच्या सौंदर्यावर तर भुलत
नाहीयस

असेल सगळेच पण जे आहे
ते एकात्म नष्ट करू शकतेय
तुकड्यांचे जग आदरणीय प्रिय कौशिकी
--- ००० ---

मग

एक अनावश्यक क्रियाकर्म
म्हणून मगाच्या काठावर बसतात
तीन विचार एक खुश एक नाराज
आणि एकाला असे काही
शोधायचे आहे की जे आधी माहीत नाही

तिघेही बसलेले आत
पाय सोडून
नको आपली सैल पँट
निसटून रस्त्यात पडायला म्हणून

आपला मालक त्यांना माहीत असतो
त्याच्यामुळेच झालेला असतो
त्यांचा अपमान अहंकारानेच
अहंकार सोडू पाहणारे मूर्ख म्हणून

सारखा खूप जनता संपर्क
आणि आपला वेळ सतत
टांगणीला लागलेला
हे नको म्हणून तर
त्यांनी टाळलेले आहे राजकारण

लोक त्यांना म्हणतात
आपमतलबी आणि घृणास्पद
ते फक्त मनात म्हणतात
मी काय करायचे ते मी बघेन

ऊठबस सारखी कुठेतरी
ऊठबस करण्यापेक्षा
त्यांना आवडते सार्वजनिक बस सेवा

खरे तर आपली नाही कुवत ना स्वभाव
उगीच आव आणून उपयोग काय
हा सगळा विचार आधी झालेला आहे
मगच ते आलेत मगाच्या काठावर
आठवणींनी ओथंबलेल्या
--- ००० ---

धडा

विचार म्हणजे  कावळा असेल
वा पाणी असेल पण होईल काय
तो कधी लोखंडही होऊ शकेल
पण त्याला अदृश्य होता नाही येणार
म्हणजेच तो फक्त जखमा
वा गुदगुल्या देऊ शकेल

झालरी लावून त्याचे
उत्सव होतील
त्याला न्हावूमाखू घालून
त्याची जयंती साजरी होईल
अभिमान म्हणून
त्याच्या नावाची टोपी
घालतील सर्व महाराजांचे सेवक

जे चाललेय ते नियमबद्ध
आणि गौरवपूर्ण असल्याने
कुणी त्याचे खिसे भरतील
तर कुणी त्याच्या मेंदूत हर्ष

दोर बांधलेला धोंडा
दहा किलोंचा
उचलावा दातांनी
तसाच होत राहील टाळयांचा कडकडाट

तो अदृश्य तर होऊ नाही शकणार

अभ्यास करून लोक
वकील वा कलेक्टर होतील
हा अमुक धडा
आम्ही अभ्यासला होता म्हणतील
आणि आत्मतुष्टपणे हसतील सांस्कृतिक

वर म्हणतील जखमाही होणारच ना
--- ००० ---

शहाजोग

टोला झाला आहे आता
प्रतिटोल्याची प्रतीक्षा आहे तोवर तिकडे
चाललीय धमकी आमच्या हीरोला मारायला
तुम्ही तुमचे हवाई क्षेत्र वापरू दिलेत त्यांना
त्याचा पुरेपूर बदला घेऊ एक सुंदर नटी म्हणतेय
ट्रोलिंग होणारच याच जगात तर जगायचे आहे
पूर्ववैमनस्यातून झालेल्या खुनाचा गुन्हेगार
काशीत सापडला म्हणे ब्लॅक लिस्टमधल्या
ठेकेदारालाच पुन्हा काम कसे दिले जाते
आणि फेरीवाल्यांची काळजी कोण घेणार
आज पहिल्याच दिवशी इकडे वादाचा भडका उडावा
आणि तिकडे आगीत भस्मसात व्हावेत सात देह
हा कसला योगायोग अभिवादन
हा आमचा अभिमान आहे यापुढे
चालवून नाही घेणार आमच्या हीरोच्या
पुतळ्याची विटंबना मग तुम्ही
आम्हालाही तालिबान म्हणालात तरी चालेल
फटाके लागणारच ना उत्सवाला
एखाद्या कारखान्यात स्फोटही होणारच ना
सगळे सुरक्षित असे कुठे असू शकते का जगणे
दर्शनाचे पुण्य हवे पण चेंगराचेंगरी नको
म्हणजे देश हवा पण युद्ध नको असेच ना
सगळे लेखक कलावंत शहाजोग म्हणतात
माणसा माणसा माणूस हो आणि गांधींचा
तो विचार की शेवटच्या माणसाचे हित साधायला हवे
पोरक्या मुलांचा आहे प्रश्न पोलिस ठाणी वाढायला हवी आहेत
चारी मुंड्या चित करू आम्ही तुम्हाला
सुशोभीकरण खूप आवडते जनतेला उत्साह बघा ना
शेवटी देवीचे आहे ते शिखर भक्ती आणि धाडस लागेलच
आणि तरीही नेमके बरोबर काय हे माहीत असलेले
शहाणे मोडतच राहतात बोटे महिनो न महिने
आणि वर्षानुवर्षे मुळीच आशा नसली तरी
चिकाटीने वापरत राहतात उपरोध शिव्या द्वेष आणि क्रोध
जगाचे बीपी वाढतेय प्रलय होईल पण सर्व मनांना
बिझी राहण्याशिवाय पर्याय तरी कुठला आहे
--- ००० ---

ते

ते गेले हे खरेच वाईट झाले
कुटुंबवत्सल होते छान
तुम्ही फारच छोटे करताय त्यांना
ते जातीचे समाजसुधारक होते
बरे जाऊ द्या क्रांतिकारकच होते म्हणू या
अहो ते म्हणायची गरज काय
समाजसुधारक हा क्रांतिकारक असतोच
शिवाय वाचनप्रेमी किंवा वाचनवेडेही होते
अहो ते असल्याशिवाय हे कसे होता येईल

आणि तुम्ही त्यांना कुटुंबावत्सल म्हणालात
याचे मला फार वाईट वाटलेले आहे
सर्वांना एकत्र आणणारे एकतावादी होते ते
भाषाभिमानीही होते
अहो वाचनपरेमी म्हणण्यात आलेच ना ते
आणि त्याचबरोबर हे घ्या लक्षात
ते परभाषांचा द्वेष करणारे नव्हते
म्हणजेच एकतावादीच होते ना
पण स्वभाषाभिमानीही होते
ते असू द्या हो पण हे नका विसरू
की त्यांच्या उद्योगात सदुसष्ट टक्के
परभाषिक आणि परधार्मिक होते
पण स्वकुटुंबावर प्रेम होतेच ना त्यांचे
ते असतेच हो पण ते समतावादीही होते
तुम्ही त्यांची मोठी व्यापक वैशिष्ट्ये बोला ना
संकुचित नव्हते ते त्यांच्या जागेपणातला
दहा टक्के तरी वेळ त्यांनी घरच्यांसाठी
दिला असेल का ही एक शंकाच आहे

मग काय म्हणू म्हणजे तुम्हाला पटेल
की मी अमुक काही म्हणणे
हे तुमच्या स्वार्थाच्या आड येतेय
की तुम्ही मोठे मी लहान तुम्ही हिताचे मी
विध्वंसक तुम्ही अकलेचे खंदक आणि मी निर्बुद्ध
तुम्ही विशाल दृष्टिकोणाचे आणि मी संकुचित
हेच दिसायला हवेय तुम्हाला ओळखू येतेय हो ते
--- ००० ---

खोटे नको

एकाच महापुरुषात
अनेक महापुरुष
एकमेकांच्या विरोधात

पण इतिहास आहे ना
तेही अनेक आहेत
एकमेकांच्या विरोधात

पण पुरावे आहेत ना
तेही वेगवेगळे
खरे कोणते

पूर्वग्रह नकोत
जे असेल ते खरेच असावे
खोटे नको

म्हणजे महापुरुष नव्हतेच
इतिहासही नाहीय
आणि पुरावेही नाहीयत

फक्त आपण आहोत
आपले विचार आहेत
आपली मते आहेत

आपण विचार मते
हे तरी आहे का
एकच असे एकमेव

मरू दे ते सध्या
चहा घे तो
गार होतोय
--- ००० ---

तुम्ही

तुम्ही तुम्ही केलाय शक्यच नाही
अशक्य आहे तुम्ही अनेकदा केलाय
तुम्ही एकदाच पण मोठा केलाय
माफी मागा राजीनामा द्या
जनता बघतेय जनता
तुम्हाला माफ नाही करणार
मी तर स्मारकाचा पाठपुरावा केला
मी किल्ल्यांवर गेलो ते कुठे गेले
विपर्यास होतोय विपर्यास होतोय

तुम्ही खोटारडे आहात
तुम्ही दांभिक आहात
तुमचे प्रेम बेगडी आहे
म्हणूनच तुमचे दोन घटस्फोट झाले
खाजगीत शिरायचे
तर पळता भुई थोडी होईल

सगळ्या आत्महत्यांच्या फायली
पुन्हा ओपन करू तुमच्या सगळ्या
प्रतिज्ञापत्रांचा झाडा घेऊ
तुम्ही बदल्या कशा केल्यात
तुम्ही भरत्या कशा केल्यात

तुम्ही सुटत आलात
तुम्ही सुटत आलात
तुम्ही जेलमध्ये जाल
तुम्हीच जाल

तुम्ही गद्दार आहात
तुम्ही संपलेले आहात
तुम्ही घाबरलाय
तुम्ही वेडे झालाय

तुमचे हे आहे तुमचे काय आहे मग
तुम्ही तुम्ही तुम्ही तुम्ही
तुम्हीच उलट तुम्हीच
--- ००० ---

मी एकटा तर नाही आहे

त्या सत्याला हजारो
कोन असतात त्यामुळे अनेकदा
समोरच्या संकटामुळे
काही नवेच समजते
संकटमोचक मग वाटते
मी एकटा तर नाही आहे
जमेल तेवढ्यांना सांगायला हवेच

मग मी जगातले कोणतेही
कसेही असंबद्धही तुकडे
घेतो कारण ते तर
कोणत्याही माध्यमातून सांगता येते
काहीच वर्ज्य नसल्यामुळे
दगड संगणक स्त्री वा सूर्यास्त
काहीही वा हे सगळे एकत्रही
चालते

मी सांगणारच नसतो
फक्त माझे हात माझे मन
हालचाल करणार असतात
जग हलवायला
तरफच लागते असे काही नाही
मनाचा एक तुकडाही पुरेसा असतो

मुख्य म्हणजे आता
वाचकांनी हे सगळे
समजून घ्यायचे प्रयत्न
पूर्ण थांबवावे लागतात
अन्यथा नुसता विचार जरी आला
की बहुतेक अमुक होतोय आजार
की खरोखरच कपडे फाटू लागतात

ही काही भानामती नव्हे
हे आहे नकळत
मनाने मनाला भेदणे
शांततेसाठी
--- ००० ---

गाडी आणि फलाट

मनात असले काहीही
तरी गाडी
कोणत्याच फलाटावर न थांबता
जात राहते
जणू फलाट
ही नुसतीच एक रूटीन गोष्ट आहे

मनात फुल्ल गुच्छ असला तरी
फूल ना फुलाची पाकळी
म्हणून गाडी नुसताच
एखादा कागद उडवते
रुळांमधला

त्या कागदावरची कविता
जाणवते फलाटालाही
पण तेच
नको उगीच मानसिक धुरळा
म्हणून फलाटही
शांत राहतो

खरे तर फलाट आणि गाडी
एकत्रच असतात प्रवासात
जाऊ दे नकोच ते म्हणत

निदान गाडी आणि फलाट
म्हणून जगत असणे
हेही सार्थ समजता
येतेय ना कदाचित दुतर्फी

हेही बास
असे म्हणत नकळत एकदा
थांबतेच गाडी फलाटावर
सूर्य करंट वाढून प्रखर झाल्याप्रमाणे
पण तो गाडी आणि ती फलाट
याला एक सुखद झुळुक समजतात
जाता जाता आलेली
--- ००० ---

क्रांती

मी कसा असायला हवा
असे तुम्हाला वाटते याच्या कल्पना करत
धारण करत राहतो मी मुखवटे
वेळोवेळी प्रत्येक वयात
माझ्या अंगाख्या टोपख्यातून उगवलेले असते
एका पूर्ण गावासारखे झाड

माझे मूळ असे काही आहे का
हे मला नाही माहीत
पण मी जो आहे
तो आहे एक घटनांचे गाठोडे
ज्या घसरत राहतात सतत एकमेकींवरून

प्रत्येक दोन मुखवट्यांमध्ये
आहे सतत एक अंधार
आणि प्रत्येक दोन घटनांत
असतो एक प्रयत्न सदोदित
जिवंत होऊन पुन्हा एकदा
सनसनाटी होण्याचा

माझ्या असण्याचे धागेदोरे
डावपेच उपभोगांची शिखरे
विमनस्क सदोदित असतात
माझ्या विचारांची पाखरे

मला एकदा वाटते
हे रहाटगाडगे आहे
आणि एकदा वाटते हा तर
झुळझुळीत कपड्यांचा सेक्स
हीच एक पद्धत समजून
मी निश्चिंत असतो

मी बदलूही शकेन
थोडाफार पण मला आता
क्रांतीचा उत्साह नाही
खरे तर  त्राणच नाही
--- ००० ---

प्रगल्भ

रक्ताचे पाट वाहिलेले वाचले
आणि तो प्रगल्भ झाला
बलात्कार खून व्यभिचार विश्वासघात
देशोधडीला लावणे नामानिराळे राहणे
असे खूप वाचून त्याला कळून चुकले
की कसा असू शकतो माणूस
किती हिकमती किती पाताळयंत्री
तो सतत वाचत असे
हिटलर स्टॅलिन त्याच्या हातचा मळ होते
त्याने किती युद्धकथा वाचल्या
किती ऐतिहासिक पौराणिक
याला गणतीच नव्हती

चरित्रे प्रवासवर्णने
तर त्याला पंच्याऐंशी ते पंच्याण्णव
दहा वर्षे खूप आवडत असत
किती तऱ्हांनी जगत असतात लोक
हे पाहून तो अचंबित होई
आणि अधिकच प्रगल्भ बने

टॉलस्टॉय जॉईस
लॉरेन्स काफ्का
मॉम हेमिंग्वे
यांच्याच बरोबर
त्याने रणजीत देसाई
शिवाजी सावंत वपु पुल
हेही वाचलेले होते
पण काहीही असो तिकडच्या
त्यांचे अनुभव अचाटच असतात
असे तो म्हणे

माणूस खूप प्रचंड सगळे तर जगू नाही शकत
पुस्तकांतून कितीही होऊ शकते जगणे
त्याच्याहून जास्त वाचलेले कुणी दिसले की त्याला वाईट वाटे
स्वत:ची प्रगल्भता थिटी वाटे
मग आणखी वेगाने झटत तो अधिकच प्रगल्भ होऊ लागे
--- ००० ---

मालदीव

मालदीववरून माल आला
तेव्हापासून वाटू लागले
की जग चालेल तर प्रेमावरच चालेल
म्हणून मग प्रचारच सुरू केला
इतक्या भंगार आणि दुष्ट जगात
कुणी वेडा काही चांगले सांगतोय
म्हणून अनेकांनी थोडा वेळ
राजकारण थांबवून
आश्रम बांधून द्यायची ऑफर दिली
खरेच काही चांगले शिकवा
आमच्या मुलांना यापुढे तरी
जग हिंसा आणि भेदभाव
यांपासून मुक्त व्हायला हवे

लहानपणी बंबात पाणी तापवून
अंघोळी करणारे लोक खूपच
भावविभोर होत बाळगू लागले आकांक्षा
भावविवश होण्याची

देवादिकांचे सगळे सोपस्कार वेळोवेळी करूनही
नियती का बदलत नसावी
याच्या विचारात संपत आलेले बांधव
चांगल्याला चांगले म्हणायला
नेहमीच तयार असणारे होते
चांगल्या माणसाशी कसली
आलीय स्पर्धा भले करेल तर तोच करेल
या जगातली गोष्टच नव्हे ती
हे नम्रपणे ते मान्य करत

नास्तिकांशीही ते पंगा घेत नसत
त्यांची नियतीच तशी
त्याला ते तरी काय करणार
अशा विचाराने ते त्यांना समजून घेत
पण असणार काही चांगले तत्त्व जगात
त्याशिवाय चालेलच कसे हे जग
असे ते मनात म्हणत समजुतदारपणे
--- ००० ---

मुंग्या

माझा मुंग्यांसारखा
विखुरलेला मेंदू
चरत राहतो जगभर
कुठेही कसाही
थकत भागत उल्हसितपणे

त्याच्या असतात अनेक शक्यता
भयप्रद
एकच निवडून मी आटापिटा करत राहतो
माझ्यासारख्याच अराजकी
माणसांचा मुकाबला कुणी एकच
असू शकतो
सत्य आणि सत्ताधारी म्हणून

माझे हे तुंबळ जगणे
कुणाला दिसत नाही
बाहेरून मी राहतो
कधी प्रेमळ कधी क्रुद्ध

माझा शोध असतो
सर्व शक्यता
नष्ट होण्याच्या
एकाच मुंगीचा
जे असेल ते असेल
मुंगीच्याच रूपात म्हणून

असंख्य सत्यांची
मला दरदरून भीती असते
दुर्लक्ष कर एकच पकड
होऊ दे रणकंदन
आहेस तोवर राहा सुरक्षित
अराजकात बंबाळ होत
का असे ना म्हणतो
माझा गोजिरवाणा मेंदू
मुंग्या लागलेला
--- ००० ---

नाव

त्याची बहुसंख्या होती
हवे तेव्हा तो मोर्चे काढू शके
त्याच्या आवडत्या शर्ट
कंपनीचे नाव बदलून
त्याने मानसिंग शर्ट करून घेतले
नंतर मानसिक ग्रिप नीट यावी म्हणून
त्याने बुटाच्या
कंपनीचे नाव बदलून
खंबीर बूट करून घेतले
मग आले त्याच्या लक्षात
की त्याच्या बायकोवर त्याचे खूप प्रेम आहे
त्यामुळे एका मॉल चेनचे नाव
मालती मॉल झाले रेलचेल सुचवणारे
अंडरपँटचे नाव दिसणार नसले तरी
त्या कंपनीचे नाव बदलून
त्याने ते तत्पर पँट करून घेतले
एक शक्तीचे प्रतीक म्हणून

त्याला लागणाऱ्या रेचकाचे नाव
त्याने भरधाव करून घेतले
शिवाय त्याला
लता मंगेशकरची गाणी आवडत
ते नाव त्याने मनस्वी भूलकर केले
त्याचा देश धर्म जात
यांची नावे बदलायला
कुणी मोर्चात यायला तयार नव्हते
ती मात्र असू देत आहेत ती
असा त्याने समजुतदारपणा ठेवला

अशी पाचेकशे नावे बदलल्यावर
आले त्याच्या लक्षात च्यायला
आपली स्वत:ची ओळखच गेलीय बदलून
त्यामुळे आपणच स्वत:लाच परके झालोय
तेव्हा मात्र तो घाबरला
आपण जिवंतच नाही आहोत आता
तर या बदललेल्या नावांचा उपयोगच काय असे झाले
--- ००० ---

कानडा

लोकांना नीट माहीत नसते
एका कानडी खलाश्याने
प्रथम कॅनडाचा शोध लावला
तिथले आदिवासी मराठी बोलत त्यानंतर
तिथे कानडा वो विठ्ठलू हे गाणे खूप
लोकप्रिय होते
इथला एक मावळा
ट्रिप म्हणून तिकडे गेला होता
तेव्हा  त्याच्याबरोबर हे गाणे
इकडे आले आणि ते
ज्ञानेश्वरांना आवडले

नंतर जमिनीवरून
अमेरिकनांनी तिकडे दोनशे वर्षे
आक्रमणे केली
आणि हळूहळू तिथले
मराठीचे वर्चस्व संपवून
स्वत:ची अधिसत्ता स्थापन केली

जुना इतिहासही त्यांनी पुसून टाकला
नवा लिहिला

तिथले सगळे आदिवासी नष्ट झाल्याने
आक्रमकांच्या संस्कृतीला एकसंधपणा आला
उत्सव बदलले रोटीबेटी व्यवहार बदलले
खाण्यापिण्याचे पदार्थ बदलले

आता नोकरीसाठी ते
मराठी लोकांना येऊ देतात
थोडेफार कानडीही येतात

अट एकच असते मशिनने ते
कानडा वो विठ्ठलू ची आठवण
खरडून टाकणार तो विषयच बंद
--- ००० ---

बोधवचने

काल पाणीपुरवठा बंद होता
म्हणून फाईल हलली नाही
असे म्हणाले साले आज तरी
सुरळीत असो सगळे
त्यात परत सुयशला
मी जे बोललो त्याने तो दुखावला असेल का
हा एक प्रश्न आहेच

ही बाकीचीच कामे फार आहेत च्यायला
मुख्य म्हणजे
योगवासिष्ठ वाचायची इच्छा आहे
आगाऊ रक्कम द्या मग मागवू
हे कुणी घेत नाही हो
पुस्तक-दुकानदार म्हणाला
पुस्तकाचे दुकान म्हणजे
जगातली सगळी पुस्तके
तिथे ठेवलेलीच असतात
असे नसते म्हणाला

तसे तर गोंदवलेकर महाराजांची
बोधवचने वाचली तरी नैया
पार होऊ शकते
सगळे एकच सांगतात
सत्याशी अनुसंधान हवे
अनंत आळवणे महत्त्वाचे

प्रश्न हाच पडतो
की हा परमेश्वर हा अनंत
असे कसे असेल जे जे असेल
ते ते सांतच असणार
मग अनंत म्हणजे काहीच नसणे
तर नसेल च्यायला घामच फुटतो
अशा प्रश्नांनी

सध्या पाणीपुरवठा ते ऑफीस आणि ती फाईल
यांतच गुंतून राहतेय मन
--- ००० ---

लावा अर्थ

व्यवस्था ढवळून काढणारी कविता
लिहायची तर असंबद्ध स्थळकाळांतले
बेशिस्त साठवलेले शब्द हवेत म्हणून
तो साठवायचा एका डब्यात ओलेसुके
बातम्यांचे तुकडे तिकिटांचे कपटे
आणि जाहिरातींतले उद्गार

मग गरागरा ढवळून फेकायचा कविता
कागदावर उसने सर्प दर्प होत
करपून जात असलेल्या सत्याचे काप
अश्लील आणि अनैतिक जे जे
त्यांना प्राधान्य देत
जे जे मान्य ते ते
चॅनेल्सखाली चिरडत
तो दाखवून देई आधुनिक
मनाची जुना बाजार मंडई

मन वापरण्याच्या पद्धतीवरच
हल्ला म्हणून तो मुतून ठेवे
चांदीच्या ताटवाट्यांतून

एकीकडे हत्ती सोंड उचलत
तर दुसरीकडे येई फाशीचे दृश्य
बधीर झाले पाहिजेत भडवे तो म्हणे
व्यापार पाहिजे साल्यांना
सडले तरी सेक्स पाहिजे
आणि रोमँटिक गाणी

उधार आणलेले उद्धारी पिस्तूल
अपराधातून निर्दोष सुटत
कमानी उभारे आझाद मैदानावर

लावा अर्थ भोसडीच्यांनो तुमच्या
या भंगार जगाचा हीच समजा
तुमच्या लायकीची कविता तो म्हणे
--- ००० ---

की काय

स्वप्नात असो की वास्तवात
सारखे काहीतरी खटकतेय
जे घडले ते
जे घडू शकेल तेही

स्वभाव खटकताहेत
अनेकांचे खरे तर
माझाही
बसल्या ठिकाणी
हेच तर एकचित्त
की काय

हे थांबणे आहे
स्थळावर की काळावर

यातून बाहेर
म्हणजे कुठे
--- ००० ---

हमखास

माझ्यात जी अपूर्तता होती
ती तुझ्या स्पर्शाने भरली गेली असे नाही
तुझा संपर्क होताच
माझा त्याग करून मी
तुला आत्मसात केले पूर्ण
मीलन म्हणून

आता जे घडते
ते तूच घडवतेस
पण मी ते सांगू नाही शकत
अविश्वासाच्या जंगलात
कशाला तुझी बदनामी म्हणून

माझ्यावरही येऊ शकतात
बाहेरख्यालीपणाचे आरोप

माझी स्तुती होते
तेव्हा तू लपून असतेस
त्या गावचीच नसल्याप्रमाणे
कारण आपला करार असतो
सहवास लुप्त ठेवण्याचा

तू स्मित करतेस
काहीच न हरवल्याप्रमाणे
काहीच नको असल्याप्रमाणे
सरळ सरळ माझी जाणीव दुर्लक्षून

मी मिरवतो माझे असणे
आपली अतितीव्र एकात्मता आठवत
पण संबंधच नसल्याप्रमाणे जरी तरी

माझ्या शब्दांत पेरून ठेवलेल्या असतात
मी तुझ्या प्रतिमा हमखास
--- ००० ---

कणव आणि न्याय

मी न पाहिलेल्या चित्रपटांतले
नायक-नायिकाही कित्येक
धोक्यांतून पार पडल्या असतीलच
त्यांतले सगळे हेलकावे
खरे तर मला आवडले असते अनुभवायला
ही गरज ओळखून
करा तयार असा एक प्रोग्रॅम
जो मेंदूत जमा करून देईल हे सर्व
जागतिक सस्पेन्स ताण चिंता आणि दिलासे
जगातली सगळी चांगली पात्रे
संकटांतून सुटावी
त्यांना छळणाऱ्यांचे व्हावे तळपट
यासाठी पूर्ण आयुष्य द्यायला मी तयार आहे

मी फारच थोड्या चांगल्या लोकांच्या
भल्याचे विचार करू शकलो
म्हणजे मला कृपया
असंवेदनशील नका समजू
तशा हजारोंसाठी
तयार आहे ना मी
माझा मेंदू उपलब्ध करून द्यायला

कुणी म्हणते की ही पात्रे
खोटी असतात
ती चांगली की वाईट
हे आधीच कुणी ठरवलेले असते

त्यांतल्या कुणी काय करायला हवे होते
याच्या चर्चांत आमचे कित्येक तास जातात
आमच्यांत फारसे मतभेद नाही होत

अहो अशीच तर असतात माणसे
शेवटी मेंदूंतून कणव आणि न्याय
यांचे प्रवाह वाहात राहणे हेच महत्त्वाचे
--- ००० ---

मानवी हक्क

अगदीच तुटायला नको
म्हणून सगळेच देतात
थोडी थोडी तिळ तिळ ढील
जे असतात लहानमोठे काळेपांढरे

त्या सगळ्या भूमिगत परिणामांतून
चालू राहते परिभ्रमण
इच्छा वासना भुकांचे

एखाद्याला वाटते
होतोच सूर्योदय आपोआप
पण प्रत्येक उन्हामागे
असलेले छिन्नता रोगातून
ठिबकते रक्त त्याला दिसत नाही

त्याचा आटा आणि भाजीपाला
असतो नियंत्रित झालेला
आकाशाच्या गुंतागुंतीने

प्रेयसी भेटते तेव्हा
उचंबळून येते त्याला
विश्वाचे आर्त जाणवून

पक्षी उडताना दिसतात
फुले उमलताना दिसतात
हे त्याला
चित्रपटांसारखेच खरे वाटतात मूड

आपला प्रत्येक क्षण
बांधला गेला आहे इथे
यच्चयावत दुनियादारीशी

हे न जाणवल्याने
तो स्वतंत्रपणे हसतो
मानवी हक्क म्हणून
--- ००० ---

झाडपाला

जे करायचे ते नुसते टिच्चून करा
किंवा कुणाच्यातरी नाकावर टिच्चून
काही चांगले करायचे असेल तरी
ते विरोधाला टक्कर देऊन करा
हिंमत दाखवा शिंगावर घ्या
देश एकोप्याने चालवायला हे लागेलच

जगभरात आपला आपला देश
असणे सुरक्षित वाटते
म्हणून उभे करा देशाचे प्रचंड संरक्षक दल
आपापले धर्म सुरक्षित आणि वाटतात
प्रेमाचे सागर म्हणून तर हवी धर्मनिरपेक्षता
जाती नष्ट होतील तेव्हा होतील
आधी लागतील अभेद्य कणखर भिंती

हावरट राहा
पण कर्मण्येवाधिकारस्ते म्हणा
फोडाफोडीची नीती नको म्हणत
पक्ष वाढवा लोकशाहीचे नारे
लावत दहशत पसरवा आम्ही
आदर्श ते घातक आम्हीच फक्त
सहिष्णू आम्हीच समतेचे पुरस्कर्ते
असे म्हणत अग्रेसर व्हा स्वत: मजबूत व्हा

अत्याचार अन्याय दडपशाही
नको म्हणत शांततावादाच्या पायावर
युद्धविरोध करत महासत्ता व्हा
त्यासाठी लागेल त्या त्यागाला तयार राहा
उद्याचे जग आनंदी करण्याचा हाच आहे मार्ग

कडक शिस्त संचलन तर कराच
हा सगळा मानवी शक्तीचा सदुपयोग समजत
आणि रणगाड्यांवर लावा झाडपाला
शत्रूला दिसू नये विमानातून म्हणून हुशारीने
या सगळ्याला कुणी अब्सर्ड म्हणत असेल तर म्हणू द्या
--- ००० ---

## रंग

ओबीसी दलित आणि कम्युनिस्ट
हे झाले मूळ रंग
दलितात ओबीसी मिसळला
तर व्हायला हवा मुस्लिम
आणि कम्युनिस्टात ओबीसी
मिसळला की हिंदू

मग येतात राजकारणी
ते म्हणतात छे छे
शांततेचा रंग पांढरा शुभ्र
हवाय आपल्याला सर्वत्र
म्हणून मग ते
कशातही काहीही मिसळत
लावतात मारामाऱ्या

रंग म्हणजे खरे तर
मने असतात ज्वालाग्राही

कुणी राजकारणी वाघ असतात
तर कुणी श्वान
अग्निचक्रातून पलीकडे
उड्या मारण्याचे कौशल्य
धोक्याचे असले तरी
मिरवायचे असतेच त्यांना

मग सगळेच म्हणू लागतात
कोणता ना कोणता रंग हवाच
कशातही काहीही
मिसळले तरी हा ना तो
रंग होणारच तयार अटळ

हेच खरे समजून मग
जात राहतात दिवस
डल आणि हिंसक वाटत
कंटाळ्याच्या दिशेने
--- ००० ---

बिघाड

एका रात्री मधेच
किती वाजले ते पाहायला
घेऊ गेलो मोबाइल
तर तो खाली पडला
भीती वाटली
बिघाड तर नाही होणार

असतो तो त्याच ठिकाणी
तसाच तरीही पुन्हा एकदा
निसटला हातातून
झाले काही नाही
पण भीती वाटली

एका वेळी मन
एकाच कामात असायला हवे पूर्ण
कधी मला
माझ्यावरची
शिस्तभंगाची कारवाई आठवते
तर कधी लहानपणी सायकलवरून
पडून फुटलेला गुडघा

आताही गुडघा की गुढगा
हे आहेच डोक्यात

एकदा वाटते
ती जागा नकोच आता
सरळ प्रशस्त टेबलच बरे

माझ्या खोलीत तसा उजेड खूप असतो

कवितांचे वाचन घटवावे का
की खरे कारण एके काळी
घरमालकाशी झालेली भांडणे असतील

आयुष्य सुटत चाललेय हातून बहुतेक
--- ००० ---

तडफड

तसे तर आपण तमाशातून
देवादिकांच्या टिंगलीही एंजॉय करणारे लोक
भावना न दुखता भक्तीत फरक न पडता
तो नव्हता प्रश्न
तो मुद्दाम करत होता असेही नाही
खरे तर त्याला जाणीवही नव्हती
की हे असे काही असेल

सारे जहांसे अच्छा
हे गाणे म्हणताना प्रत्येक ओळीनंतर
तोंडाने तो तडफड तडफड असे म्युझिक म्हणे
ते काहींना खटकले
शेवटी देश आहे तर आपण आहे
देशकी शान यही है अपना मान
हे बदल म्हणाले म्युझिक

त्याची काहीच हरकत नव्हती
या कलाकृतीत हे असेच असायला हवे
असे म्हणण्या इतपतही त्याची कलात्मक पोच नव्हती
बदलतो म्हणाला मग त्याने पर्याय दिले
कडकड चालेल का किंवा बडबड
कणकण वणवण धुळवड परवड
भुणभुण कटकट वगैरे पर्याय त्याला सुचले
कोणताच कुणाला पटे ना
शेवटी चुकून तो वळवळ हिरवळ
असे म्हणून गेला

ते सर्वांना पटले सारे जहांसे अच्छा
हिरवळ हिरवळ
हे चालेल म्हणाले

तडफड च्या बदल्यात
हिरवळ हा शब्द फिट ठरला
मानवी जगणे दुसरे काय
--- ००० ---

तार आणि किल्ली

खरे तर सोप्पे असते सगळे
पण आपण बुद्धिमान असल्यामुळे
आपल्याला अवघड आवडते
गुंतागुंत आणि निरुत्तर होणे बरे वाटते
तेच सेफ आणि खात्रीचे वाटते

माझ्यासारखा एखादा असतो
झेनचा फॅन तर ऐका
तुम्हाला तार आणि किल्ली
हा जुगार आहे ना माहीत
तारेला टच न होता
किल्ली इकडून तिकडे न्यायची
ती मध्येच टच झाली तर लगेच
पराभवाचा त्रासिक आवाज येणार

क्वचितच समजा गेले जमून
दु:ख झालेच नाही तर
काय होतो त्याचा अर्थ
ती किल्ली वा तार
दोन्ही अस्तित्वातच नाहीयत
याचाच अर्थ काय होतो
दोन्ही असतील तर किल्ली फक्त हरू शकते

सारखा वाद नका घालू
पाहा जरा असेही
जे मी तर्काने बोलत नाहीय

ते दोन्ही नसणे म्हणजेच
बुद्धाचे शून्य सार्त्रचा नथिंगनेस
जेकेंचा एम्प्टिनेस आणि तुकारामाची रिकामीक
पटण्याच्या धंद्यात न पडता
बघून पाहा ना

दु:ख म्हणजे
आपल्या जगण्याचा त्रासिक आवाज
एवढे तरी पटू शकतेच ना
--- ००० ---

माझे चित्र

मी काय किती
वाचावे
याच्या आधी
माझे चित्र
उमटायला हवे

अधोगतीवर

मला आधीच
आहे माहीत
लेखकांचे गाव
हॉटेलांनी भरलेले
शुष्क

पुन्हा मला
नको आहे
कुणी भेटायला येणे
पूर्वापार संमतीशिवाय

त्याच त्याच पावत्या
येणार उडत
आणि मी समजावे आले
अपौरुषेय स्वर

हे नको आता
पाने उलटणे
भरताड घटनांची
मने फाटलेल्या

त्यापेक्षा माझ्या एकटेपणात
करेन मी विसर्जन
तुमच्या सगळ्या हौशिमौजींचे
माझे अज्ञान म्हणून स्वीकारत

असे खूप घडलेही असेल
--- ००० ---

साधन

जगणे निकरावर आले
तेव्हा स्वप्नात
मानसिक वेदना झाली
शारीरिक खूप जुनी
पिरगाळणे भोसकणे अशी

जागे होऊन तरी
काय होणार होते
असायचे ते असणारच होते
मनात

जग घट्ट
धरून ठेवायचे साधन म्हणून
--- ००० ---

नव्या अर्थांची गरज

हिटलरने काय केले
त्या वेळी चर्चिल काय म्हणाला
दोन्ही महायुद्धांनंतर
जगाची मन:स्थिती कशी बदलली
नव्या अर्थांची कशी गरज पडू लागली
हे सगळे त्याला नुसते माहीतच नव्हते
तर रोज साफसूफ करून ते
तो ताजेतवाने ठेवे

शिवाय विमान कंपन्यांचे कामकाज
जागतिक आर्थिक उलाढाली
यांचे असंख्य बारकावे असलेल्या
बऱ्याच कादंबऱ्यांनी
त्याचा मेंदू परिप्लुत झालेला होता

शिवाय यश मिळवणे संपर्ककौशल्ये
असे बरेच होते

त्याला जगण्याचा आत्मविश्वासच होता आजच्या जगण्यावर
त्याची मास्टरीच होती म्हणा ना ताजीतवानी
--- ००० ---

प्रतिमा

खूप योगायोगांनी
हे झाले मग ते झाले
त्यानंतर ज्याची गरज लागली
ते मिळाले
सोबत एक कोमल स्मित मिळाले
आहे त्या डोक्याने काही घडत गेले
झालेही घडून
आणि आता
नेहमीप्रमाणे
विसरायची वेळ आली
वाईट वाटायचा प्रश्नच नव्हता

इतके आहेत योगायोग
त्यात आणखी हा कशाला

योगायोगाने
तशीच एक स्टोरी
आरशातून कळली
पण त्या स्टोरीतले स्मित
कोमेजले होते
मला ना खेद वाटला
ना सहानुभूती

माझाच नाही पत्ता
तर
आरशाला महत्त्व देऊन
मी स्मृती कशाला वापरत बसू

जिथे दिसायचे तिथे मी दिसतो आहे
मी अभ्यासू नाहीच आहे
सध्याचेही मी विसरणारच आहे

पण या क्षणी उद्युक्त असणे
खरेच आहे आरशातली ती प्रतिमा
यावर मात्र खुश आहे
त्याचे मलाही सुख आहे
--- ००० ---

सेफ

इकडे हे आजारी
तिकडे ते आजारी
रोज लोक फोन करताहेत
हेल्थ-बुलेटीन त्यांचे त्यांचे
चर्चेत राहतेय

मी नुसताच चर्चेत सहभागी होत राहू की काय
माझे काय या विचारात असतानाच परवा
माझेही भाग्य उजळले शुगर दाणकन शूट झाली
आता मीही चर्चेत आलो
बरे वाटले लौकरच मी मधुमेह-मंडळ जॉइन करेन

कुणी म्हणतात जय श्रीराम कुणी जय भीम
कुणी म्हणतात जय जिनेंद्र
आपापली माणसे भेटली की सेफ वाटते
शिवाय आपणही आहोत बळकट
हे दाखवता येते
काहीजण मात्र मी नाही त्यातला म्हणत
त्यांचा त्यांचा करतात गट बुद्धिवादी
यावर उपाय म्हणून तेढ कमी करण्यासाठी
आता जय भारत हेही एक उपकरण आलेय

पण नैसर्गिक आपत्ती
कुणावरही येऊ शकते
त्या वेळी मात्र जय जगत
हेच आपले मानले पाहिजे
हे सर्वांनाच कळते

सुखदु:खे आठवणी
मनांतल्या जखमा
प्रत्येकाच्या वेगळ्याच असणार
तो एकाकीपणा राहणारच

त्यातून डिप्रेशन येऊ शकते म्हणतात
मी आधीच जॉइन करून ठेवणार आहे
डिप्रेशन मित्रमंडळ
--- ००० ---

ताळतंत्र

पूर्ण निरर्थक
कविता लिहिण्यासाठी
वापरावे लागतील शब्द
त्यांचे अर्थ विसरून

शब्दांपासून
मेंदू सुटा झाल्याशिवाय
विचार सोडणार नाहीत

आधी विचार करतो कल्पना
आजाराची आणि तसेच घडते

सरकारी इमारती
रंगवा वेगळ्या रंगांत
की बदला कायदे
शब्दांची हुकूमशाही
सतत
पसरवत राहील
दुफळीची भीती
आणि अन्यायाचे ताळतंत्र

कवी जात असतो
या मार्गाने
चळवळी टाळून
स्वीकारत
एकटेपणाचा अंधार

एकदा का शब्द
होऊ शकले निरर्थक
की होणार असते
रक्ताचे रूपांतर
हास्यात
अनोळखी

यात कसली कुणाची
असेल हरकत
--- ००० ---

खूप उपसा

खूप उपसा

केला म्हणजे
जग संपते

असे नाही
उद्या
हेच घर
फिरत राहील

कुणी असावे
हिस्टेरिक
तसे

काढलेले चित्र
अमूर्त
पण सातत्ययुक्त

विनाशी उत्सवात
प्राप्त प्रारब्ध
आशावादी

राहण्याचे सत्रा
णे फायदे
णे उड्डा

हारतुरे घेऊन
इतिश्री घेऊन
हातात झेंडा

जे होते तेच
वापरात
होत गेलेले

जून पोतेरे
--- ००० ---

स्थायीभाव

काळ्या हस्तरेषांचा माणूस
उत्साही नाही असू शकत
तर आणखी कुणी म्हणाला
निद्रानाश
हा माझा स्थायीभाव आहे

अपत्यचिंता महत्त्वाकांक्षा
राजकीय क्रोध
सदोदित वडीलकी
यांबरोबरच
सूर्यास्त पाहून हर्षभरित होणे
असे असंख्य होते स्थायीभाव

काहीच समान दिसे ना
जमे ना पटे ना

शेवटी येऊन ठेपले सगळे
एकाच प्रश्नावर
की बाबा काय म्हणावा
स्थायीभाव पूर्ण विश्वाचाच

तसे नाही असू शकत
हे आले लौकरच लक्षात
विश्व ना जिवंत आहे ना समन

तेव्हा कुठे सर्वांनी मान्य केले
की बाबा भांडणे होणारच
जो तो सांगणारच
जगाचा अर्थ

स्थायीभावामुळे
वा स्थायीभावा अभावी
जगणे मान्य करणे
हाच असणार स्थायीभाव

कशाला उगीच फालतू आध्यात्मिक
--- ००० ---

मेटा ( कुटीची कविता )

आधी जे घडायला हवे होते ते नंतर घडले
जे घडले त्यामुळे जे घडले त्यावर वाद निर्माण झाले
हे त्यांच्या अधिकारात होते का
आणि तो अधिकार नसेलच तर जे घडले त्याचे काय
राजकारणाबद्दल राजकारण म्हणजे मेटाराजकारण
काय कुणाच्या अखत्यारीत आणि अग्रक्रम कसा
या न्यायाबद्दल न्याय म्हणजे मेटान्याय

ठराविक वैचारिक रचनेत जगणे नाही चालत
आणि तर्काच्या मार्गाने निवाडा
करता येईलच असे नाही जरी तुम्ही
बसलात करत तर्काबद्दलचे तर्क

जेव्हा जगण्याची अशी खिचडी होते
तेव्हा ती मॅटर जाते कवितेच्या क्षेत्रात म्हणून ही न-मेटाकविता
--- 000 ---

भयानक

भयानक सगळे उघडे पडले
यांनी हे असे करावे
बाप रे
दु:ख होणारच ना
तो तिथे बसून दु:ख करत असतो
तिथून उठून तो
इकडे या खुर्चीवर येऊन बसतो
आता इथे दु:ख कंटिन्यू करतो
पण भयानकच
असले तरी माणसे
समंजस समजूतदार
घरच्या घरी मिटवण्याच्या मार्गात

पण उद्या कळेलच ना सगळ्यांना
नाचक्की होणारच इज्जत जाणारच

ते जाऊ दे इज्जतीचा एवढा
काही इश्श्यू नको करायला
अजून आहेत ना कारस्थाने

फोकस तिकडे हवा
म्यूझिक जरा जोरात हाणा

यडा हाईस का
याला कुणीही खोटे म्हणून
रंगाचा बेरंग नाही करणार
हे खरे धरण्यातच मजा
येणार आहे मग
येऊ बाहेर चक्कर मारून

धडा हाच घ्यायचा
प्रॉपर्टी कारस्थान इज्जत
सोचनेका नै

इससे जादा फिलॉसॉफी क्या मंगता तेरेकू
--- 000 ---

सूर्य

खूप अशक्य आहे
बदलणे
उदाहरणार्थ रोज

उगवणारा
अनिश्चिततेचा सूर्य

समोर जेव्हा
घडतो अपघात
तेव्हा दातखीळ बसते

अवाच्या सवा
पैसे देऊन
जपलेले मंदिर
उतावळ्या काळात
वाजत राहते
पण

न बदललेले
सगळे
वातड उन्मेष

येतात निकरावर
चहू बाजूंनी
घेरतात मगरी

हा बंदोबस्त
सुटणार नाही
हे पाहून
मनाला घाम फुटतो

त्रासून ते होते नास्तिक
काहीच होणार नसेल
मोकळे
तर मरू द्यायला
नास्तिकपणातच
--- 000 ---

श्रेष्ठ

पारंपरिक म्हणा
की प्रवाहपतित
माणसांमुळेच येते
जग अस्तित्वात

मनांना जर
सवयीच नसत्या
सुखदु:खांच्या
तर कुणी केली असती
सर्व शास्त्रांची समर्थने
कुणी धरला असता आग्रह
अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा

नवे काही शक्यच नसल्याने
नव्या नव्या बागा
केल्या जातात निर्माण
पुढाऱ्यांची आत्मचरित्रे
करत राहतात
सनसनाटी गौप्यस्फोट

होत राहतात गौरव
आकाशातल्या कसरतींचे
आणि शोधून काढले जाते
रहस्य एखाद्या कवीच्या मृत्यूचे

आता हे साठत जाणारे
शब्दांचे ढीग
थांबवताच नाही येणार

आपल्यापेक्षा श्रेष्ठ
असे जगात काही असावेच कशाला

या प्रश्नाने
ग्रासत राहिले जातेय मन
--- 000 ---

ओळख

अली अलीकडेच झालीय आपली ओळख
जुन्या खूप लिंक्स निघाल्या
तो नाही प्रश्न पण होतेय काय
की सेम तुमच्यासारखीच दिसणारी
आणखी दोन माणसे आहेत या भागात
सेम टक्कल सेम पांढरे केस
त्यामुळे घोटाळा होतोय
मला भेटणारे
ते तुम्ही नसून ते आहेत
असे समजून
मी ओळख न दाखवता
पुढे जातोय राग नका मानू

तुम्हीच मला आधी
ओळख दाखवायची
अशी व्यवस्थाच ठरवून टाकू
मला स्मृतिभ्रंश नाही झालेला
आणि मी शिष्ट वगैरेही नाहीय

चुकून त्यांना मी
तुम्ही समजलो तर
ते पडतील बुचकळ्यात
तेच मला विसरलेत असे वाटून
ते खजील होतील
किंवा मग आमची नवीनच
ओळख होईल
मग गोंधळ वाढेल उलट
त्यांना मी तुम्ही समजणे
हे त्यांना बरे नाही वाटणार

माझ्यासारखे तर सध्या कुणी
नाहीय इथे तसे झाल्यास
तुम्हालाही हीच राहील सवलत
मग आधी
मीच दाखवत जाईन ओळख
तुम्ही तुम्हीच आहात असे समजून
--- 000 ---

प्रत्यक्ष जगणे

प्रत्यक्ष जगणे
हे आधीच
ठरवलेल्या चौकटींप्रमाणे
कसे असेल
त्याबाबत
कोणताही निष्कर्ष काढायचा असेल
तर तो ठरलेल्या चौकटीत
जगण्याला बसवूनच काढावा लागेल

याहून भारी तर
हुशार विवेकी नीतिमान
लोक रडताहेत
ते म्हणताहेत की सगळी
समाजमाध्यमे प्रसारमाध्यमे
वापरून
खोट्या बातम्या खोटे विचार
पसरवणे चारित्र्यहनन करणे
आणि यावर आधारित
लोकमत तयार करणे
अशा कामांची कंत्राटे
घेणाऱ्या कंपन्या आहेत
ते विवेकी म्हणताहेत
किती वाईट आहे हे
जणू माणसे
उपलब्ध साधने न वापरता
मुळात असू शकणाऱ्या
एखाद्या प्रत्यक्ष जगण्यावर
एखादी बाजू न घेणाऱ्या
अशा सत्यावर
चालवू शकतील जग
लोक त्यांच्यासारखे विवेकी नाहीत
म्हणून होतोय सगळा
खोट्यांचा राडा

खूप खोटयांचा तौलनिक अभ्यास करूनच
तर चालणार प्रत्यक्ष जगणे हे सत्य त्यांना कळत नाही
--- ०૦० ---

राहिलेच काय

मी कुणालातरी फोन केला
मी कोल्हापूरला येतोय
तर तिथली हॉटेल्स दुकाने
यांच्या जाहिराती उमटू लागल्या
स्क्रीनवर
फ्रिझ घ्यायचाय म्हटल्यावर ते येऊ लागले
जवळचे कुणी गेले हे कळताच
सामानाच्या जवळच्या विक्रेत्यांचे पत्ते आले
आमच्या इतके शुभ्र कापड कुठेच नाही मिळणार
असे एकाने म्हटले होते

चुकून विश्वासाने कुठेतरी
प्रेयसीबद्दल बोलून गेलो
तर समोर सुंदर तीन नावे आली
इथूनही प्रतिसाद मिळू शकेल
असे त्या सेवा दुकानदाराचे म्हणणे होते

खरे तर जे आहे ते बरे चाललेले असूनही
आता मी विचारात पडलोय
की ही की ती की ती की ती

कहर म्हणजे याला जोडून
घटस्फोटाच्या केसेस चालवणाऱ्या
स्त्री-पुरुष वकिलांचे पत्ते आले
अशा बाबतीत पुरुषांनी स्त्री वकील करू नये
कारण त्या पक्षपात करतात
असे एकाने म्हटले होते

आता माझे असे राहिलेच काय
असा विचार आला
तर खिन्नतेतून बाहेर काढणारी पुस्तके
डॉक्टर्स आणि काही बाबा
समोर आले हसऱ्या चेहऱ्याने
एकाने ध्यान केंद्राचा पत्ताही पाठवला

मी बसलोय निश्चल
--- ००० ---

खुळे

एकमेकांशी काही संबंध नसलेले
बेफिकीर आत्ममग्न कण
आणि कान गाड्यांचे हॉटेलांचे इस्पितळांचे
टॉवर्सचे
छायाप्रकाशांचे अर्थांचे
स्वप्नांचे हळूच
झालेल्या स्पर्शांचे

असे चित्र मात्र एकच
सगळे सापडलेले
एका क्षेपात

जणू आठवणी लिंबोळ्यांच्या
बकुळ फुलांच्या
गुलमोहोरातली जाड पाकळी खाताना
आनंदासह झालेल्या
आजारपणांच्या

परीक्षांचे निकाल
आणि फर्स्ट डे फर्स्ट शो
हे सगळे

चोंबाळे आहे एकत्र
हेच किती खुळे
अवयवांचे दाते
चक्राकार हवेत

जेव्हा कळतो प्रश्न
हे सुटे सुटे
आहे की एकत्र
तेव्हा मोठमोठे तत्त्वज्ञ
होतात आडवे

आणि त्या चित्राला
मी म्हणून जातो
वाह
--- ००० ---

तळमळ

त्यांचे स्कॅम सापडावेत
घोटाळे प्रकरणे लफडी
सापडावीत तडीला नेता यावीत
या तीव्र इच्छा तर
सगळ्यांनाच असतात
ते किती वाईट संधिसाधू दुष्ट
गरिबांबद्दल बेफिकीर
आणि समाजविघातक
आणि देशविघातक आहेत
हे सिद्ध करण्याची तळमळ
तर सगळेच पिढ्या न पिढ्या बाळगून

कुत्सित उपरोधिक बोलणे
आपण सामान्यांचे प्रतिनिधी म्हणत
जरा रफ बोलत शिव्या वापरणे
सात्त्विक संतापाबरोबरच
नैतिक क्रोध बाळगणे
आणि सतत शिंगे उगारून
उष्ण ताणात असणे
ही तर
जगण्याची सर्वप्रिय नागरिकता

हे नुसतेच
सत्याचे आग्रह नसून
सगळ्यांच्या जगण्याचे आधारच

भावी विजयाची हितवर्धन
गीते गात कुणी आस्तिक कुणी नास्तिक
पण सर्वच तप्त मस्तीक

कोण आहे तो तिकडे
अशाने जगणे रोगट होईल म्हणणारा
त्याचे आधी उच्चाटन करायला हवे

आवडीचे जगण्यासाठीच तर
लोकशाही पक्ष पुढारी विद्वान आणि प्रवक्ते
--- ००० ---

नील

सापडले किती विखुरले किती
याचा कधीच नाही पत्ता लागू शकत
पण जगायचे तर काही ना काही
कामचलाऊ वास्तव लागणारच ना

आपण प्रभावी ठरायलाच हवे
अन्यथा कुणीही येऊन
नील पळवून आपली बायको
या विचाराने
मजबूत ठेवावेच लागते
अनुयायांचे मोराल
आणि विश्वास आणि जिद्द

आयफेल टॉवर येतोय
आपल्या यशाच्या आड
तो पडायला हवा
झालाच आहे तो खिळखिळा
या वर्षी पडेलच तो
असे घडवायचे वास्तव

नाही तरी ते घडवावे लागतेच
आपण म्हणू ते घडावे या प्रयत्नात

ते म्हणतात आपल्या
पायाखालची वाळू घसरलीय

मराठी साहित्यिक मात्र
वास्तववादाशी असतात
एकनिष्ठ आणि बांधील पण परिवर्तनशील

त्यांना एकच असतो प्रश्न
फार वेगात बदलतेय वास्तव
आहे ते पचवून साहित्यात आणायच्या आतच
पडतोय आधीच्या वास्तवाचा आयफेल टॉवर
तरीही सत्याचा उद्घोष ते थांबवत नाहीत
ज्ञानप्रसाराच्या मार्गावर
--- ००० ---

चालणे

माझ्याच विचारांचे
दगडधोंडे काटेकुटे खाचखळगे
अडवत जखमी करत राहतात मला
मध्येच अचानक काही
हवेहवेसे माझ्या प्रगतीचे अंबर
चमकते समोर
तेव्हा मी घाबरतो
म्हणतो टच वुड

माझा चांगला विचार
असणार निसर्गद्रोही
आणि आता
माझी हार अटळ आहे
असे समजून घायाळ
लाचार होत
मी स्पर्श करतो निसर्गाला

जिथे जिथे अडकवले
मी माझे मन
ते ते सगळे रस्ते
येतात माझ्यावर चाल करून

रात्र असते नांगर तर
सदोदित टाकलेला
ना समुद्र ना गलबत
मनातल्या मनातच
चालणे

जगात काय काय घडत असते
च्यायला
पण त्या मानाने
माझे बरे चाललेय टच वुड

पाहिजे तेव्हा खरे तर नको तेव्हा
थांबायलाच हवेत विचार
असे म्हणत मी धडपडतो
--- ००० ---

## तुलनात्मक

तुलनात्मक देशाचे भले आणि
तुलनात्मक इथल्या बहुसंख्यांचे भले
यांत तुलनात्मक आधिक महत्त्वाचे काय
यांतल्या सगळ्याच विषयांवर मतभेद झाले

तुलनात्मक पुरोगामी कोण
तुलनात्मक जातवादविरहित
पुरोगामी कोण आणि
अट्टल तुलनात्मक जास्त धर्मवादी कोण
यांवरही एकमत होऊ शकले नाही

सतीची चाल गेली
केशवपन गेले अस्पृश्यता गेली
आता तुलनात्मक गरिबी आहे

तुलनात्मक सैन्यावर
जास्त खर्च करणारे हलकट म्हणावेत का
की कुवत वाढल्यावर
सगळे हेच करणार आहेत

तुलनात्मक वर्चस्वासाठी झटणारे
प्रचंड महत्त्वाकांक्षांनी धुमसणारे
तुलनात्मक सत्याचे मालक
तुलनात्मक अधिक नैतिक
तुलनात्मक सात्त्विक संतापाने
ओरडणारे दंगे करणारे
लक्ष वेधण्यासाठी
टायर्स जाळणारे

यांतून एकच धागा तुलनात्मक
बाहेर काढत कसा उभारावा स्वर्ग
या प्रश्नापुढे काही शहाण्यांनी
हात टेकले दोन्ही हात टेकले गेल्याने
आता
डोके कशाने खाजवावे हा प्रश्न आला
तुलनात्मक उत्तराच्या शोधात
--- ००० ---

समीक्षा

यात काही तथ्यच नाहीय
फालतू आहे सगळे
जीवच नाहीय प्राणही नाहीय
दुय्यम-तिय्यम दर्जाचे आहे सगळे
ना दु:खाची जाण ना समस्यांची माहिती
नुसताच सेक्स आणि विकृती आहे
काळ संपलाय या कवितांचा
निर्जीव कंटाळवाण्या सत्त्वहीन आहेत या

झाली समीक्षा आता पुढचे घ्या
--- ००० ---

स्वप्न

आधी वाटायचे काही रोमँटिक काही घडावे असे
ज्याच्यासाठी आपल्या हाडांचे चंदन झिजवावे असे
पण जसजशी दिसू लागली वास्तव स्वप्ने
तसतसे दिसू लागले प्यायच्या पाण्याच्या टाकीत
मिक्स होणारे सांडपाणी

फ्रॉईड म्हणाला याला अर्थ असतो
असणारच ना
खूप प्रश्न जे येणारच नव्हते ना आले
त्यांच्यावर मनाने वेळोवेळी घेतलेली
कुरूप रोगट फोडांची अविरत मेहनत
जीत सतत मिसळत राहिले
भीतीचे वाळलेले काळपट रक्त

प्रचंड खड्ड्यांत अडकलेली माझी दुचाकी
आणि मदतीला कुणीच नाही
तरीही प्रयत्नपूर्वक मी होतोच यशस्वी
कुणीतरी माझा पाठलाग करते आहे
आणि मला वाचायचे आहे
स्टँडवर मी ढकलतो गाडी आणि
गर्दीत उभा राहतो एस टी ने पळून जाण्यासाठी
पण खूप गर्दी असते मला जागा नाही मिळत

एवढ्या मोठ्याने ही इतकी माणसे का हसताहेत
मीच मलाच माझ्या बेइज्जतीला
माझ्यावरच्या लाजिरवाण्या आरोपांना

इतरांवर हसणाऱ्यांत मी कधी का नसतो
मी नक्कीच एक घाबरट माणूस आहे
आणि तरीही समाजमान्य नसणारा

राहिलेले सगळे समोर स्वप्नात
न जगलेले जगणे रासायनिक उद्रेकात कधी कधी
एखादा सौंदर्याचा स्फोट घडवणारे
शरीरधर्म म्हणून
--- ००० ---

कलमे

एक लक्षात घ्या
आधी काय घडायला हवे होते
ते आताचे ढग नाही ठरवू शकत
त्या वेळी किती वाजता
कोण कुठे होते
याचा लोकशाहीशी काय संबंध

कालचक्र पुन्हा
तिथे नेऊन ठेवणे
हे अध्यक्ष नाही करू शकणार
किंबहुना त्यांना तो अधिकारच नाही
कलम तीनशे तेरा पाहिले
तर सलग ओळीने
वापरावे लागतात अधिकार
हे घडायच्या आधीच
ते घडणे
हे कोणत्याच कलमात बसत नाही

कुणीही त्रागा वा संताप करून
उपयोग नाही
न्यायात भावनेला स्थान कसे असेल

जे घडले त्याचे क्रम अबाधित ठेवूनच
आणि निसर्गाच्या अधिकारात
ढवळाढवळ न करता
कुणीही कसे
स्वत:चे अश्रू पुसून हास्य
फुलवू शकेल वा
शत्रूचे डोळे पांढरे
झाल्याचे पाहू शकेल एवढेच पाहा

शिवाय त्यात त्याच्या आधी
घडून गेलेल्या अनेक घटना
पाहाव्या लागतील
त्यांचीही आता कलमेच झालेली आहेत
--- ००० ---

एका वेड्या मित्राला उपदेश

एका वेड्या मित्राला उपदेश
करायची संधी त्याने ह्न मला दिली
मग मी जो माझा मलाच करतो नेहमी
तोच त्याला दिला

तुझे सगळे जगणे-वागणे
योग्य बरोबर न्याय्य अटळ समर्थनीय
असतेच रे पण त्यामुळे तुला इतर सर्वांचेच
ओढे नाले वारे रस्ते पायऱ्या खटकत राहतात
मिनिटामिनिटाला तुला हे सगळे
मेंदूत साठवत पुढे जावे लागते
तरीही तू यंग अँड हेल्दी आहेस असे दाखवत

तू खूप पगाराची नोकरी वा धंदा निवडतोस
आणि आयुष्य विकतोस
नुसते लौकर मरणे नव्हे तर जगतानाही
लावून घेतोस अनेक क्रॉनिक रोग
भविष्याची किंमत म्हणून
या जगात काहीच फुकट नाही मिळत
हे असते तुझे बोधवाक्य

तुझे उत्पन्न कमी असते कारण कौशल्य
कुठलेही नसते आत्मसात केलेले
कारण त्या भोसडीच्यांनी परंपरा निर्माण करत
तुला वंचित ठेवलेले असते
तू विद्रोही असतोस क्रोधी असतोस
उलथवून टाकायला उद्युक्त प्रस्थापितांची सत्ता

निसर्गाला ते नाही समजत
तुझी निद्रारंभ झोप मार खाते
आणि मग जलद नेत्रचलन झोपही
विचारांचे वेग थांबतच नाहीत

झोपेच्या गोळ्या वा दारू घेत तू अधीन होतोस
स्मृतिभ्रंशाला म्हणजे मरणच की

कोणत्याही कारणाने विचाराला तू स्पीड देतोस
तुला प्रचंड सामान्यज्ञानाचा टेंभा मिरवायचा असतो
तुला गायक म्हणून गाजायचे असते

निवडणूक जिंकायचीच असते

जे हवे ते घडत जावो वा न जावो
तू त्याची किंमत मोजत चालतोस

तू सुस्थितीत अस की हलाखीत
तू मेंदू थकवतच राहातोस
तुझ्या शरीरातले नवनिर्माण मार खात राहते
रोगप्रतिकार बोंबलतो उत्साह लोपतो
आता ही सवय हेच योग्य
असे म्हणत तू चिडचिड वाढवतोस
आपल्या वाट्याला आलेली परिस्थिती आणि माणसे
इतकी भंगार का होती
हा प्रश्न विचारायचे त्राणही तू गमावतोस

आता एक कर काहीही असलास तरी
डोक्यातल्या प्रश्नकेंद्राला आधी लाथ घाल
रागाने वा प्रेमाने वा समजुतीने
वा तडजोड म्हणून वा शौर्याने
यही तो है जिंदगी
असे म्हणत दौडत राहा
किंवा अंग मुडपून पडून राहा

कुठला ना कुठला रोग होतोच ना प्रत्येकाला
आता देशाचे रक्षण काय वाईट असते का
पण हजारो मरतातच ना त्यात
कुठल्याही योग्याचे त्या त्या प्रमाणात
अयोग्य परिणाम होणारच ना
खा रे तू हवे तेवढे गुलाबजाम
न खाण्याचे बरोबर वागलास तरी त्याचेही
असणारच ना काही हिंसक परिणाम

समजले ना आता पुन्हा पुन्हा तेच तेच
विचारू नकोस आणि विचारही नको करूस जा
--- ००० ---

नदी

दुतर्फी मान्यता असल्याने
मी पुस्तके टाकतो नदीत
ती बरेच चुकीचे वाचते
पण माझे विचार
संत राहतात उद्यासाठी
कारण त्यांना माहीत असते
हा अपमान नसून विश्वास आहे
--- ००० ----

कुत्री

निरनिराळ्या उच्च जातींची पाळीव कुत्री
फिरायला आणि विधींना
आणली जातात सकाळी
अनेक स्त्री-पुरुषांकडून

एकमेकांबद्दल कुतूहल असते
आणि परकेपणाही त्या उच्च वर्णीयांना
पण एकमेकांच्या रक्षकांची जाणीवही
असल्याने ती नुसती गुरगुरतात
एकमेकांकडे पाहून
कदाचित एकमेकांचा
देखणेपणाही आपुलकीने
त्यांच्या नजरेत भरत असेल

त्यांचे रक्षक स्त्री-पुरुष
जाऊ देतात त्यांना
एकमेकांच्या दिशेने
पण लगेच खेचतात
आणि हसून पुढे जातात

याउलट भटक्या कुत्र्यांना
रागच येतो त्या पाळीवांचा
ती जोरात ओरडतात
पाळीवही ओरडतात
जणू म्हणत
की गळ्यात पट्टा नसता ना तर
कोथळेच बाहेर काढले असते तुमचे
भटक्यांनाही तोच असतो कॉन्फिडन्स
पण ती त्या पाळीवांच्या रक्षकांना घाबरतात
ओरडत एकमेकांपर्यंत येतात ती
पण तिथेच थांबतात

पाळीव स्वच्छ असतात भटकी मळकी
पण दोघांनाही वाटतो एकमेकांचा मत्सर
वेगवेगळ्या कारणांनी
--- ००० ---

मर्द

तुम्ही मर्द असा वा नसा
अनिश्चितता असणारच

घटस्फोटात दोन्हीकडे
हजारो तपशील

दोन्हीकडे न्याय
वेळ आहे अजून

गाडी आलेलीच नाही
तर सुटून कशी जाईल

अपेक्षित क्षणापर्यंत
प्रक्षुब्ध राहा

होऊन होऊन काय होईल
अवकाळी पावसात भिजून

आजारी पडाल आणि वेळेवर
उपचार न मिळाल्याने मराल

तुमची कारकीर्द
पणाला लावेल

तुमचे श्वासोच्छ्वास
कारण तुमचे ठरलेलेच आहे

घडणाऱ्या घटनाच
फक्त अर्थपूर्ण

तुमचा जन्म झाला
ती एक घटनाच तर होती
--- ००० ---

## लगदा भक्कल आणि सपने

लगदा भक्कल आणि सपने
हे शब्द आले समोर आळीपाळीने
याच विश्वातले तर आहेत
असंबद्ध तरी कसे म्हणणार

पहिल्यांदा युनियन बदलली
तेव्हा नव्या पुढाऱ्याला सांगितले
आधीच्या युनियनचा पुढारी इस्पितळात आहे
मी भेटायला जाणार आहे गैरसमज नसावा
अरे आम्हीही जाणार आहोत नो प्रॉब्लेम
एक वेळ आपण एकमेकांना देशोधडीला लावू
पण माणुसकी सोडायची नाही
भेटल्यावर जरूर हाय हॅलो करायचे

मग तर छानच
माझे सपने प्रत्यक्षात येण्याचा हाच तो काळ
म्हणत मी निसर्गसौंदर्यात मश्गूल झालो

युनियन बदलून एक समस्या सुटते
पण तिची भक्कले उडून जाऊन बसतात
इतर अनेक यंत्रांच्या सांदिकोपऱ्यांत
आणि कुठे कुठे काय काय दुखतेय
ते कळेनासेच होते

कालांतराने होतो लगदा
माझ्या विचारांचा आणि आकांक्षांचा
मग मात्र मला कंटाळाच येतो
आशावाद बहुमत आणि घंटा यांचा
तरीही उर्वरित जगणे जगायचेच
ही माझी अभेद्य भिंत असते
--- ००० ---

उंदीर

एक उंदीर कुरतडतोय
एक कदाचित येऊ घातलेली घटना
आणि मन त्याच उंदराला सांगतेय
हटव स्वत:ला

नॉर्मल जगण्यात ही घटना
हवीशी पण नकोशीही
घडावे सगळे असेच
पण त्या घटना नसाव्यात
अरे परमेश्वरा थांबव हे
तुटतोय एक एक धागा हृदयात

उंदीर हसतो म्हणतो हे रद्द होऊन
तुला तेच हवेय माझे काम थांबणार नाही

घटनांचे नसेल असे असू शकेल का जगणे
या प्रश्नानेही वाटतोय विसावा क्षणभर
--- ००० ---

नाटक – एक वर्तमान

न कळता बोलून फायदाच काय
वर्तमानात जगा हा बोध ठीक
पण कळतोय का अर्थ
वास्तवात खरे तर असतात
भूतकाळ आणि भविष्यकाळ
वर्तमान काळ नसतोच
पण आता
उलटे करा म्हणताहेत
भूत भविष्य जाऊ द्या
वर्तमानातच घडवा नाटक

समजतेय का
वर्तमान म्हणजे निव्वळ पोकळी
काहीच नसलेली
ना ग्रह ना तारे ना सूर्य ना पृथ्वी

आहे का असा एखादा संगणक
जो वर्तमानात करेल सर्च
आणि शोधेल काही
माहिती नसलेले

कोण असेल दिग्दर्शक
या नसलेल्या नाटकाचा
कोण करेल याची प्रकाशयोजना
मेंदूबाहेरची
कोणती अभिनेत्री
होईल माता
भावनाहीन
आणि कोणता नायक
म्हणेल स्वगते
नसण्याचे स्वागत म्हणून

प्रेक्षागृहात असतील
एक एक प्रेक्षक
स्त्री असो की पुरुष
ज्यांचे डोळे असतील
कथाबाह्य आणि कसलीच
अपेक्षा न करणारे

बाहेरून काही नकोच आहे
कारण मी म्हणजे एक
खजिना पूर्ण गरीब
हेच तर आहे
उपकाराचे नाटक
आपोआप चालणारे
म्हटले तर उरलेले

गालिब म्हणाला
खयाल अच्छा है
विचारांकडे पाहून तो हसत होता
विचार समजत होते की ते आहेत

येणार कुणीच नव्हते
हे तर नसलेल्या गोष्टींचा
शोध घेणारे नाटक
बेकेट म्हणाला मलाच नाहीं माहीत
तर तुम्हाला सांगू काय

खानोलकरांनी सांगून ठेवले
कोणत्या काठीचे हट्ट चालतील
आणि कोणते नाही चालणार
ते होते बाजीराव पण शून्य उरले

नाटकात खुपसलेल्या सुरीने
मेलेली विद्यार्थिनी
असलेले काही लैंगिक देत होती
की नसलेल्या जगात अंतर्धान पावत होती

एका नाटकात आला संवाद
तू आधी होतास तसाच चालला असतास
नाटक असेच तर घडायला हवे
काहीच न घडल्यासारखे
वर्तमानात
--- 000 ---

बेडूक

तो साधू रोज
कडुनिंब खाई
पुन्हा आमच्या
निर्ढावलेल्या राहणीत
जाऊन पाहावे
असे त्याला कधीच वाटत नसे

एकदा मी पाहिले
एका डबक्याशी ओरडणाऱ्या
बेडकाला जवळ जाऊन
त्याने सापाच्या तोंडून
काढून बाजूला टाकले

पण घाबरलेल्या बेडकाने
पुन्हा
सापाच्या दिशेनेच
उडी मारली
साधू हसला
जाने दो
म्हणून पुढे गेला

पण मी नाही ना म्हणू शकत
जाने दो
कारण मीच
असतो तो बेडूक

आता गेली का ती समस्या
हे पाहायला
मी पुन्हा
तिच्याकडेच झेपावतो
आणि विदीर्ण होत राहतो

पुन्हा मागे फिरायचे नसते
हा नियम मी वारंवार मोडतो
--- 000 ---

किती वाचावे लागते

कबूल तू मान्यताप्राप्त दर्जेदार नोबेल
कविता वाचतोस
पण हे तुझे व्यसन आहे का
की तुला वाटते तू
हळूहळू प्रगल्भ होत जाशील

म्हणजे काय होईल
भिंतीआडची तुझी भीती जाईल
की अजिबात न पटणाऱ्या
पत्नीशी तू प्रेमाने वागशील

तू सध्या जो आहेस
त्यात कोणता बदल
तुला अपेक्षित आहे

आणि झालास समजा तू
परिपक्व सुखदु:खांच्या परे
तर तुझे घरचे आणि शेजारी
अस्वस्थ नाही होणार का
तुझ्याशी वागायचे कसे
हे त्यांना कळणार तर नाहीच
शिवाय तूही त्यांच्या
अंदाजांना धोक्याचा ठरत जाशील

वाटले नव्हते हा
असा अमानुष होईल

ही झाली एक शक्यता
पण तरीही प्रगल्भ व्हायला
किती वाचावे लागते

की तुला प्रगल्भ माहीतगार
आणि प्रभावी म्हणूनही
सादर करायचेय स्वत:ला
बघ बाबा काय ते
--- 000 ---

लता इस्रो युनो

मुळात जगाचा इतिहासच माहीत हवा
शार्लमान चंद्रगुप्त अशोक
महायुद्धे कशामुळे झाली
मिटली कशी
जगातले भारताचा धरून
स्वातंत्र्यलढे क्रांत्या
काय कसे घडत गेले ते माहीत हवे
शिवाय जगातल्या आणि इथल्या
सर्व राजकीय पुढाऱ्यांची चरित्रे आत्मचरित्रे
माहीत हवीत त्यांतल्या सर्व गौप्यस्फोटांसह

जगाचा नागरीक व्हायचे असेल तर
टॉलस्टॉय शेक्सपियर तर हवेतच माहीत
शिवाय रामायण महाभारत इलियड
उत्क्रांती मानववंशशास्त्र थोडेफार
मानसशास्त्र आणि अनेक धर्म
तर माहीत हवेतच पण शिवाय
असंख्य अंधश्रद्धा कशा जन्मल्या
विचारसरण्या क्रुसेड्स नायगारा
मत्रो ग्रोटोस्की आईन्स्टीन नारळीकर
लता इस्रो युनो
वेटिंग फॉर गोदो
प्यासा

नोकरीधंदा वेगळा
आजारी पडणे वेगळे
एकाकीपणा वेगळा
भीती वेगळी खरेदी वेगळी
समाजाविरुद्ध वागणे वेगळे
त्यात आणखी एखादी हिंसक चूक झाली
तर तो भागच वेगळा

विश्रांती तर हवीच झोप
नीट न झाल्यास वाट लागते
आहार व्यायाम आणि मुख्य म्हणजे
शांत राहता यायला हवे
--- 000 ---

स्मूथ

रस्त्यावर उभा राहून
एखाद्या झाडाच्या शेंड्याकडे एकटक बघ
लोक जमतील पाहू लागतील
तेव्हा हळूच निघून जा
आतून काय चाललेय याची कुणकुणही न लागता
घडायला हवे सगळे जणू अचानक
फुटलेली पाईपलाईन
चर्चा दुसऱ्याच चालायला हव्यात
शीर्ष ओळी तिकडच्या वडगावच्या येऊ देत

आणि तो आहे डेथबेडवर कशाला या वेळी
त्याला सांगावी ती दुर्घटना
मरताना त्याला दुःख
होण्यात काय पॉइंट आहे

हेही उघड होऊन चालणारच नाही
कुणालाच काही
ताकास तूर लागू नये
अन्यथा विनाश किती होईल
हा विचार हवाच

टीव्ही मालिकेतही
बऱ्याच पात्रांनी एकमेकांपासून काही ना काही
लपवलेले आणि घटना जणू वेगळ्याच चाललेल्या

हजारो लपवाछपवी सभ्य
जगणे नीट चालण्यासाठी
गैरसमजांचे खरे समज लागतीलच
एकेकट्या मेंदूतही
किती काय काय असते उघड न केलेले
साळसूद सहीसलामत

लक्ष्य गाठायचेय सूड घ्यायचेयत
तर लागणारच हे असे स्मूथ नॉर्मल लाईफ
--- 000 ---

बोध

असे झाले की तसे होते
आणि तसे झाले की असे होते
हे सगळे द्या फेकून
आडवे मांजर डोक्यावर पाल
मुंगूस दिसले पक्षी शिटला
ये सब जाने दो विसरा टच वुड
वाटेतल्या एका देवळाला
राहिला नमस्कार श्रावणातला राहिला
सत्यनारायण वारी राहिली
दर वर्षी तुमचे
शेगाव गोंदवले शिर्डी ठरलेले असते
यंदा गोंदवले राहिले
कुलदेवतेची ट्रिप तर
सारखी लांबणीवर पडतेय
एक एक दिवस महिने वर्षे
खंतच खंत

किती करणार द्या सोडून
हे असे म्हणजे तर सतत
खंतीत वाया जाणे होणार

जन्मतारीख कुंडली चेहरा हस्तरेषा
अंगावरचे तीळ हे सगळे कसे बदलणार
या कुटुंबात जन्म अमुक
परिस्थितीचे परिणाम
हे दोष किती मानत बसणार

निर्भय बनो फ्री बनो
गॅरंटी आहे माझी नव्हे हो
एक तत्त्व म्हणा रहस्य म्हणा की सत्य म्हणा
की संतवचनाचा बोध म्हणा
खंत करणे हेच आहे पाप हाच आहे अडथळा

तसेच ज्ञानपीठ मिळाले म्हणून टणाटणा
उड्या मारत राहणेही पापच
समजतेय ना अब्सर्डिटी
--- 000 ---

विरंगुळा

प्रतिमा मलिन करण्याच्या
उत्कट धंद्याचे संकलन
पोषण आहार म्हणूनच करायचे
जे जे दोषमुक्त आढळतील
त्यांच्यावरची कारवाई
सराव म्हणून बंद तर ठेवायचीच
पण विरोधी मंदिरांच्या
स्वातंत्र्याला आकर्षणही ठेवायचे
विश्वविजेतेपदाचे

कायद्याची ताकद आणि अवैध बांधकामे
एकत्र नांदायला हवीत म्हणून
वाटल्यास
त्यातले अडथळे दूर करण्यासाठी
नेमावी एक समिती
साहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात

पारदर्शकतेचा अभाव म्हणा की
निधीचा गैरवापर हे सर्व टाळत काही काळ
करावे विक्रमी कामकाज

तात्पुरते लांबणीवर टाकावेत
त्यांच्या बदनामीचे प्रयत्न
आणि हल्ले काही काळ
नुसते मनात ठेवावेत

लखलखते तारे आणि तारका
यांचे उत्तेजक सत्कार करत
मतभेद म्हणजे मनभेद नव्हे
असे म्हणत
सी सी टीव्ही कॅमेरे
नेमके सज्ज ठेवावेत

मिरवणुका उद्घाटने शर्यती यात्रा
यांच्या ताज्यातवान्या जाहिराती करून
वाचत बसावे विरंगुळा म्हणून राशिभविष्य
--- ००० ---

वेडसर

एका वेडसर झाडूवालीने मला विचारले
किती वाजले म्हणजे मी किती साधा किती नम्र
या किंचित आत्मतुष्टीने पुढे गेलो तर पूर्ण चंद्र
क्षितिजापासून फक्त एक फुटावर होता
खूप वेळ असाच राहावा असे वाटत राहिले
पण तो तर दहा मिनिटांचाच सोबती होता
हेही कळत होते अस्वस्थता येत होती
सुंदर अजून खूप वेळ पाहायचे आहे
आणि मग आले लक्षात की हा माझा विचारच
लांब ठेवतोय तो चंद्र पूर्ण दिसतच नाहीय जणू
याचा दोष मी त्या वेडसर झाडूवालीला दिला
कुणाला काही पटवायचे थोडेच आहे
आणि कुणाला काय कळणार आहे
आपले आपले झाले समाधान बास झाले
--- ००० ---

ससेमिरा

तुझे अधू बिंदू पकडून
ते तुझे उच्चाटन करू पाहणार
तर तूही त्यांचे अधू बिंदू पकडणारच ना
एक असते अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य
आणि दुसरे असते कृतीचे
मी तुला काठी लावणार
पण तू मला बांबू लावायचा नाही
असे एकतर्फी सेफ स्वातंत्र्य असते
फक्त च्यूत्यांच्या नंदनवनात

डावपेच हे दुतर्फीच असणार
कोणते नैतिक हे ठरेल तेव्हा ठरेल
तोवर दोघेही बोंबलत राहा
तुम्हीच विवेकाचे पुरस्कर्ते

कोणत्या विभूतींचे महत्त्व वाढवायचे
कोणत्या नाही काय ढकलायचे
आज्ञानाच्या अंधकारात
हे सगळेच तर ठरवतात आपापला इतिहास

तुमच्याच मेंदूतल्या निरनिराळ्या केंद्रांतून
सुटतात फर्माने जी तुम्ही थांबवू नाही शकत
आणि म्हणता निष्कारण ससेमिरा आहे बाहेरून
--- ००० ---

भक्कम

आहेत थोडे मतभेद
पण आम्ही भक्कम आहोत
मतभेद नाहीच आहेत
किरकोळ धुसफूस आहे फक्त
हे त्यांची समजूत घालतील
एकीला मुळीच धोका नाही

असे झाले तर तसे होईल म्हणताहेत
जर-तर ला महत्त्व नाही
असा काही प्रस्ताव आलेला नाही
आणि यायचे कारणही नाही
आमचा कार्यकाल पूर्ण होईल

त्याने काही फरक नाही पडत
जनता बघते आहे मुख्य म्हणजे
जनता सर्व काही जाणते आहे
निवडणुका येऊ द्यात
जनता त्यांना खडे चारील
त्यांची जागा दाखवून देईल

पण भेटीगाठी
इतक्या का वाढल्या आहेत
बंद दाराआड लपून छपून
काय चालले आहे
हे दिल्लीला का गेले आहेत
त्यांचे ते दिल्लीहून का आले आहेत

अहो भेटीगाठी होतच असतात
कधी कामानिमित्त
आणि आम्ही शत्रू थोडेच असतो

बरे ते जाऊ द्या सगळे मते बदलणे
तत्त्वे बदलणे हेही मान्य रोज सकाळी
निदान त्या दिवशी तरी आम्ही
शिव्या कुणाला द्यायच्या ते सांगत चला
--- ००० ---

कोथिंबीर

वादावादातून झाली बंडाळी
की प्रेमाप्रेमातून की अवकाळी
येणाऱ्या सुप्रीम निकालातून
हे शेवटी व्यवहारात ठरते
कोथिंबीर दहा रुपये जुडी

यावर असतो एक उपाय
तेजस्वी माणसाच्या भोवती
असणाऱ्या आमरण कोंडाळ्यात
व्हायचे सामील आणि चेहऱ्यावर सतत
आदरयुक्त स्मित ठेवून
आणि त्याचा प्रत्येक शब्द
म्हणजे आपल्या कानांचे अमृत
समजून स्वत:च्याच जगण्याला स्वत:च
मदत जाहीर करत राहायचे

पण हे असणार पॅकेज
आपले जगणे किती निरर्थक
असे सतत समजत
त्याच्या भोवतीची मात्र हवा भारून टाकणारे
आणि म्हणणारे काही अर्थच नाही
जगण्यात अभ्यासात आणि गाण्यात
मग आपण कितीही असू द्या मावळे
बाहेरच्या लढायांमधले शूरवीर
पण कबूल करावेच लागणार
की आतल्या लढायांत आपण खातो माती

वैफल्य आणि निरर्थकता
हे एकत्र सेफ वाटते पण
वैफल्याला तरी काय अर्थ आहे
या प्रश्नाची नुसती चाहूल जरी लागली
तरी जिवाचा थरकाप होतो
हुडहुडी भरते दरदरून
घाम फुटतो आणि वाऱ्यात
फडफडत्या होर्डिंगप्रमाणे
सगळा भूतकाळच येतो धोक्यात

पाच मिनिटांत केस
रंगवून देणारे कलाकार आणि

तीन मिनिटांच्या स्वगतात रडवणारे
अभिनेते शेवटी बैठक संपवतात
निर्णयाविनाच

बरे झाले देवा ते सत्तेवर आले
बरे झाले देवा ते मरून गेले
अशा सर्व राजकीय
उलथापालथींबरोबर
स्वत:च्या जगण्याचीही उलथापालथ
होणारच कारण सगळे  मिळूनच तर असते
असे म्हणणारे लोक भोसडीचे
इतर सर्व फाटाफूट गटतट टोळ्या
ही बाजू ती बाजू मात्र मान्य करत
दुर्लक्ष करत असतात साध्या
पाणीपुरवठ्याच्या कामाकडेही
हे समजून उपयोग काहीच नसतो

कारखाना जळला एकाधिकारामधला
कापूस जळला जीव
कुणावर तरी भाळला
या सर्वांत हेतू उद्देश आणि संदेश
पाहणारे लोक आपण जणू अंतिम
सीआयडी आहोत असे समजत
गाणे गातात वो नीली छत्रीवाला
हर तालेकी चाबी रख्खे हर चाबीका ताला

जाऊ द्या कळले ना आता कविता
कुठेही चिकटली की दु:ख होते
ती स्वैर अनिश्चित जात राहायला हवी

अन्यथा
ग्लॅमर न मिळाल्याने कुढत बसणे
हाच होईल जगण्याचा हेतू
सर्व ताऱ्यांच्या सह्या जमवत
आणि हा अमुक यांचा चष्मा जपत
--- ००० ---

कसले अनुभव

तुम्ही दारूपलिकडे
गेलाच नाहीत

तर कसले अनुभव
असणार तुमच्या गाठीला

एडस झाल्यावर
जगणे कसे होते

किंवा छिन्नमनस्कतेत
आपली आवडती

गाणीही नको वाटणे
पुस्तके सगळी

फाडावीशी वाटणे
हे काहीच न घडता

तुम्ही मनाचे
सर्वात्मकतेचे

कसे काय बोलता
दोन वेळचे जेवण

मिळेल एक वेळ पण
इथे दयाही नाही चालत

आम्हाला एकमेकांना
एकमेकांबद्दल

सहानुभूती असते
पण कधीही काहीही

घडू शकते
एवढे तरी माहीत हवे
--- ००० ---

## मुडपून

यडं आहे ते
एकच विचार धरून बसतं डोक्यात
वर्षानुवर्षं स्वातंत्र्याच्या गप्पा मारत
जरा कुठं काही खुट्ट झालं
त्याच्या विचारावेगळं
की ते एक तर खवळतं
किंवा कुत्सित बोलू लागतं

निसर्गात विचार नसतो
म्हटलं की लगेच
ते न्यूटनचं सांगू लागतं
कुठल्याच विचाराचं काहीच
सिद्ध न होता ते
स्वत:ची शेपूट घट्ट धरून ठेवतं

ते काही त्या विचाराचं माजुरडं
बोललं की त्याच विचाराचे चार रोगी
किंचित प्रेमळ हसत येतात
आणि त्याला हळूहळू शाबासकी देतात

सुमारे साठ-सत्तर वर्षं ते अंग मुडपून
राहतं सतत जग मूर्ख असल्यानं
जगाला मनातून शिव्या देत
--- ००० ---

दळलेले पीठ

एक नकार
म्हणून समोर बसले राज्यपाल
उत्तरे द्यायची वेळ येईल
तेव्हा पाहू म्हणत
उदास झालेले पक्षी
पाहण्याचे टाळून
उद्यावर ढकलली
आजची बातमी की झाले

सगळी माणसे सुमार असली
तरी उनाड हमालांचे भवितव्य
जरा हटके असूनही भराभर बदलत
डिस्चार्ज नाही मिळवू शकत

या अटळ परिस्थितीवर
उपाय म्हणून
केलेले आरोप
नृत्यशाळेने फेटाळावे
हे रीतीभातीला धरून झाले
असे कसे म्हणता येईल

शेवटी लिखित म्हणूनही
काही असतेच ना कुत्र्याने
दळलेले पीठ
किंवा अवदसा म्हणून उगवलेले
चांदणे

द्या सोडून सगळे दंभ
तुमचे बालपण नका सांगत बसू
तुम्ही पेललेली आव्हाने
नुसतीच चकित करतील
सर्व सुमार मानवधर्मीयांना
हसतखेळत

त्यापेक्षा मोठ्या आवाजात
गाणे लावा मै तो चला जिधर चले रस्ता
--- 000 ---

संसदभवन

जिभेने वस्त्रे उतरवली
तर वाळूत खुपसलेले
संसदभवन
येईल स्वप्नात सशस्त्र
आणि सांगेल रहस्य
पाण्यात मिसळलेल्या काळाचे

उगीच नादी लागून
कशाला घ्या करून
अवलक्षण जसे
आरसा वितळल्यावर होते
बालपणीच्या आसमंताचे धुके

खरे तर गरजच नाही
खूप शब्दांची
आणि वाऱ्यावर उडणाऱ्या
हवालदिल विचारांची
जगण्याला

हा काही बोध नव्हे
याने त्याला दिलेला
वा पवित्र सिनेमात
कमी वस्त्रांत
उभारलेला ताजमहाल

कुणी कुणाला काहीच
सांगू शकत नसले
तरीही उफाड्याचे
मत लपवणार कसे

दुखावण्याचा नाही हेतू
अगणित अनुभवांत
रेंगाळत राहिल्याने
जरा आळशीपणा येतो इतकेच

चुकून जरी वाटले काही
हवेसे जहाज तरायला
उत्तान बातम्यांत
तर मांड्या फोडून असणार धोका

सर्व पुराणे नष्ट होण्याचा

हे तरी निदान लावलेले हवे घरात
फ्रेम करून
जातायेता दिसावे सत्य म्हणून
--- 000 ---

भागधेय

माकडछाप गणल्या गेलेल्यांचे
नामोनिशाण मिटले
तरीही नाचत राहतील
इथे दर पावसाळ्यात मोर

हे जुने घिसेपिटे झाले आता
नवे काही बोल
आहे त्या मश्गूल उद्रेकात
कार्यरत राहून
काही नाही घडणार

टोकाला जा
आपण
हरवतोय की काय
अशी भीती वाटणे
हे अत्यावश्यक

मी स्वत: अनेकदा हरवलो होतो
आणि आता तर हरवणे
हेच मला जगणे वाटते

तू थकलेला असतोस सतत
म्हणूनच
क्रांतीसाठी तडफडतोस
तुला आणायचा आहे
भेदहीन समाज

सर्वांचे कपडे फाटतील
स्वप्ने होतील चक्काचूर
धावूनपळून
झिजतील रस्ते
पावसाळे येतील जातील

हा शाप नव्हे
हे आहे भागधेय
विचारवंत असण्याचे
--- 000 ---

ज्ञान

विचार घाबरतो
तळातून आलेल्या हवेत
पुन्हा त्याच्या त्वचेला सुटेल खाज
या विचाराने
त्रासदायक टाळावा तरी कसा
या नाइलाजात
म्हणत राहतो
नको ते आठवणींचे विचार
मुख्यत: रडू आल्याचे

नेमके दृश्य
न दिसल्याने
पृथ्वीला घट्ट
धरून ठेवणारे हवेत विचार
म्हणून सौम्यसेच का असेनात
वाफारे हवेत मनाला
दिलाश्यांचे सतत प्रयत्नशील
राहण्यासाठी
मधेच उडू नये
ट्रान्सफॉर्मर म्हणून

हेही विचारच
जणू सगळे कळणारे
स्वार झालेले
जगण्यावर आणि त्याच्या अर्थावर
म्हणत
हे असे असते ते तसे नसते

उदाहरण म्हणून विचार
पाठ करतात
पहाटेचे पक्ष्यांचे आवाज
आणि ज्ञान देत राहतात
भेटेल त्याला
--- 000 ---

कोथळे

थांबून राहिलेले मन
राहते सतत कार्यरत
बदल हे बुद्धतत्त्व
न स्वीकारता
बास आता ठीक आहे हे चित्र
आता हे राहू दे असेच
असे म्हणत दात
घासता घासता
ते सोज्ज्वळ टीका करते
प्रचलित राजकारणावर
विश्वास बाळगत
की रस्ते नीट ठेवतच
मनांना धक्के बसू नयेत
बदलांचे जवळची माणसे
लांब जाण्याचे
याचीही सोय होत राहील
मतदानातून

वारा हलतो
घन रुणूझुणू वाजतो
पाने येतात जातात
हे चक्र हजारदा
बडबडले गेलेले असूनही
देवाला बाप म्हणावेच लागते
घटना पोषक असाव्यात म्हणून

गर्दी सगळीकडेच असते
प्रत्येक सभा असते अद्वितीय
टोमणे प्रतिटोमणे
यांनी समृद्ध महामार्ग
खात्री देत राहतात
मनाला स्थिर ठेवण्याची

वेगवेगळी स्थिर मने
कोथळे काढत राहतात एकमेकांचे
--- 000 ---

मरतुकडे टीसी

प्रत्येकाला ठोकणाराय म्हणतोय
डाव्या हाताने कानाला मोबाईल
आणि उजव्या हाताने वेगात हँडल
धरून बाईकचे माजुरडा
दुर्लक्ष करत मंजुळ
रसवंतीकडे बिचारी गर्दी बसमधून
ओसंडताना मनाबाहेर धूर
आणि फवारे आणि धुपारे
आजारी पादचारी औषधाविना
करुणा भाकताना आणि मरतुकडे टीसी
विनातपास सोडताना पेंगत सर्वांना
ऊठसूट भरपेट चंगीभंगी होत
हाड मोडो की प्राण जावो स्वत:ला
अशा फुटक्यातुटक्या रस्त्यावर टरबुजे समजत
--- 000 ---

रहस्य

भाषणासारखे उतू गेले शब्द
तेव्हा होळी जवळ आल्याचे आठवून
श्रोते पांगले

किती असणार कविता
असून असून
म्हणून मरून गेलेले सेल
मातीत पुरले

याचा अर्थ
कळण्यासारखे काही नसतेच
असा नाही

जे काही असेल
श्रद्धेतून येणारे अमृत
ते पहिल्याच पायरीवर
उमटायला हवे
पाऊल न मोजता

खूप परिश्रम
माझ्या पाचवीला
पूजलेले असल्याने
मी सतत पळ काढत असतो
त्यांच्या दुर्गंधीपासून

हात जोडून प्रार्थना आहे
कदाचित माझीच मला
आता थांबू दे मला

मला नाही माहीत दुसरे
काय असू शकते ते

मी चंद्र पाहतो तेव्हा चकित होतो
यातच असावे काही रहस्य
असे वाटते खरे
--- 000 ---

गॉगल

तो नट कंटाळलेला असतो
त्याचे तेच तेच
जिंकणे पाहून

पाठलाग घडताना
जेव्हा लागते संगती रस्त्याची
तेव्हा सुरक्षित वाटते आणि

संचारतात
महामहोपाध्याय त्याच्या
अंतरात्म्यात जगाला

संदेश देण्याच्या इराद्याने
की काही ना काही
माहीत असल्यामुळेच

वाटते भीती
ब्रेक तर करणार नाही कुणी
फेल किंवा

आडोशाला नेऊन
नेमक्या वेळी
आपले गुपित तर

चोरले नाही जाणार
जगण्याचे आणि
सेंट मारलेल्या क्षणांचे

आत्महत्या की खून
या अज्ञानात तरी
सापडू नये आपला मृत्यू

तिकडे आपण अमर होतो
इथे आपला गॉगल
कधीही होईल विकल
--- 000 ---

ते

त्यांच्याच पक्षात त्यांना कुणी विचारत नाही
ते स्वत:चे अस्तित्व दाखवायचा प्रयत्न करताहेत
त्यांच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे
ते वैफल्यग्रस्त आहेत
ते घाबरलेले आहेत
ते लाचार आहेत
विचारांशी त्यांना काही देणेघेणे नाही
जनता त्यांची लक्तरे काढेल
त्यांनी नैतिकता सोडलेली आहे
ते बेकायदेशीर आहेत
ते भ्रष्टाचारी आहेत
ते जेलला घाबरतात
त्यांची एवढी माया आली कुठून
ते स्वार्थी आहेत
सत्तेचे भिकारी आहेत
त्यांना जनतेशी काही देणेघेणे नाही
जनता त्यांचा कोथळा बाहेर काढेल
जनता त्यांना बाहेर फिरू देणार नाही
ते विश्वासघातकी आहेत
ते धर्माधर्मात फूट पाडणारे आहेत
ते जातीजातीत फूट पाडणारे आहेत
आम्ही सामोरे जाऊ
पोलिस संरक्षणाशिवाय येऊन दाखवा
सगळे बाहेर काढले तर पळता भुई थोडी होईल
त्या वेळचा तो कट त्यांच्याच घरी शिजला होता
त्यांच्यावर कशी होईल कारवाई
कर नाही त्याला डर कसली
ते त्यांना उगीच नाही भेटलेले
ते खचून गेलेत
पायांखालची वाळू सरकलीय त्यांच्या
ते नुसती निर्बुद्ध बडबड करतात
त्यांना महत्त्व नाही
त्यांना कुणी गांभीर्याने घेत नाही
त्यांना पलायन करावे लागेल
गच्छंती होईल
ते पडतील मरतील नष्ट होतील
--- 000 ---

स्वस्तिक

माझ्या उजव्या
गुरु उंचवट्यावर उमटलेय स्वस्तिक
हे पूर्वी नव्हते हे तर हमखास
शुभचिन्ह प्रचंड शुभ
म्हणजे आता काय होईल
कुठे लागेल माझा झेंडा
आता मी खास मी प्रकाशमान
होणार या अहंकाराने
मी घाबरतोय बराच काळ
अहंकार नसल्यानेच खरे तर
हे अवतीर्ण झालेय आणि आता
वा छान वाटतेय हे राहावे हे टिकावे
असे वाटण्याने हे जाणार तर नाही

मुळात साले ते जुनाट
धर्मवादी पारंपरिक शुभ तर नसेल
तसला तर मी नाहीय
कोणत्याही काळात
अर्थपूर्ण असू शकेल का हे चिन्ह

कमळ देऊळ मत्स्य लाटा
ही चिन्हे आता असली तर ती
काळानुरूप देतील का फळे
या विचारांनी वाढतेय धाकधुक
आपण होत चाललोय आत्मकेंद्री
अर्थातच यामुळे काळवंडणार आहे
आपले भविष्य

आज शुभ म्हणजे असेल तरी काय
डोक्यातला गोंधळ नाहीसा होणे
की खूप पैसा मिळणे

बोंबलत जाऊ दे सगळे
एवढे काय महत्त्वाचे आहे
शुभाशुभाला लाथ घालून
रिकामे जग हेच आपले अमर
--- 000 ---

विषय

विषय काहीही
नसला तरी चालते अचानक
वाटते लिहावी आता कविता
तेव्हा
अपघातात सापडण्यापेक्षा
हनीट्रॅप बरा म्हणून
अॅक्सिडेंट हो गया रब्बा रब्बा
म्हणता येते आणि
रब ने बनाई जोडी
असेही म्हणता येते
प्रत्येक वेळी

यासाठी सोडावे लागते
सदोदित मूल्य ठरवण्याचे
कारस्थान

खूप आहेत असे वेडे
जे आधी कवीला तपासतात
अंतर्बाह्य
आणि तो जर युद्ध
अटळ आहे हे पटणारा असेल
तरच सहानुभूती बाळगतात
त्याच्या शब्दांबद्दल

त्यासाठी विषय
हवाच कवितेला
अशी त्यांची कर्मठ मागणी असते
धर्मात ते
नास्तिक असले तरी

त्यांना वाटते देव
तर नाही येऊ शकत
आपली खोपडीच आपण
शाबूत ठेवायला हवी

ते खूप हिंसक असतात
--- 000 ---

सूर्य आणि समुद्र

काहीही झाले
तरी सूर्याला धक्का लावायचा नाही
असे ठरवून ते बाहेर पडले
एकजण म्हणाला मी तर
माझ्या आयुष्यात
कधीच इतका पछाडला गेलो नव्हतो
इतका वेळ मला
सिगरेटची तलफही नाही आली

दुसरा म्हणाला की इतका अगदी
गवगवा करायची गरज नाही
भारून हुरळून जावे असे खरे तर
काही असूच नाही शकत
भावनिक अवडंबर न माजवता
जे कळेल ते कडक उन्हात
कळणेच शक्य नाही

तिसरा गप्प होता
सांगा ना तुम्ही तुमचे
काही मूलभूत
पहिले दोघे म्हणाले
तर तो म्हणाला की तो सदोदित
उदास आणि निराश असतो
त्यातूनच त्याला
कळायचे ते कळत असते

सूर्य ही काही
तोंडी लावण्याची गोष्ट नव्हे
आणि एकमेकांच्या
तोंडी लागण्याचीही

जेवण सिगरेट झाल्यावर
त्यांना थोडी गुंगी आली मग
पायाखालची वाळू सरकल्याचे जाणवून
त्यांनी भराभर
समुद्र सोलायला सुरुवात केली
--- 000 ---

मोठे वजन

अत्यंत थकवा
वाटत असतानाचे शब्द
जणू मोठे वजन उचलावे तसे
नाइलाजाने
अर्थाकडे दुर्लक्ष झालेले

आता ना ऊर फुटणे
ना दगडाला पाझर

अतोनात घुसमटत
थांबलेले विचार

आजूबाजूने जग
वाहते आहे बहुतेक

असू दे

ही माणसे
कधी काळी ओळखीची होती
आता त्यांचे लक्ष नाही

त्यांना वाटले असेल
मला झोप लागलीय

माझे जागे असणे
आणि झोपेत असणे
यांत आता
अर्था अर्थी काहीच फरक नाही
--- 000 ---

ब्रेक

मी चाललो होतो
वाटेत तीन पोलिस उभे होते
त्यांना माझी काहीच शंका आली नाही
त्यांनी पाहिलेही नाही
मी गुन्हेगार नाही असू शकत
हा त्यांना विश्वास होता

खूप बरे वाटले
गुन्हेगार नसण्याचा केवढा हा फायदा
मी निरपराध मी निरपराध
या समाधानात राहता येते
याच पार्श्वभूमीवर करता येते
कितीही मार्गक्रमण

पण गुन्हा न करताही
कधी कधी
येऊन जाते मनात
की पटकन नकळत अचानक
घडून जाऊ शकतो गुन्हा
आपल्याकडून
तिरस्कृत होऊ शकतो आपण
असे विचार असूनही
ते तसे क्षण मात्र जात राहतात
बिनबोभाट

हे असेच चालत राहून राहून
समाधानात आता वाटतेय
समाधानाचाही येतोय कंटाळा

म्हणजे गुन्हा घडायला हवा होता
असे नाही पण या समाधानात मध्ये मध्ये
ब्रेक तरी हवे होते
--- 000 ---

अमर

घडून गेलेले तिचे
मी वगळले माझे तिने
मग आम्ही कोण
हे न विचारता आम्ही
जग उभारण्याची हिंमत ठेवली
त्यालाच प्रेम म्हटले
आम्ही घडवत असलेला भूतकाळ
सुद्धा वगळत आम्ही अमर राहिलो
--- 000 ---

वर्तमानपत्र

वर्तमानपत्र आज्ञातात ढकलायचे असेल तर
तत्परतेत हात आखडता चालणार नाही
नुसतेच त्रास थांबवा या अजेंड्यासाठी
राबायला इथले डागडुजी विभाग मोकळे नाहीत
मनाचा उपसा करायचे हे काम असल्याने
वर्दळीच्या चौकात खून करावेत
तसे हे आणखी एक चित्रपट असे
उडत उडत होणारे विनातिकीट काम नसेल
कधी वाटेल वादळात अडकलोय तर कधी
वाटेल निसर्गाच्या रम्य कुशीत विसावलोय
सगळे पैलू लक्षातही येणार नाहीत कदाचित

आजपासून चौकशी आणि उद्यापासून
पर्यटनाचा औचित्ययभंग म्हणजे
आजची पदवी लांबणीवर आणि पुन्हा हिंसाचार
असे होईल कारण हे भागनिहाय काम नसून
हा असणार आहे सम्यक निषेध
सलोखा सेवा विवेक असले गुळमुळीत काही
नसेल इथे ना एक एक टप्पा ना सलग संभाषण
दाद मिळवणे हा हेतूच नाही असू शकणार
ओढवून घेतलेली इष्टापत्ती म्हणून
कितीही काहीही अतिरिक्त असले तरीही
प्रयत्नांचा वेग वाढताच ठेवावा लागेल

मदतीचे हात कायदा लक्ष्य वा आगेकूच
अशा बाबींना इथे वावच असणार नाही
ही एक प्रकारची स्वघोषित दिवाळखोरी असेल
जणू मनातल्या पीडित आणि  अनुल्लेखित
समाजाचा उजागर होणारा इतिहास

तटस्थ राहू शकलात तर यालाच म्हणू शकाल
तुम्ही हास्यधुमाकूळ किंवा हजारो
दिवसांनी सापडलेले मृतदेह

फायदा कसला हे तर सगळे गमावणे
दिलखुलास निरिच्छ विसावाच पूर्ण
--- 000 ---

याच पायावर

खरे तर माहीतच नसते
कुठे दडून बसलेले असतात शब्द
आणि कसे येत राहतात लाईनशीर
त्या त्या वेळी

याच पायावर
पाहावे लागते जखमांचे
आणि रोमांचांचे अवडंबर
हेही लक्षात न घेता
की या रचनेतली एक तार जरी
तुटली वा झोपी गेली
तरी विस्कटतील सगळे शब्द
आणि विस्कटेल जग

हे ओळखून दयाबुद्धीने
पाहावे लागते माणसांकडे
कीव करत आणि सहानुभूती बाळगत
की यांना
सध्याचे शब्दांचे अवतरणेच
विश्वासार्ह वाटतेय

शब्दच आहेत
भांडणांचे कारण
शब्दच अटळपणे
ढकलतात त्यांना
प्रेमाकडे द्वेषाकडे
आणि वाटण्याकडे
की ही आहे माझी निवड

हा घोळ दिसणारा
माझ्यासारखा माणूस
इथे आध्यात्मिक नगण्य
निरुपयोगी घातक
आणि मुख्य म्हणजे
ठरतो मूर्ख शब्दांनीच
--- 000 ---

सेक्स

रंगांना तुम्ही
परके नका समजू
पाण्यावरचे सुगंध
आणि ओटीपोटातला दरवळ
यांचा मिळूनच तर होतो

बातम्यांव्यतिरिक्तचा आनंद

अन्यथा
माहीत कुठे असते
की भरली जातेय
सगळीच स्पेस

उधारउसनवार
इथे शक्यच नसते
बोली लावणारे आणि घेणारे
असतात तुमचे आप्तस्वकीयच

त्यापेक्षा फेडली असती सगळी सुखे
तरी लखडली असती जांभळे
वीर्याला पुष्टी देणारी

या विचाराने जाता तुम्ही
ध्यानमंदिरात
जिथे भेटतो तुम्हाला
तुमच्या शाळेच्या भिंतीचा
उडालेला रंग

बंबात तापवलेल्या पाण्याने
अंघोळ करावी
आणि पूजेसाठी व्हावे तयार

सेक्सी

यापेक्षा वेगळा धर्म
असेल फक्त स्वर्गात जा तिकडे
--- 000 ---

मोजदाद

याचा अर्थच असा
की आता
कृती नको आहे
शोधाची
वा आहे ते टिकवण्याची

आपोआप वाहात
राहू दे कंटाळा

तो माझा आहे
हेही नको भान

सूर्यस्नान होऊ दे
पृथ्वीला वा भिजू दे
तिकडे वर्षांचे
निद्रिस्त तांडव

मी कुत्रा आहे की बेडूक
की ऑफीसबॅग की
घरंगळत
चाललेल्या घटना

नको सोयरसुतक
नको कृतकृत्यता
नको माझ्यावर स्पॉट

माझ्या खिशात
पडून असावे विश्व दर्शन
आणि माझा देह
राहावा पडून
माझा नसल्यासारखा

काळाची मोजदाद हरवलेला
--- 000 ---

अदृश्य

अदृश्यच राहता आले
तर बरेच

दीस एक वेळ
पण असल्यासारखा नको

क्षणभरच दीस
डोळ्यांना कळायच्या आत

मग खूप काळ गायब हो
तुझ्या त्या दिसण्याचा

अंदाज घेऊन
कदाचित ते शिव्या देतील

त्या पोचणारच नाहीत
असा तू असावास कुठेतरी

असे समजून ते
निराश होऊ देत

त्यांच्या मनांत घुसण्याची
तुला गरज नाही

याच्या संतापात
ते अधिकाधिक

ठळक होत राहतील
स्वत:चा छळ करत

तुझ्या त्या दिसण्यानेच
त्यांचा क्रोध

अनावर झाला
असे समजून मेले

समज ते
तर तू नाहीस जबाबदार

तरी तुला त्याचे दु:ख होईलच
पण तेही दिसू देऊ नकोस
--- 000 ---

अद्भूत खेळ

निरोप देताना फुटलेली
जलवाहिनी पी एच डी च्या
आधाराला आली
आणि उधारीला आली
मसाजसेवा समाजाची

उगीचच सुरू झालेले
सुवर्णपदक
आणि शपथा घेणारी माणसे
स्त्रीच्या उत्थानाचा
रचू लागली राडारोडा

केमिस्टांना वधू पाहिजे
म्हणून नगरपरिषदेत
ठेवला अद्भूत खेळ
प्राचीन ज्ञानात पोहण्याचा
शब्दकोड्याकडे दुर्लक्ष व्हावे म्हणून
--- 000 ---

हसणे

सुमारे दीड वर्षापूर्वी
घेतले हे पेन वाटले नव्हते
की याच पेनाने होतील
या महत्त्वाच्या सह्या

सरकारी ऑफिसात
सुमारे बारा लोक बसतील
अशी बाकडी बाकी उभे
खूप गर्दी वकील
एकेकाबरोबर आणखी कुणी
वयस्करांना प्रेमाने घेऊन आलेली
नवी पिढी ना पंखा ना वॉश रूम
ना पाणी ना कँटीन ना लिफ्ट
उंच अवैज्ञानिक पायऱ्यांचा जिना
आत साहेब आहेत

लोक सारखे आतबाहेर करताहेत
काही बाहेर जाताहेत
तर तेच पुन्हा आत येताहेत
लोक कमी का होत नाहीयत
मग कळते की संगणक सिस्टम
थांबली होती
खूप गुंतागुंत
एकेक वाक्य नावे आकडे
सर्वच
एवढ्यात आत तणतण
अरे हे कसे काय काम तर
खुशीत करायचे
हीच तर असते ना सिस्टम

काही वेळाने आत
काम पुढे चालल्याचे कळते
इथे नंबर कसे असतात
कोण जाणे म्हणत बारा बसून बाकी उभे
वेळ जात राहतो
वकील ये-जा करत राहतात
काहींना आत बोलावले जाते
ते बाहेर आल्यावर पुन्हा थोड्या वेळाने
त्यांनाच बोलावले जाते

माणसे एकमेकांशी बोलतात

प्रश्नांची चर्चा होते
काही अंतरावर
दोन तरुण स्त्रिया एकमेकींशी
सस्मित बोलताहेत त्यांचा
आवाज नाही येत
त्याने निवळतेय जरा वातावरण

एवढ्यात आतून मोठ्याने
हसल्याचा आवाज येतो
हसणेच का नक्की पुन्हा एकदा
येते हास्य एकजण हसतच येतो बाहेर
बरोबर म्हणजे इथूनच
चक्क हसणे
हसणेच होते ते नक्कीच
बाकी कुणी नाही हसत
पण तरीही हसणे
हे जरा जास्तच वाटतेय
कमाल आहे कोण हसले असतील
साहेब हसल्याशिवाय दुसरे कुणी कसे शक्य आहे
--- 000 ---

# कात

जुगण्यापूर्वी
सर्प आणि सर्पिण
पाहतात आकाशातले
मल्टिप्लेक्स
आणि कोणताच धोका नसल्याने
होतात रममाण

नंतर अंधार पडतो
त्यांना मूड कळत नसल्याने
कंटाळा नाही येत
पण येऊ शकतो
अति-आसक्तीतून
पाझरणारा आळस

ना उद्गार ना प्रश्न
फक्त
स्वल्पविरामांच्या जगात
ते फक्त उत्सुकता बाळगतात
काहीशी वेलांट्यांबाबत

मुबलक पिल्लांनी
बहरतो त्यांचा बाजार
अटीतटीने ते पाखडतात
वर्तमानाचे कण

चमकते उत्तेजक अंग
घेऊन
भीतीची देवघेव करत
ते सेफ राहतात

त्यांचा काळ छोटा आणि सरळ
असतो ते नागमोडी असले तरी
मध्येच फक्त तो कात टाकतो
वर्तमान पूर्ण निद्रिस्त असताना
--- 000 ---

आयुष्य

माझ्या जगण्याचा सनसनाटीपणा
हळूहळू लोप पावत आलाय
आता फक्त उमटतो तो
एखाद्या घटनेतून
एखाद्या तीव्र दु:खातून
किंवा
परदेशप्रवासापासून
वंचित राहण्याच्या अन्यायातून

फारच तक्रारी झाल्या
म्हणून टाकली खडी ओतले कसेही डांबर
आणि म्हणाले चाला आता गपचूप
चला खड्डे तर गेले असे आयुष्य
--- 000 ---

भ्रम की सत्य

साबणाच्या फुग्यांना
विचारांचे ढग कसे म्हणता येईल
शुभमंगल म्हणता म्हणता
युद्धाच्या सावल्या दिसाव्यात
तसे चाललेले समुदाय

एकेकटे
द्रवरूप पारदर्शक
स्वप्नात विरणारे
तत्त्वांचे मार्ग

कोण काय म्हणते
यावर सजलेले
सर्व महत्त्वाचे विषय
परिसंवादांविना
ओस पडलेले

वस्तू कोट्यवधी आहेत
पण सावरणार कोण
हाताबाहेर चाललेले मन
आणि थोपवून कोण धरणार
थकत चाललेले किल्ले

किती ही संमेलने
किती प्रहसने
किती वसने
फेडलेली

राहू दे आता
राहूकेतूंचे अंध घुमणे
विसावा म्हणून
असू दे वा मरू दे
आठवणींचे स्मशान

हे सगळे भ्रम की सत्य
याचा नकोच निवाडा
--- 000 ---

माजघर

माजघराची व्युत्पत्ती
मला नाही माहीत
मी आख्खी भाषाच साधारणपणे
अर्थाच्या आजूबाजूची वापरतो
अगदी धारेवरचे अर्थ
मी ठेवतो मोराच्या मांडीवर
आणि कोरा चहा पिऊन पुढे जातो

इथे येतो गांधींचा विषय
तोही मी साधारणपणे
आजूबाजूचाच निस्तरतो
माझ्यावर आरोपच आहे
की मी निष्काळजी आहे
अचूकतेबद्दल त्यामुळे खरे तर
मी कविता लिहूच नये

अचूक भाषा ना मी लिहितो
ना माझे वाचक पर्वा करतात
मोराच्या मांडीची

कवितेची भाषा
ही नसतेच ना शब्दार्थांची
तिला सतत फुटत असतात
साधारणपणाचे सांगोवांगीतले
वापरात असलेले मोघम कोंब

नेमके किती होते घोडे
याच्याशी कवितेला
ना देणे असते ना घेणे
उधळलेले पैसे वायाच जाणार
हे तिला माहीत असते

साधारण ते सगळे घिसेपिटेच असल्याने
कविता शब्दांना घालवत असते कवितेतूनच
हळुवारपणे आणि प्रेमाने आणि निर्ममपणे
--- 000 ---

इमेज

तिच्यासाठी मी
माझी कोणती इमेज सेव्ह केली होती
ते आठवेना आणि घाबरायला झाले

काय झाले मूड नाहीय का
तिने विचारले तिच्याकडे
आमच्या दोघांच्याही इमेजेस नीट होत्या

मी विसरलोय असे म्हणून प्रेमाने
तिच्याकडची माझी मागून
उपयोगच नव्हता

अजून तिला काही कळले नव्हते
तेवढ्यात आधी एक डास चावला आठवली
मग लगेच माझी नशीब झाले नीट सगळे
--- 000 ---

कुणी म्हणाले

कुणी म्हणाले ते घाबरले
कुणी म्हणाले त्यांनी सत्ता मिळवली
कुणी म्हणाले ते बळी पडले
कुणी म्हणाले आता
बळीराजाचे राज्य येईल

कुणी आनंदले
म्हणाले ये हुई ना बात
कुणी झाले दु:खी
कुणी म्हणाले अजब आहेत
हे जीवनाचे फासे
ही नियती म्हणावी
तर दोष तरी कुणाला देणार
माहीतच होते कुणी म्हणाले
जैसी करनी वैसी भरनी
असे म्हणत कुणी
मानवी जगण्यावरची
मास्टरी व्यक्त केली
कुणाला वाटला मुख्य प्रश्न
स्वत:ची मानसिकता बदलण्याचा
आता संताप कोणता बाळगावा
आता सत्याची कास कशी धरावी
आता जगाच्या भल्याचा
म्हणजे कशाचा करावा पुरस्कार
नवी बाजू स्वत:त मुरवून
कसे राहावे न्यायी आणि सर्वहितदक्ष
नवा शत्रू तरी कोण म्हणावे

डोक्यातून जात तर जात नाही
पण जात वाईटच हे पटते
आपण च्यायला धर्म डोक्यातही
नाही घेत पण कट्टरांमुळे
आपले प्रॉब्लेम होतात
धरले तर चावते
सोडले तर पळते
पुन्हा निवडून तर यायलाच हवे

आता कोण म्हणणार कुणाला
गद्दार विश्वासघातकी
पाठीत खंजीर खुपसणारे
तत्त्वहीन लाचार

गुलाम
किती वेळा करणार हिंमत
आणि जमेल तरी का प्रत्येक वेळी

आणि मग तुम्ही काय केलेत
आता तुमच्यावर येईल संक्रांत
तेव्हा होणार का शहीद
देशासाठी पायाचे दगड

होतेय ते चांगले आहे
वाईट आहे हे असे काहीबाही म्हणत
विचारी विवेकी स्वातंत्र्यवादी झाले
खट्टू
--- ००० ---

भव्य ब्रेकप

वंचितांची स्थिती सुधारायलाच हवी
न्याय समता ही मूल्ये हवीतच
याच उद्दिष्टांसाठी तो आणि ती
एकत्र आले पण तो होता जहाल
आणि ती मवाळ यातूनच
घडणाऱ्या घटनांमुळेच झाला
त्यांच्यांत ब्रेकप आणि नंतर
आणखी एकीशी झाला ब्रेकप त्याचा
वेळच मिळत नसल्याने राहिल्या
दोघीही अलग मार्गांनी वेगळ्या
पुरुषांसह पुढे जात समंजसपणे

केवढे भव्य उदात्त ब्रेकप
नाइलाज आणि पक्क समज असलेले
कटुताहीन पण दु:खदायक

त्याच्यावर नाटक लिहिले गेले
भव्य उदात्त पण शोकात्म

सामान्य माणसे ते पाहून दिङ्मूढ
होत राहिली दुर्दैव नियती हे शब्द
न वापरता आहे तेवढ्या बुद्धीने
सादर होत आणि तरीही
संतापजनक ब्रेकप भोगत स्वत:चे
स्वत:ला क्षुद्र समजत

किंवा ब्रेकप न होता भव्य पेलत
जे आहे ते आयुष्य कचऱ्यात जमा करत
--- ००० ---

जून

भूतकाळातून
येते भय
भयातून घडतात
नव्या स्मृती
स्वप्नात
वाढतो भूतकाळ
वाढते भय
वाढत जातात
चेहऱ्यावर सुरकुत्या
कोणत्या
कोणत्या भयाच्या
हे न कळता

असे तर नाही होणार
तसे तर नाही घडणार
अशा अनुभवी
शब्दांनी थरथरत राहते
जून मन
--- ००० ---

बाजार

राजपूत स्त्रियांचा जोहर
तिकडे जिंकली गेली हेलन
आणि स्वेच्छेने गेली ती पॅरिसबरोबर
रावणाला होता शाप
तिच्या मर्जीविरुद्ध केलास एखाद्या स्त्रीला स्पर्श
तसा तर तुकडे तुकडे होतील तुझे
द्रौपदीचे गर्वहरण

सगळीकडे जगभर
नुसतेच मुक्तीचे नारे

ब्रेन मॅपिंग करा प्रत्येक पुरुषाचे
हीच आढळली वृत्ती
तर कापून टाका त्याच्या मेंदूतला तो तुकडा
त्यामुळे त्याचे
वीर्य नष्ट झाले
वीरता नष्ट झाली
तरी हरकत नाही

आम्ही सांगितले होते
आमच्यावर आक्रमण नाही चालणार
पण तुम्हाला तर
पृथ्वी करायचीय पादाक्रांत
यात कुठे येतो प्रश्न
शांततेने आणि सहिष्णुतेने
आणि न्यायाने आणि प्रेमाने
जगण्याचा
वा मरण्याचाही

आपण वेगवेगळेच राहणार
नियम करू कायदे करू
मानवी हक्कांच्या याद्या करू

पण बाजारात मिळतो तोच माल
घ्यावा लागणार हक्क वेगळे
आणि जगणे वेगळे समझे क्या
--- ००० ---

कुंपणावर

शक्य असेल तेव्हा तेव्हा
मला दाखवायचेच असते
की मी थिल्लर नाही उलट माणसाच्या
उथळ आणि सखोल
सर्वच दु:खांबद्दल मी गंभीर आहे
माझ्या मेंदूतून येणारी
काळाची भेंडोळी खरे तर
नष्टच करू इच्छितात सर्वच दु:खे
पण माझ्या आडमार्गात येणारे
माझ्या गौरवाचे चाक
अडकते कुंपणावर
आणि लौकरच मी तिथेच रमतो
आणि शत्रू होतो
सर्वच प्रयत्नवाद्यांचा
आणि तात्पुरती निराशा पत्करत
वेडे ठरवत राहतो मी
सर्व धावपळ करणाऱ्यांना
कारण वेळेला रुग्णवाहिका मिळाली
की झाले एवढेच असते
माझे तत्त्वज्ञान मला सोसतच नाही
अतिरेकी सहानुभूती
आणि वारेमाप संवेदनशीलता
अर्थात हा सगळा परिणाम असतो
माझे बालपण गरिबीत गेल्याचा

एवढ्यावर नाही भागत काहीही करून
त्यांना एक तर मला त्यांच्यासारखीच हेअरस्टाईल
करायला लावायची असते आणि मी नकार दिला
तर मला खूप शिव्या देत
काढून टाकायचे असते मला नोकरीवरून

त्यांचेही बरोबरच असते एका दृष्टीने
प्रत्येक माणसाचा भूतकाळ बघत
म्हणजे किती लागेल सहानुभूती
अशक्यच आहे ना ते
--- ००० ---

कुबड

इकडे असे बोलणारे
तिकडे तसे बोलतात
कारण त्यांच्या कुबडात
असतो हमखास तर्क
जो प्रसंगी
त्यांना धाडसी करतो
वा बीपीच्या गोळ्या खात
म्हणायला लावतो गाणी
देशभक्तीची
हीच महान आकाशवाणी
समजत सामाजिक मजेची

ऊर फुटेस्तोवर
ते देत राहतात निकाल
त्यांना न विचारलेले
पण त्यांना आच असल्याने
तहह्यात सूर्योदयाची

आत्मतुष्ट पण कोरडे
असतात त्यांचे चेहरे
मोजमाप करणारे
इतरांच्या अंधश्रद्धेचे

प्रश्नांपेक्षा त्यांना
उत्तरे असतात प्यारी
भर सभेत निकराने
आयुष्य संपवावे अशी

ते दारू पितात पण
फक्त संवेदनशीलतेने
--- 000 ---

पडखाऊ

शांतता शक्य नाही
निर्भय बनो ही थाप आहे
कळलेय ना
मग आता प्रश्न कुठे येतो
परिस्थितीवर
नियंत्रण आणायचा
आणि श्रेयसाच्या प्रवासाचा

पाऊस कधी किती पडावा
आणि कुणी किती क्रूर व्हावे
यांचे मूल्यांत अनुवाद
करायची तुला अक्कल आहे
असे तू का समजतोस

नाहीतरी करायचे काय मग
आयुष्यभर किमान
आशावादी तरी राहायलाच हवे

याच तुझ्या पडखाऊ धोरणात
रंगत आले तुझे आयुष्य
जाऊ दे सगळे बोंबलत
शक्य तेवढे म्हण
आपण यशस्वी होत राहावे झाले
--- 000 ---

झंडू बाम

कविता काय की जगणे काय
कुणाचा कुणाशी काय संबंध
तुमची देन काय
दुसऱ्या कुणाच्याही जगण्याला
तुम्ही तुमच्या आहे त्या मार्गाने गेला
तो त्याच्या
ठीक स्वभावांत विचारांत
पडत गेले फरक
सूर्याचा पृथ्वीवर होतो परिणाम
आणि इथल्या वातावरणाचा
ज्याच्या त्याच्या परंपरेवर
तर मग म्हणू द्यात ना सूर्याला रवी
परिणामांच्या शास्त्रात
भान कसे राहील
वैज्ञानिक दृष्टिकोणाचे
खरे तर विज्ञान म्हणजे
परिणामांचेच शास्त्र असून

मी नास्तिक आहे
मी धैर्यवान मी वेगळा
मीच हितकारक
मीच निस्पृह
आस्तिक कसे बिचारे आहेत
या तुझ्या नजरेचा
त्यांच्यावरही होतो परिणाम
मग तू
कविता काय वेगळी लिहिणार
तू आणि तुझी कविता
यांचे परस्पर ते काय करतात
याची तुला कल्पनाही नसते
किंबहुना तू शहाणाच असल्याने
तू त्यांना किंमतही देत नाहीस

आता सांग
कवितेचे काय काम
नुसते परिणाम की झंडू बाम
--- 000 ---

## तू जे नाहीस

माझा आणि तुझा
काही संबंधच नसूनही
तू मी असल्यासारखा का वागतोस
माझी इच्छा नसताना
तू जे नाहीस
ते असण्याचे ताण का घेतोस

हे विचार चुकीचे आहेत
या विचारांमुळे हाल वाढतात
हे तुझे तूच ठरवत राहातोस

माझ्या असण्याचे फायदे
तुला कळलेले असल्याने
तू मला पुन्हा पुन्हा
अस्तित्वात आणू इच्छितोस
मी आणि तू
एकच असलो तरीही
तुझ्या कोणत्याही
फायद्यातोट्याशी माझा संबंध नाही

खरे तर
जिवंत राहण्याची हाव तुलाच आहे
माझ्या आवरणाखाली तुला वाटते
तुझी सुखदु:खे आपोआप
निष्प्रभ होतील
आणि माझ्या भांडवलाची महती सांगत
तुला मिळेल ग्लॅमर

तसे कदापि नाही होणार
हेही समजते तुला
मी दुष्प्राप्य नसलो तरी
प्राप्यही नाही
ही जणू एक  शोकात्मिका असल्याप्रमाणे
तू माझ्याकडे अन्यायी म्हणून पाहात राहातोस
किंवा निर्दयी किंवा क्रूर म्हणून
किंवा शत्रू म्हणूनही
--- 000 ---

ती गाणी

तेव्हा ती गाणी ऐकू येत
एखाद्या दूरस्थ स्पीकरवरून
मी पडलेला असताना
भिंतीकडे पाहात आजारी
पोपडे उडालेल्या

ती गाणी मला आवडत
पण परकी वाटत
त्यांच्या मनांत
शत्रुत्व वगैरे नव्हते
ती असत नुसतीच
वाजत ऐकू येत

इतक्या वर्षांनंतर
आता गाठलेय मी त्या गाण्यांना
अगदी जवळ आता समोरासमोर
आता दुरावा नाहीय
पण मूड तोच होतोय जागा
मळका पारोसा एकाकी
छानही वाटत
तो मूड ते क्षण
आता नसल्याचे

या गाण्यांना स्वाद आहे
सुगंध आहे
आणि अंधारातल्या गटाराचा
सडका नाद

ना मी ही गाणी तेव्हासारखी ऐकतोय
ना आतासारखी
दोन काळ मिक्स होऊन जणू
अवतरलाय एक वेगळाच काळ
या काळात
म्हणजे सापडलेलीच नाहीत
ती गाणी मला आजही
--- 000 ---

गोडवा

गायिकेने भोगल्या
इतक्या विरहिणी
वेगवेगळ्या आपापल्या
प्रियकरांच्या
जगात हरवलेल्या

आता गायिका नाही
त्या अभिनेत्रीही
गोठल्याहेत तिथेच

अजूनही ही गाणी
अंधार खरे करतात
आणि वाटते
ते नायक नशीबवान होते

ते नसताना
त्यांच्या निकट जगणारी ती मने
आजही
जगवताहेत
त्या दु:खी इच्छांचा गोडवा

कुणी पियानोजवळ
कुणी शेतात
कुणी काळ्या दगडी पायऱ्यांवर

आणि उगवतो आहे चंद्र दूर

हे सगळे पटतेय मला
आवडतेय दु:खी होणे
त्या सर्व विरहांबाहेर

आयुष्य व्यापणारे
गोठलेले
--- 000 ---

विरोधात

मी नसण्याचे
माझे फायदे तुम्हाला दिसतात
तुम्हाला वाटते ही आहे
माझी कमाई
याने निष्कारण तुम्ही
मला अस्तित्वात आणून
राजकारणात ओढू पाहता
हे टाळण्यासाठी
मी काहीच नाही करत
नुसताच नष्ट होत राहतो

तुम्हाला माझा हेवा मत्सर
राग द्वेष तिरस्कार वा प्रेमही
वाटत असल्याने
मी उगीचच कुणी एक
मोठा वाटतो प्रिय
वा अडथळा असलेला

मी सुखात आहे की दु:खात
याचा निर्णयच न करता येणे
हे असते
तुमच्या क्रोधाचे मुख्य कारण
याचे मला वाईट वाटून उपयोग काय
तुम्ही वावच नाही ठेवत
थोडाही माझ्या नसण्याला

माझे सोडा मी
दुष्ट असेन वा विकृत
तुम्ही उगीचच
अस्वस्थ होत बसू नका
मी नाहीच आहे असे समजून
जगत राहा तुमचे खात्रीचे जगणे

जणू काही मी
तुमच्या विरोधात आहे
असे तुम्हाला वाटू देत राहीन मी
--- 000 ---

शाई

प्रत्येक बिघडलेली गोष्ट
उतत मातात जाते
माझ्या मेंदूवर
करप्ट करत
माझा करपट भूतकाळ

त्याच्या चिडीने
ओसंडते शाई
ती पुसताना
काहीच आवरत नाही
विचारांना

व्यापार हा तर
अटळ म्हणून मान्यच असतो
कुणी रचले हे कारस्थान
या वेडगळ प्रश्नाला
हसतात सगळे बुद्धिमान

वाजले तर वाजेल
म्हणून बाळगलेली गाजरे
बाजारात मरून पडतात
नजर लागल्याने
हितचिंतकांची

आता आपोआप सोडला जातो
अमूकच घडावे हा आग्रह
आणि जाऊ दे मरू दे असू दे
कुणीही जबाबदार असे म्हणत
घडतो त्याग तत्त्वाचा

बाळगलेल्या पतंगाप्रमाणे
कण्णी तुटलेल्या
स्वीकारत जणू
जन्मत:चे अपंगत्व
अकारण अन्याय्य अविचारी
--- ००० ---

विडंबन

जे समोर आहे
ते असू शकेल

एक माहीत असलेले
विडंबन
जणू काही

माझ्याच झाडावर पिकतात
जगातल्या सर्व कथा
सर्व सुखदु:खांच्या

पारंब्या म्हणजे
माझ्याच विचारांच्या
पुढल्या पिढ्या
असे पाहिले तर

कंटाळा येईल हे खरे आहे
पण अजब म्हणावे
असे एखादे स्तोत्र तरी
सापडायला हवे

कुठेच काही
न शिजणारी स्वप्ने
बखोटीला मारून
चालत राहायची
ठेवलेलीच आहे तयारी

शक्य तो बौद्धिक काही नको
कुकरची शिट्टी
खडूची पावडर
कॅन्सर
वा पुसटसा ढगही

आराम म्हणजे घट्ट
फरशीवरून चालणे कसे असेल
--- ००० ---

संगीत खुर्ची

मला काही आठवत नसताना
आणि गरज नसताना
घेतला मी भाग
संगीत खुर्चीत

बहुतेक मी एकटाच होतो
स्टेशनवर
आणि गाडी अजून आली नव्हती

वडापाव खाऊन
कोण खेळेल
चमचालिंबू
पण मी घाबरलो नाही

फार फार तर काय होईल
काहीच आठवत नसताना
म्हणतील
आला कशाला हा इथे मरायला

त्या वेळी
कोण जिंकले
ते मला आठवत नाही
फक्त गाणे आठवते
तेरा जलवा जिसने देखा
वो तेरा हो गया

पण मला वाटते ते
थांबलेच नाही
मीही मग
लिंबावर गुलाल टाकला
आणि घाबरवले
भोळ्याभाबड्यांना

शेवटी मला स्वप्न पडले
की खुर्चीवर बसून मी मरून गेलोय
--- ००० ---

ट्रान्सफॉर्मर

ट्रान्सफॉर्मर उडतो धडाम
आणि पाय लटपटतात

आता कुणाला मोहात पाडणे तर रद्दच
माझ्याच सर्कशीत मीच घेईन का मला
याचाच हंटर आपटत राहतो

गर्दी खूप असते
ओळखत कुणीच नाही
पण

अदृश्य दबाव असतो
वावच नसतो
माझा मला

त्यांच्याबरोबर
ते बोलावतात
स्वातंत्र्य मोर्च्यात
घोषणा द्यायला

मी दाखवतो लटपटते पाय

मला आता त्यांचीच भीती असते
अवमान तर नाही समजणार ते

वर्दळ ओळखून
राजकारणाच्या सावलीत राहावे
म्हणून मी

पक्ष जॉइन करतो
उभा राहतो
आश्वासन देत की यापुढे

कधीच नाही उडणार ट्रान्सफॉर्मर
बाकी निकाल लागो काहीही
मला दिलासा वाटतो
--- ००० ---

जागतिक गधडे

जागतिक गधडे विद्वान
गढलेले असतात
युद्धाच्या डावपेचांत
विरामांच्या चिंतेत मानवतेच्या
हवापाण्याच्या तुटवड्यात

त्यांना असते कौतुक
छातीवर फिती लावून
कुर्बानीला तयार असणाऱ्या तरुणांचे

विध्वंस करावा
शौर्य गाजवावे
सर्व मानवी संपत्तीचे वाजवावे बारा
अब्जावधींचे निधी
द्यावे जखमींच्या सेवाकार्याला

गधड्यांना साधायचा असतो
न्याय सत्याचा विजय
आणि मुलाबाळांच्या
भविष्याचा आशावादी अंधार

सर्व गधडे खात्रीत असतात
निघतील सांस्कृतिक
भल्याचे मार्ग

सर्व मानवजातीला ते नादाला लावतात
विचार विचार विचार करण्याच्या

सर्व मानवजातीला आदर असतो
तसाच भरोसाही सर्व गधड्यांबाबत
एकमेकांच्या विचारांचे गळे चिरत
तेच देतील साधून सर्वांचे हित असा

या विचारात मुले स्त्रिया वृद्ध
यांच्या मृत्यूंबाबत सर्व हळहळत राहतात
सात्त्विकतेने
--- ००० ---

अडथळे

हे काही निव्वळ माझे अज्ञान नव्हे
की मी अडकून पडतो मला
नको असलेल्या दुकानात
कारण कधीच मी मागितले नव्हते
पूर्ण होण्याचे नाटक

उलट मला तर दिसते
फोल असलेले अस्वल
फक्त पाण्यासाठी
स्वत:चे तत्त्व विकणारे

खरे तर तत्त्वाचा नसतोच प्रश्न
कारण मला माहीत असतो
त्याचा वैचारिक हिंस्रपणा
जो कुणालाही पटवून देण्यातले
फोलपणही मला माहीत असते

मग हे अडथळे तरी
काय करताहेत काम
अमुक घडण्यासाठी
मी खरे मानलेले संबंध
मी दिले समजा झुगारून

तर कोण बोलू शकेल माझ्या
अपयशावर निर्बुद्ध श्रमावर
अज्ञानावर वा बेशुद्धीवर

कुछ है ही नही जन्नत की हकीकत

--- ००० ---

पदवी

उघड उघड बोलण्यासारखे
आहे काय इथे डोंबल की डोंबारी
की डोंबिवलीला जाणारी
मादक लोकल कलकलाट असलेली

विना परवाना किंवा विना विनंती
कोण काय करू शकणार आहे या जगात
जिथे सगळ्यांचे सगळे ठरलेले आहे
आयुष्यातल्या सर्व तिकीटांच्या
कन्फर्म्ड  स्मशान शांततेत

कधीही कुणाचे उणेदुणे न काढता
पळत राहणारे भाजीवाले एकीकडे
आणि सतत राजकारणात बुडलेले
काजवे एकीकडे असे थोडेच होऊ शकते
शुभमंगल कुणाचेही पण

कुणाला काही सांगू नये हेच बरे
कोण कधी होईल डोंबारी वा डोंब
भावनांचा सांगता नाही येत
या घाईचा कल्लोळ उसळलेल्या जगात

उद्या न सांगता सवरता
वेळच आली खांदा देण्याची
तर तोंडातले चॉकलेट
लपवत चालावेच लागणार पुढे पाहात

उगीचच कुणी नाही जात कुणाच्या वाटेला
ज्यालात्याला प्यारा असतो आपला जीव
एखादी पदवी संभाळावी तसा
--- ००० ---

शांतता

प्रत्येक कविता
मानसिक समजायची सवय झालीय तुला
यड्या त्यामुळे तुला
वर्तमानपत्राच्या मागे
लपलेला ओंकार दिसत नाही
वाहते पाणी दिसते पण त्याचे
निशिदिन बरसणारे
भावहीन संगीत नाही दिसत

तू वेडा आहेस तुला वाटते
तुझे अद्वितीय विचार
पराभूत करतील
दगड धोंडे माती यांना

इस्पितळात दाखल झालास तरी तू म्हणशील
शांतता एकाकी आहे
--- ००० ---

रहस्य

सहसा मी हे कुणाला सांगत नाही
पण तुम्हाला सांगतोय हे रहस्य
कारण मला वाटते की तुम्ही
माझे काहीतरी वाचले असेल
मी स्वत:च होतो थक्क
प्रेस-कॉपी तयार करण्यासाठी वाचताना
आयला काय लिहिलेय !
असेल मीच लिहिलेले पण
सॉरी
आता नाही जमणार तसे पुन्हा
मी साठवलेले नसतेच ना ते
माझ्या जगण्यात
तुम्हाला वाटते की मीच तो
मी खोडत नाही बसत ते
मी कोण ते खोडणारा
तुमचा मान राखण्यासाठी
मी होतो बनेल नम्र
पण तुम्हाला एक सांगतो
मी नसण्याचा तोच
जडजंबाल माहोल
कधीही असतो सहज
मला अव्हेलेबल
कारण मी ना त्याला मान देतो
ना काही मागतो त्याच्याकडून
पण मला माहीत असते की तुम्ही
होणार आहात नम्र हे पाहून
आणि पुन्हा मजेत
व्हावे लागणार आहे मला बनेल नम्र
तुमचे जे प्रेम मी स्वीकारतो
तेही नाही ठेवत मी साठवून
रागावू नका प्लीज
आणि रागावलात
तरी माझी कुठे असणार आहे हरकत
--- ००० ---

आरसे

माझ्या कवितेच्या स्नानगृहात
असतात आरसे अगणित
मुगले आजमच्या मधुबालासारखे
उत्तेजक पण वेदनामय
खंडित जखमांचे नकाशे

निरोपांची देवघेव चालूच असते
कधीही निःसंकोच व्हायला
तयार असलेले आकाश
आणि तिच्या खिडकीतून
दिसणारा गुलमोहोर
रोमँटिक न होता आसुसणारा
एक दीर्घ पल्ल्याचा मुक्काम

जेव्हा जेव्हा भेटते तेव्हा तेव्हा
ती असते अस्वस्थ
कायमचे काहीच नसल्याच्या जाणिवेने
जणू जे काय घडेल ते आता
मरणोत्तरच

तिची बंधने मला माझी तिला
असतात माहीत जग
ओस पडले तरी
मिळणार नाहीत त्यांना शब्द
हा असतो विश्वास
निर्दोष एक्स रे सारखा

वर्तमानातले शब्द येतात
स्मृतीतल्या खजिन्यातून
जेव्हा बेभान होतात स्वर्ग नरक
आणि पाताळयंत्र
खोटेपणा लपवणारे

कुणालाच माहीत नसलेले क्षण
येतात कवितेत
जणू ती त्या
गावचीच नसल्याप्रमाणे

मीही एक जुना देवानंद
वळतो मागे तिचे लक्ष जाताच
आणि पाहतो वर आकाशाकडे

मोहब्बतभरी इक नजर चाहिये
ही तीव्र इच्छा मनात असेपर्यंत
ती दुर्लक्ष करत जात राहते
जुन्या मरीन ड्राईव्ह वरून
समुद्राची तिरीप चुकवत

मलाही असते माहीत चुकून
पडली जर डोळ्यांवर ही तिरीप
तर ती कायमची नष्ट होईल
पुन्हा भेटण्यासाठी
--- ००० ---

उजागर

चला आता काही उजागर करू
म्हणून होत नसते
झोपडी ओलांडून शहरात जाणे
कारण अनुभव
आणि वैज्ञानिक दृष्टिकोण
एकसारखे नसतात
आपण आग्रहही सोडून दिलेला असतो
ज्ञानामुळे की बाबा फळ खाली पडते
यावरून सीमावाद नाही सुटू शकत

उदंड झाले पाणी उदंड झाले यश
उदंड झाली प्रेमे आणि भांडणे
यात अश्लील काही नसले तरीही
सीमाशुल्क विभाग
यात नाक खुपसू शकतोच

त्यामुळे
वाटल्यास हरे राम म्हणा
किंवा पापक्षालनासाठी
उतरवा कपडे
आणि बाळगत राहा अभिमान
वैज्ञानिक नसलेला

जगणे ही असते आपली मर्जी
आत्महत्या
हे काही रूटीन नाही होऊ शकत

हसा खेळा रडा वा वेडे व्हा
--- ००० ---

असिधारा

आहे का माहीत हे व्रत
जवळजवळ असणे
आणि जवळजवळ अशक्य
टाळणे नको ते घडणे

तुला वाटतेय मस्त
चाललेय आमचे
मोकळा बिनरहदारीचा
सुंदर रस्ता
आणि छान आनंदी शांततेचे राज्य

निर्भय बनो एवढे जरी
उच्चारू गेलो तरी
जाईल तोल
आणि होईल राखरांगोळी
जे आम्ही घडू देत नाही
आणि पांघरून असतो आनंद

मध्येही असिधारा
आणि चालायलाही असिधारा

तुझ्या समस्यांपासून निवारा म्हणून
तू येतोस मजेत इथे आश्रयाला
आमचे मानसिक संतुलन
अधिकच घट्ट करावे लागत

आम्ही जराही चुकलो तर घडणारे पाहून
बेशुद्ध पडशील येड्या
--- ००० ---

मक्ता

एकदा देश वेगवेगळे म्हटल्यावर
शांतिमंत्र लागणारच गोल टेबलाभोवती
तसेच असते सगळे बाळांनो
धार्मिकांनो नास्तिकांनो पुरोगाम्यांनो
की वैज्ञानिकवाल्यांनो धर्मांसाठी
धार्मिक सलोख्याचे
खोटारडे आत्मवंचनेचे भंगार
शांतिमंत्र लागणारच

संख्या कुणाची असणार जास्त
भूमी कुणाची असणार
अधिक अभिमानाने आणि वर्चस्वाने कोण जगणार
हे प्रश्न कधीच नष्ट होत नसतात

आव आणावाच लागणार सगळ्यांना
मानवतेचा उदात्ततेचा
आतून फाटलेल्या मनांनी

आणि हो
विचारसरण्या
माझीच लाल म्हणणाऱ्या
शांतीचे बृहदगान गाऊन झाल्यावर लगेच
शस्त्रास्त्रांची ताकद वाढवत जाणाऱ्या

श्रद्धाहीन पुरोगामी ठेवतात श्रद्धा शांततेवर
आणि देतात इतरांना शहाणे धडे
सर्वांत जास्त बुद्धिप्रामाण्यवादी असूनही
तेच ठरतात सर्वांत जास्त बुद्धिहीन
त्याशिवाय का कुणाला मिळू शकतो
शहाणपणाचा मक्ता
--- ००० ---

मुलांनो

मुलांनो, या, इकडे या,
आपल्याला शांतता हवीय ना ?
होय व्हय नक्कीच,
तिच्याबिगर प्रगती कशी होईल ?
सुख कसे लाभेल ? प्रेम कसे वाटेल ?
कित्ती गुणी रे तुम्ही बाळांनो !
पण एक हिंदूहित आणि हिंदूभूमी
हे अग्रक्रमाने जोपासायलाच हवे !
आयला खरेय हे, जगभर
सगळे हेच तर करतात त्यांचे त्यांचे !
अरे पण चूक आहे ते,
सौहार्द, एकी, सहजीवन
महत्त्वाचे नाही ?
आयला, हो रे, धर्म घरीच ठेवायला हवा !
आर्थिक असते सगळे यड्यांनो,
खानापीनासोना जर नसेल तर
बाकीचे काय चाटायचेय ?
रियली ! करेक्ट आहे साले !
अरे मूर्खांनो, प्रत्येक भाषणाला
येऊन टाळ्या काय वाजवताय ?
शांतता हवीय का नकोय तुम्हाला ?
हवीय ना महाराज ! त्यासाठीच तर
आहे आमचा अत्युत्तम मार्ग !
तो सगळ्यांनी स्वीकारला की झाले !
सुख, आनंद, भरभराट आपोआप येईल !

अरे, आदर्श सगळेच भुलवतात,
डोके वापरा की जरा !
भेद मानले तर एकी कशी येईल ?
तेच तर ! आम्ही तेच म्हणतोय महाराज !

तुम्ही सगळे थांबा एक मिनिट,
माझे ऐका जरा !
माणूस हा एक मतलबी, हलकट,
आदर्शवादी, स्वप्नील, वेडा,
बिनडोक, बेअकली,
तर्काने, बुद्धीने चालत

तर्क आणि बुद्धी गटारात टाकणारा,
क्रूर, माणुसकीहीन, ढोंगी, कपटी,
आत्मवंचक, परभंजक,
आणि एक नंबरचा च्यूत्या प्राणी आहे,
हे पटतेय का ? नुसते पटून उपयोग नाही,
समजायला हवे !
आयला, करेक्ट आहे च्यायला हे !

--- ००० ---